

मालवण येथे आयोजित 'नौदल दिन 2023' कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचे मत

# वारसा आणि विकास, हाच विकसित भारताचा मार्ग

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आवाहन, पुणे-नागपूरचा दौरा

**'एआय' च्या साहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात परिवर्तन घडवा**

उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांच्या परिषदेत उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आवाहन

**पीएमइजीपी, सीएमईजीपी, उद्योग विभागाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवून इतिहास घडवा...**

गेल्या वर्षीचे अपूर्ण स्वप्न नवीन वर्षात पूर्ण करण्यासाठी

**संकल्पपूर्तीचा ' स्मार्ट 'पासवर्ड**

2023 24 साठी अंदाज, बांधकाम, वीजनिर्मिती वाढ

**विकास दर @ 6.5%**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

मासिक

# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

वर्ष ३४वे

जानेवारी

2024

₹ 75/-

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात 34 वर्षापासून कार्यरत संस्था**

**ध्येय (Mission)**

**जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती**

**दृष्टिकोन (Vission)**

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.


प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

MCED

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
**उद्योजक**

**Visit us @ http://www.mced.co.in**

उद्योजक
January-2024, VOL.XXXIV, ISSUE I

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719

**सल्लागार मंडळ**
**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे
**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**संपादक**
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर
**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर
**अध्यक्ष,** मसिआ, छत्रपती संभाजीनगर
**विभागप्रमुख,** जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**श्री. सुरेश वाघ,** नाशिक


उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत संस्था
MCED
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांचे प्रकाशन

E-mail :
udyojakmagazine2@gmail.com
udyojakadvt@gmail.com

Portal :
www.mced.co.in

कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.

# नवीन वर्षाचा नवोन्मेष



नवे वर्ष म्हणजे नवीन उत्साह, नवीन आशा, नवीन संधी, नवीन आव्हाने अन् नवीन यश... नवे वर्ष म्हणजे नवीन स्वप्न, नवीन दिशा, नवीन स्वप्नांच्या राशी आणि त्या जिद्दीने पूर्ण करण्याचा संकल्प. नवीन वर्ष म्हणजे सुखाची चाहुल आणि एक नवी सुरुवात... बघता बघता २०२३ संपले आणि २०२४ ने मोठ्या उत्साहात आपल्या आयुष्यात प्रवेश केला. जगभरात नववर्षाचा उत्साह ओसंडून वाहतोय. महाराष्ट्रही या उत्साहात चिंब भिजून निघाले असून उद्योगजगतही त्यास अपवाद नाही.

सरते वर्ष राज्यातील उद्योगविश्वासाठी भरभराटीचे ठरले. याची सुरुवातच दणक्यात झाली. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत जगभरातील उद्योगसमूहांनी महाराष्ट्रातील औद्योगिक क्षमता, पायाभूत सुविधा आणि उद्योगक्षम धोरणावर विश्वास दाखवत १ लाख ३७ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. पहिल्यांदाच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह २ दिवस परिषदेत उपस्थित होते. करार झालेल्या कंपन्यांकडून प्रत्यक्ष गुंतवणुकीलाही सुरुवात झाली आहे, हे विशेष.

जगातील २० बलाढ्य देशांची संघटना असलेल्या जी-२० समूहाचे अध्यक्षपद भारताला मिळाले आणि देशाने या संधीचे सोने करून दाखवले. भारताला पहिल्यांदाच हा बहुमान मिळाला. १ डिसेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२३ दरम्यान हे पद भारताकडे होते. नोव्हेंबरमध्ये जी-२० च्या दोन दिवसीय शिखर परिषदेसाठी १९ राष्ट्रांचे प्रमुख, युरोपीयन युनियनचे सदस्य आणि काही निमंत्रित राष्ट्र नवी दिल्लीतील भव्य 'भारत मंडपम्'मध्ये आले होते. 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणत भारताने पाहुण्यांचे स्वागत केले. परिषदेमुळे जागतिक व्यासपीठावर भारताचा दबदबा वाढला.

सर्वाधिक परदेशी गुंतवणूक खेचून आणणारे महाराष्ट्र हे पुन्हा देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले. दोन वर्षांत गुजरात आणि कर्नाटकने महाराष्ट्राला पिछाडीवर टाकले होते. मोठ्या गुंतवणुकीसोबत स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने 'महाराष्ट्र स्टार्टअप ॲक्सेलेरेशन उपक्रमाची' सुरुवात केली. त्याचे परिणाम दिसत आहेत.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा ८० किलोमीटरचा दुसरा टप्पा शिर्डी ते भरवीर (नाशिक) या मार्गाचे २६ मे २०२३ रोजी उद्घाटन करण्यात आले. समृद्धीमुळे नागपूर-मुंबई हे ७०१ किलोमीटरचे अंतर अवघ्या ८ तासात कापले जाईल. राज्याची राजधानी आणि उपराजधानी जवळ आल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीही होणार आहे.

२०१४ मध्ये भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये १० व्या स्थानावर होता. आता ५ व्या स्थानावर आला आहे. २०२८ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्ससह भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील करण्याचा मोदींचा मानस आहे. पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा देणार आहे. राज्याचा विकास वृद्धी दर ८.५० टक्के आहे. राज्याला २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट गाठण्यासाठी ११ टक्के वृद्धी दर गाठावा लागेल. त्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे.

गेल्या वर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतकाळाला सुरुवात झाली आहे. स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंतचा हा २५ वर्षांचा काळ देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या काळात भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. यंदाचा प्रजासत्ताक दिनही खास असणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यासाठी विविध देशांच्या राष्ट्राध्यक्षांना आमंत्रित करण्याची परंपरा आहे. भारत २०२४ मध्ये भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांच्या समूह क्वाड समिटचे यजमानपद भूषवणार आहे. या सोहळ्यासाठी या ४ देशांच्या नेत्यांना आमंत्रित करण्याची शक्यता आहे. त्यामुळे या देशांमधील धोरणात्मक भागीदारी वाढून संबंध आणखी दृढ होतील. त्यातून देशात व राज्यात गुंतवणुकीला चालना मिळेल.

२०२३ मध्ये थांबलेली कामे, प्रकल्प, स्वप्न २०२४ मध्ये गतिमान होतील, असा विश्वास वाटतोय. नवीन वर्ष 'उद्योजक'चे वाचक, लेखक, जाहिरातदार, एजंट, वितरक व सर्वांनाच भरभराटीचे जावो, हीच अपेक्षा. प्रजासत्ताक दिन चिरायू होवो. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा!

**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
**विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा**
**अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)**

Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक जानेवारी 2024

## अंतरंग




- वारसा आणि विकास, हाच विकसित भारताचा मार्ग / डॉ.आरतीश्यामल जोशी.............................०५
- पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फॉरेन ट्रेड ट्रेनिंग / प्रतिनिधी...........................................०८
- 'एआय'च्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात परिवर्तन घडवा / डॉ.आरतीश्यामल जोशी.....................०९
- महा गुंतवणूक राष्ट्र / डॉ.आरतीश्यामल जोशी.......................................................११
- विश्वकर्मा योजना यशस्वी करण्यासाठी उद्योगांनी पुढे यावे / प्रतिनिधी..............................१३
- उद्योग भवन, रत्नागिरी इमारतीचे भूमिपूजन समारंभ / प्रतिनिधी..................................१५
- उद्योग विभागाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवून इतिहास घडवा / प्रतिनिधी.....................१७






- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना गतिमानता पंधरावाडा मोहिम/ प्रतिनिधी.........२०
- देशाच्या निर्यातीत महाराष्ट्राचा १६.०५ टक्के वाटा / प्रतिनिधी...............................२१
- राज्याच्या आर्थिक समृद्धीसाठी इग्नाईट अभियान / प्रतिनिधी.................................२३
- धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे...............................२५
- हवाई वाहतूक उद्योगाची गगनभरारी / प्रतिनिधी.............................................२८
- विकासदर @ ६.५ टक्के / हेमंत देसाई......................................................२९





- हिंगोलीची हळद जाणार सातासमुद्रापार / प्रतिनिधी...........................................३१
- घराला घरपण देणारी माणसं / प्रसाद घारे..................................................३३
- कर संकलनात २०% वाढ / हेमंत देसाई......................................................३६
- संकल्पपूर्तीचा 'स्मार्ट' पासवर्ड / जीवन मुळे.................................................३७
- भारत आर्थिक प्रगतीचे नवे पर्व-२०२४ / डॉ.अभिराम डबीर...................................३९
- कृषिपर्यटनातून समृध्दीचा मार्ग / सुधीर साबळे.................................................४१


- पर्यटनातून घडविली यशाची इमारत / निशिगंधा कणकवलीकर ..............................४३
- सातासमुद्रापार व्हाया सेल्फ ड्राईव्ह रोड ट्रिप / प्रतिनिधी.........................................४६
- सुगरण मसाल्याने दरवळला यशाचा सुगंध / प्रतिनिधी.........................................४९
- यशस्वी जीवनाची 'संजीवनी' / डॉ.उमेश कणकवलीकर........................................५२
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये .........................................................५४


हस्तकला उत्पादने तयार करणे; पर्यटन उद्योग व सौंदर्य प्रसाधने उद्योग

याशिवाय संपादकीय, प्रश्नपेटी इत्यादी...



मालवण येथे आयोजित 'नौदल दिन २०२३' कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचे मत

# वारसा आणि विकास, हाच विकसित भारताचा मार्ग

**मालवण, तारकर्ली किनारपट्टीवरील भव्य सिंधुदुर्ग किल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांचे वैभव, राजकोट किल्ल्यावरील त्यांच्या नेत्रदीपक पुतळ्याचे लोकार्पण आणि भारतीय नौदलाचा जयघोष, या ऐतिहासिक दिवसामुळे भारतातील प्रत्येक नागरिकाचे मन उत्कटता आणि उत्साहाने भारावून गेले आहे. सिंधुदुर्गच्या विजयी भूमीवर नौदल दिन साजरा करणे हा खरोखरच अभूतपूर्व अभिमानाचा क्षण आहे. सिंधुदुर्ग किल्ला भारतातील प्रत्येक नागरिकाच्या मनात अभिमानाची भावना निर्माण करणारा आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. वारसा आणि विकास हाच विकसित भारताचा मार्ग असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.**

**- डॉ.आरतीश्यामल जोशी**

सिंधुदुर्ग येथे आयोजित 'नौदल दिन २०२३' या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत ते म्हणाले, कोणत्याही देशासाठी नौदल क्षमतेचे महत्त्व महाराज जाणून होते. ज्यांचे समुद्रावर नियंत्रण आहे त्यांच्याकडे अंतिम सत्ता आहे, या शिवाजी महाराजांच्या घोषणेचा पुनरुच्चार करत मोदी म्हणाले, त्यांनी शक्तिशाली नौदलाची उभारणी केली. कान्होजी आंग्रे, मायाजी नाईक भाटकर, हिरोजी इंदुलकर या योद्ध्यांपुढे नतमस्तक होत ते आजही प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी भारतीय नौदलाची जहाजे, पाणबुड्या, विमाने आणि विशेष दलांच्या थरारक प्रात्यक्षिकांचे निरीक्षण केले.

### नौदलाच्या गणवेशावर राजमुद्रा

पंतप्रधान म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाने प्रेरित होऊन आजचा भारत गुलामगिरीची मानसिकता झुगारून पुढे मार्गक्रमण करत आहे. नौदल अधिकाऱ्यांच्या गणवेशावरील मानचिन्ह (इपॉलेट्स) आता छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा आणि ठेवा अधोरेखित करतील. नौसेनेच्या ध्वजाला मागच्या वर्षी महाराजांच्या विचारांशी जोडता आले, हे माझे भाग्य आहे. आता नौदलाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा असेल आणि नौदलाच्या पदांना भारतीय पद्धतीची नाव देणार असल्याची घोषणा त्यांनी केली. सशस्त्र दलांमध्ये नारीशक्ती मजबूत करण्यावरही त्यांनी भर दिला. नौदलाच्या जहाजात भारताच्या पहिल्या महिला कमांडिंग ऑफिसरच्या नियुक्तीबद्दल त्यांनी भारतीय नौदलाचे अभिनंदन केले.

### विकसित भारताकडे वाटचाल

मोदी पुढे म्हणाले, १४० कोटी भारतीयांचा विश्वास ही सर्वात मोठी शक्ती आहे; कारण भारत मोठी उद्दिष्टे निश्चित करत आहे. पूर्ण दृढनिश्चयाने ती साध्य करण्यासाठी झटत आहे. विविध राज्यांतील

लोक 'राष्ट्र प्रथम' या भावनेने प्रेरित होत असल्यामुळे संकल्प, भावना आणि आकांक्षा यांच्या एकत्रित सकारात्मक परिणामांची झलक दिसून येत आहे. आज देशाने इतिहासातून प्रेरणा घेतली असून उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शक आराखडा तयार केला जात आहे. नकारात्मकतेच्या राजकारणावर मात करून प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्याचा संकल्प जनतेने केला आहे. हा संकल्प आपल्याला विकसित भारताकडे घेऊन जाईल.

### इतिहासात बंदरांचा वारसा

भारताच्या इतिहासावर भाष्य करताना प्रधानमंत्री म्हणाले, हा इतिहास केवळ गुलामगिरी, पराभव आणि निराशेबद्दलचा नसून, त्यामध्ये भारताचे विजय, धैर्य, ज्ञान आणि विज्ञान, कला आणि सृजनशीलता, कौशल्ये आणि भारताच्या सागरी क्षमतांच्या गौरवशाली अध्यायांचाही समावेश आहे. तंत्रज्ञान आणि साधनसामग्रीची उपलब्धता जवळजवळ नाहीच, अशा काळात उभारण्यात आलेल्या सिंधुदुर्गसारख्या किल्ल्याचे उदाहरण देऊन त्यांनी भारताच्या क्षमतांवर प्रकाश टाकला. त्यांनी गुजरातमधील लोथल येथे सापडलेले सिंधू संस्कृतीमधील बंदर आणि सुरत येथील ८० पेक्षा जास्त जहाजे नांगरण्याची क्षमता असलेल्या बंदराच्या वारशाचा उल्लेख केला. चोल साम्राज्याने आग्नेय आशियाई देशांपर्यंत आपला व्यापार वाढवला होता, त्याचे श्रेय भारताच्या सागरी सामर्थ्याला होते. परकीय शक्तींच्या आक्रमणामुळे सर्वात प्रथम भारताची सागरी क्षमता बाधित झाली. जो भारत नौका आणि जहाजे बनवण्यासाठी प्रसिद्ध होता, त्याने समुद्रावरील आपले नियंत्रण गमावले आणि त्यामुळे सामरिक-आर्थिक ताकदही गमावली. भारत विकासाकडे वाटचाल करत असताना, आपण आपले गमावलेले वैभव परत मिळवायला हवे.

**ब्ल्यू इकॉनॉमीला चालना देण्याची गरज :** पंतप्रधानांनी ब्ल्यू इकॉनॉमी, अर्थात नील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकार अथक प्रयत्न करत असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी 'सागरमाला' प्रकल्पाअंतर्गत बंदराच्या माध्यमातून होत असलेल्या विकासाचा उल्लेख केला आणि सांगितले की भारत 'मेरिटाइम व्हिजन', अर्थात सागरी दृष्टिकोनाअंतर्गत आपल्या महासागरांच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सरकारने व्यापारी मालवाहतुकीला चालना देण्यासाठी नवीन नियम बनवले आहेत. त्यामुळे गेल्या ९ वर्षांमध्ये भारतातील सागरी व्यापाऱ्यांची संख्या १४० टक्क्यांहून अधिक वाढली आहे. आताचा काळ हा भारताच्या इतिहासाचा असा काळ आहे, जो येणाऱ्या अनेक शतकांचे भविष्य लिहिणार आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये दहाव्या स्थानावरून झेप घेत, तो पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरला आहे आणि तिसऱ्या स्थानाच्या दिशेने वेगाने प्रवास करत आहे. जग भारताचा 'विश्व मित्र (जगाचा मित्र)' म्हणून उदय होताना पाहत आहे. इंडिया मिडल ईस्ट युरोपीयन कॉरिडॉरसारख्या उपायांमुळे हरवलेला मार्ग पुन्हा निर्माण होईल. त्यांनी मेड इन इंडियाचे सामर्थ्य स्पष्ट करताना तेजस, किसान ड्रोन, यूपीआय प्रणाली आणि चांद्रयान-३ यांचा उल्लेख केला. परिवहन विमाने, विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतच्या उत्पादनामुळे संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता देखील दिसून येत असल्याचे ते म्हणाले.

**शेवटचे नव्हे पहिले गाव :** देशाच्या किनारपट्टी आणि सीमावर्ती भागातील गावांना 'देशातील शेवटचे गाव' असे संबोधण्याऐवजी 'देशातील पहिले गाव' समजण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार त्यांनी केला. मोदी म्हणाले, किनारपट्टी भागातील प्रत्येक कुटुंबाचे जीवनमान सुधारणे ही केंद्र सरकारची प्राथमिकता आहे. २०१९ मध्ये स्वतंत्र मत्स्यव्यवसाय मंत्रालयाची निर्मिती आणि या क्षेत्रात ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. २०१४ नंतर मत्स्य उत्पादनात ८ टक्के आणि निर्यातीत ११० टक्क्यांनी वाढ झाली. त्याशिवाय, शेतकऱ्यांसाठी विमा संरक्षण २ लाखावरून ५ लाखांपर्यंत वाढवण्यात आले. त्यांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळत आहे. सागरमाला योजना किनारपट्टी भागातील आधुनिक कनेक्टिव्हिटी (संपर्क यंत्रणा) मजबूत करत आहे. यावर लाखो कोटी रुपये खर्च होत असून त्यामुळे किनारपट्टी भागात नवे व्यापार आणि उद्योग सुरू होतील. मत्स्य प्रक्रियेशी संबंधित उद्योग आणि मासेमारी नौकांचे आधुनिकीकरणही हाती घेतले जात असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले.

**कोकण संधींचा प्रदेश :** पंतप्रधानांनी कोकणचा उल्लेख 'अभूतपूर्व संधींचा प्रदेश' असा केला. राज्याच्या विकासासाठी सरकारची बांधीलकी अधोरेखित करताना त्यांनी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अलिबाग, परभणी आणि धाराशिव येथील वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्घाटन, चिपी विमानतळाचे कार्यान्वयन आणि माणगावपर्यंत जोडणाऱ्या दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचा उल्लेख केला. काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष योजना तयार केल्याचेही नमूद केले. समुद्रकिनारी असलेल्या निवासी भागांचे रक्षण करणे हे सरकारचे प्राधान्य आहे. खारफुटीची व्याप्ती वाढविण्यावर भर दिला जात आहे. खारफुटी व्यवस्थापनासाठी मालवण, आचरा-रत्नागिरी आणि देवगड-विजयदुर्गसह महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांची निवड करण्यात आल्याची माहिती प्रधानमंत्री मोदींनी दिली.

**गड-किल्ले जतन करण्याचा निर्धार :** वारसा आणि विकास, हाच आपला विकसित भारताचा मार्ग आहे, असे मोदी यांनी अधोरेखित केले. ते म्हणाले, कोकणसह संपूर्ण महाराष्ट्रात या वास्तूंच्या संवर्धनावर कोट्यवधी रुपये खर्च होत असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात बांधलेले गड-किल्ले जतन करण्याचा केंद्र व राज्य सरकारचा निर्धार आहे. त्यामुळे या भागातील पर्यटन वाढून नवीन रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. दिल्लीबाहेर लष्कर दिन, नौदल दिन इत्यादीसारखे सशस्त्र सेना दिन आयोजित करण्याच्या नवीन परंपरेमुळे या सोहळ्याची व्याप्ती भारतभर वाढते आणि नवीन ठिकाणे आकर्षणाचे नवीन केंद्र ठरतात, असे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झाले, ही बाब आपल्या सर्वांच्या गौरवाची असल्याचे सांगितले. भारतीय नौदलाच्या गणवेशावर छत्रपती


शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेचा समावेश केल्याबद्दल त्यांनी मोदी यांचे आभार मानले व तमाम महाराष्ट्रासाठी गौरवाची व अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. शिवपराक्रमाने पावन झालेल्या शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीत मोदी यांचे राज्यातील १२.५ कोटी जनतेच्या वतीने त्यांनी स्वागत केले.

**भारताची जगात नोंद :** मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आज महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण राष्ट्र शिवाजी महाराजांना अभिवादन करत आहे. यावेळी महाराष्ट्राच्या पहिल्या नौदल अधिकारी म्हणून श्रीमती देवस्थळी यांची नेमणूक झाली, याचा तमाम महाराष्ट्राला अभिमान आहे. देशातील महिलांच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक प्रधानमंत्री मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झाले आहे. आत्मनिर्भरतेचा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला वारसा आणि वसा आपण सर्वजण पुढे घेऊन जात आहोत. आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक महासत्ता म्हणून भारत उदयास आलाय. आता आपल्या सामर्थ्याची नोंद संपूर्ण जगाने घेतलेली आहे. याप्रसंगी राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, संरक्षण दलाचे प्रमुख जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार आदी यावेळी उपस्थित होते.

**गरजूंचा जीवनस्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध :** भारतातील प्रत्येक नागरिकाचा, गावाचा, शहराचा आणि राज्याचा विकास करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध योजना हाती घेतल्या आहेत. या योजना देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचाव्यात, त्यांचा नागरिकांना लाभ मिळावा यासाठी विकसित भारत संकल्प यात्रा सुरू केली आहे. या यात्रेच्या माध्यमातून भारतातील महिला, युवक, शेतकरी, खेळाडू आणि गरजूंच्या जीवनाचा स्तर उंचावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मोदी यांनी केले. 'विकसित भारत संकल्प यात्रे'च्या निमित्ताने त्यांनी ९ डिसेंबर रोजी देशभरातील विविध ठिकाणी नागरिकांशी दृक-श्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधला.

याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यातील गरीब आणि गरजू नागरिकांपर्यंत विकसित भारत संकल्प यात्रा पोहोचविण्याचे शासनाचे ध्येय आहे. महाराष्ट्रातील विकास कामांसाठी केंद्र शासन पाठीशी आहे. राज्यात वेगाने विकास कामे सुरू असून विदेशी गुंतवणुकीमध्ये राज्य एक नंबरवर आहे. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात राज्य अव्वल ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसार माध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)*



'उद्योजक' मासिकाच्या दिवाळी विशेष अंकाचे प्रकाशन मा.डॉ.भागवतजी कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते व मा.कार्यकारी संचालक श्री.बी.टी. यशवंते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता त्यांच्या निवासस्थानी संपन्न झाले. यावेळी त्यांनी उद्योजक मासिक व एमसीईडी संस्थेच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. एमसीईडी संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनाबद्दल मानस व्यक्त केला.

यावेळी डावीकडून लेखा अधिकारी श्री.आनंद माने, विभागीय अधिकारी श्री.दत्तात्रय थावरे, मालमत्ता विभाग प्रमुख डॉ. अभिराम डबीर, मा.कार्यकारी संचालक श्री.बी.टी. यशवंते, मा.डॉ.भागवतजी कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, भारत सरकार, उद्योजक मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व विभाग प्रमुख श्री. संतोष बोर्डे, वरिष्ठ सहायक श्री.विजय मगर, आस्थापना विभाग, समन्वय विभाग प्रमुख श्री.विवेक तोंडरे, कु.साक्षी जगधने, सहायक उद्योजक विभाग दिसत आहेत.

वर्ल्ड ट्रेड इन्स्टिट्युट,
मुंबईद्वारे आयोजित अभ्यासक्रम

# पोस्ट ग्रज्युएट डिप्लोमा इन फॉरेन ट्रेड ट्रेनिंग



**आंतरराष्ट्रीय व्यापार, आयात- निर्यात, एमएसएमई, विपणन अधिकारी तसेच उत्पादक आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना चांगल्या करिअरची संधी उपलब्ध करून देणाऱ्या पोस्ट ग्रज्युएट डिप्लोमा इन फॉरेन ट्रेड ट्रेनिंग या अभ्यासक्रमाची ६७ वी ऑनलाईन बॅच ८ जानेवारी तर ऑफलाईन बॅच १३ जानेवारी २०२४ पासुन सुरू होत आहे. सहा महिन्यांचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाचे वर्ल्ड ट्रेड इन्स्टिट्युट, मुंबईद्वारे आयोजन करण्यात आले असून याचे आठवड्यातून ३ वेळेस वर्ग होतील. प्रवेशासाठी https://forms.office.com/r/mTW74twpmp वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**
**- प्रतिनिधी**

निर्यातदार, आयातदार, एमएसएमई, उद्योजक, व्यावसायिक, आंतरराष्ट्रीय विपणन अधिकारी, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सरकारी अधिकारी, उत्पादक आणि विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी विविध उद्योगक्षेत्रांतील इच्छुकांना वर्ल्ड ट्रेड इन्स्टिट्यूट, MVIRDC वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईची शैक्षणिक शाखा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारे परदेश व्यापारातील सहा महिन्यांच्या पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमाची ६७वी बॅच आयोजित करणार आहे. ऑनलाइन बॅच ८ जानेवारी, २०२४ आणि ऑफलाइन बॅच १३ जानेवारी, २०२४ रोजी सुरू होईल. वरील आयोजित बॅच आठवड्यातून तीनदा (सोमवार, बुधवार व शुक्रवार) संध्याकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत आयोजित केली जाईल, तर ऑफलाइन बॅच दर शनिवारी १ ते ७.४५ वाजता आयोजित केली जाईल. अभ्यासक्रम १५० तासांमध्ये पसरलेला असेल, ज्यामुळे सहभागींना आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रात तयार आणि अपडेट करता येईल आणि तसेच ते सतत बदलणाऱ्या जागतिक आर्थिक परिस्थितीला सामोरे जाण्यास सज्ज असतील.

शैक्षणिक आणि उद्योग पार्श्वभूमी असलेल्या अनेक वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या प्राध्यापकांना भेट देऊन केस स्टडीज आणि रिअल टाइम दृष्टिकोनातून शिकविलेला पाच मॉड्युल्स असलेला अभ्यासक्रम. सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी होणाऱ्या या कोर्समध्ये परदेशातील बाजारपेठा, विपणन पद्धती, दस्तऐवजीकरण, वित्त, विमा, शिपिंग आणि लॉजिस्टिक्स तसेच इतर देशांतून वस्तूंची आयात, परकीय चलन आणि निर्यातीशी संबंधित नियमांचे सखोल ज्ञान दिले जाईल.

अभ्यास केलेल्या मॉड्युल्सच्या अनुप्रयोगाच्या पैलूंचे मापन करण्यासाठी सहभागींना परीक्षाव्यतिरिक्त अंतर्गत निरंतर मूल्यमापन केले जाईल.

आमच्या निर्यातीची पारंपरिक ठिकाणे असलेल्या USA आणि EU मधील आर्थिक मंदिची भरपाई करण्यासाठी भारतीय निर्यातदार नवीन निर्यात बाजारांबद्दल आशावादी असताना या अभ्यासक्रमाला महत्त्व आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, ग्राहकोपयोगी वस्तू, ऑटोमोटिव्ह आणि इतर उद्योगांमधील बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन आणि निर्यातीचे केंद्र म्हणून भारताकडे पाहतात. जागतिक पुरवठा साखळीसाठी भारत एक आकर्षक केंद्र म्हणूनही उदयास येत आहे.

शिवाय, अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेले धोरण आणि कार्यपद्धती पुढील वर्षांमध्ये सहभागींना परदेशी व्यापार विभागातील प्रमुख भागधारक होण्यासाठी प्रबोधन आणि सक्षम करतील.

निर्यातदार, आयातदार, एमएसएमई, उद्योजक, व्यावसायिक, आंतरराष्ट्रीय विपणन अधिकारी, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सरकारी अधिकारी, उत्पादक आणि विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी विविध उद्योगक्षेत्रांतील सहभागी नोंदणी करू शकतात.

इच्छुक उमेदवार **https://forms.office.com/r/mTW74twpmp** वर नाव नोंदणी करू शकतात. ■■



## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आवाहन, पुणे-नागपूरचा दौरा

# 'एआय'च्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात परिवर्तन घडवा

**माफक दरातील सुलभ वैद्यकीय उपचार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असून कोविडसारख्या महामारीने मजबूत आरोग्य यंत्रणेची गरज अधोरेखित केली आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय संशोधन आणि आरोग्यसेवा क्षेत्रात देशाला अग्रणी बनविण्यासाठी निर्धाराने प्रयत्न करून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्णतेचे केंद्र म्हणून देशाची ओळख प्रस्थापित करावी, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी येथे केले. नव्या आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ३ दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर होत्या. त्या पुणे आणि नागपूर येथे विविध कार्यक्रमांत उपस्थित होत्या. मुर्मू यांनी पुणे येथील सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाला 'राष्ट्रपतींचे निशाण' देऊन गौरविले. लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेचा शताब्दी सोहळा आणि 'शालेय शिक्षणात योगाचे एकत्रीकरण' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन केले. तर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (मेडिकल) अमृत महोत्सवाचे उद्घाटन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरच्या १११ व्या दीक्षान्त समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात योगाचा समावेश

लोणावळ्यातील कैवल्यधाम योग संस्थेच्या शताब्दी सोहळ्यात राष्ट्रपती म्हणाल्या, भारताचे योग शिक्षण ही जागतिक समुदायासाठी आपली अमूल्य देणगी आहे. भारताच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. योग प्रणाली ही आरोग्य आणि कल्याणासाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्रदान करते आणि ती संपूर्ण जागतिक समुदायाच्या आरोग्यासाठी लाभदायक आहे, असे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने स्पष्ट केले आहे. योगाच्या अमूल्य ज्ञानाचा मुलांना आणि तरुण पिढीला लाभ व्हावा या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेत असलेल्या योग ज्ञानाला शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. प्राचीन भारतातील गुरुकुलमध्ये शिकणारे विद्यार्थी, बौद्धिक ज्ञान तसेच आध्यात्मिक ज्ञानाच्या मार्गावर मार्गक्रमण करत असत. आपल्या विद्यार्थ्यांना भारताच्या प्राचीन परंपरेच्या उपयुक्त घटकांशी जोडणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. योगाची शिस्त कैवल्यप्राप्तीसाठी उपयुक्त आहे, हे सत्य आपल्या ऋषी-मुनींनी प्राचीन काळी विस्तृत संशोधन आणि चाचण्यांनंतर मांडले

होते, असे त्या म्हणाल्या.

**महिलांनी सशस्त्र दलांत करिअर करावे :** राष्ट्रपतींनी पुणे येथील सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाला 'राष्ट्रपतींचे निशाण' (प्रेसिडेंट्स कलर) देऊन गौरविले. त्यांनी आभासी पद्धतीने 'प्रज्ञा' या सशस्त्र दलांच्या संगणकीय औषध उपचार केंद्राचे उद्घाटन देखील केले. या प्रसंगी बोलताना मुर्मू म्हणाल्या, एएफएमसी अर्थात सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाने वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च गुणवत्ता असलेली शिक्षणसंस्था म्हणून नावलौकिक मिळवला आहे. या संस्थेतून पदवीधर झालेल्यांनी युद्धाचा काळ, बंडविरोधी कारवाया, नैसर्गिक आपत्ती तसेच महामारीच्या काळात देशांतर्गत तसेच सीमापार भागात समर्पितपणे सेवा देऊन देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. एएफएमसीमधून पदवी मिळवलेल्या अनेक महिला सैनिकांनी सशस्त्र दलांच्या वैद्यकीय सेवा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. तसेच अत्यंत उच्च पदांवर काम केले आहे. या महिलांकडून प्रेरणा घेऊन, अधिकाधिक महिला सशस्त्र दलांमधील कारकीर्द निवडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एएफएमसीच्या पथकाने वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनावर अधिक भर द्यावा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा अशा सूचना राष्ट्रपतींनी दिल्या. याप्रसंगी राज्यपाल रमेश बैस, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल ए. के. सिंह, सशस्त्र दल वैद्यकीय सेवेचे महासंचालक आणि आर्मी मेडिकल कॉर्प्सचे वरिष्ठ कर्नल कमांडंट लेफ्टनंट जनरल दलजित सिंग, एएफएमसीचे संचालक तथा कमांडंट लेफ्टनंट जनरल नरेंद्र कोतवाल यांच्यासह संरक्षण दलांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**अवयवदानासाठी जनजागृती करण्याची गरज :** अवयवदानाबाबत समाजात पुरेशी जागरूकता नसल्याने गरजू रुग्णांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र, त्यासोबतच अवैधरीत्या अवयव विक्रीचे प्रकारही घडत असल्याबाबत खंत व्यक्त करून वैद्यकीय क्षेत्राने अवयवदानासाठी जनजागृती करावी तसेच मानसिक आरोग्याच्या समस्येचाही सहानुभूतीने विचार करावा, असे आवाहन राष्ट्रपतींनी केले. नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल) अमृत महोत्सवाचे उद्घाटन मुर्मू यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. राष्ट्रपती म्हणाल्या, नव्या आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची गरज आहे. वैश्विक स्तरावर सर्वांना उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे ध्येय साध्य करण्यात डॉक्टरांची अपुरी संख्या ही अडचण आहे. त्यामुळे वैद्यकीय सुविधांचा लाभ प्राप्त होण्यात असमानता निर्माण झाली आहे. ती दूर व्हावी यासाठी केंद्र सरकारकडून जिल्हा रुग्णालय संलग्नित वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यास मदत केली जात आहे. त्यामुळे प्रादेशिक असमतोल आणि शहरी-ग्रामीण दरी कमी होण्यास मदत होणार आहे. मध्य भारतात गेल्या ७५ वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवा प्रदान करण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत समर्पित भावनेने काम करणाऱ्या वैद्यकांची मोठी फळी निर्माण केल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले.

**बोनमॅरोविषयक उपचार सुविधा :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, नव्या सुविधांनी सुसज्ज होणारे हे रुग्णालय व महाविद्यालय वाढती गरज भागवू शकणार आहे. या महाविद्यालयाने नागपूरसह लगतच्या राज्यातही उल्लेखनीय वैद्यकीय सेवा दिली असून विशेषतः कोविड काळातील योगदान प्रशंसनीय आहे. पूर्व विदर्भात सिकलसेल, थॅलेसेमियाचे रुग्ण लक्षणीय संख्येने आढळून येतात. अमृत महोत्सवाचे औचित्य साधत लवकरच बोनमॅरोविषयक उपचार सुविधेची सुरुवात होणार आहे.

**पुढील ५० वर्षांची गरज भागणार :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाविद्यालयाच्या सुविधांमध्ये काळानुरूप बदलाची गरज होती. यासाठी अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयाला नवे स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी शासनाकडून ५५० कोटींचा निधी देण्यात आला असून, लवकरच कायापालट होणार आहे. एक अत्याधुनिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणून त्यास नवे रूप मिळणार आहे. त्याअंतर्गत शस्त्रक्रिया कक्ष, अद्ययावत यंत्रसामग्री, वसतिगृह, नवीन इमारती, क्रीडांगण, कॅन्सर इन्स्टिट्यूट आदींची उपलब्धतता होणार असून, पुढील ५० वर्षांची गरज या निमित्ताने पूर्ण होणार आहे.

**लवकरच १४३२ पदांची भरती :** वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची १४३२ पदांची पदभरती होणार आहे. या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यासोबतच नवीन प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयांसाठी आशियाई विकास बँकेमार्फत ४००० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बी.एसस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. नर्सिंग, तांत्रिक, अतांत्रिक संवर्गातील ५१८२ पदांची भरती प्रकिया पूर्ण झाली असून लवकरच नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत.

**टपाल तिकिटाचे अनावरण :** याप्रसंगी महाविद्यालयातून उत्तीर्ण पहिल्या तुकडीचे विद्यार्थी डॉ. बी. जे. सुभेदार, महाविद्यालयासाठी जमीन दान करणारे कर्नल डॉ. कुकडे यांचे नातू ॲड. दिनकर कुकडे आणि या महाविद्यालयाला मदत करणाऱ्या डॉ. शकुंतला गोखले यांचे नातेवाईक रवी लिमये व डॉ. प्रमोद गिरी यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विशेष डाक तिकिटाचे अनावरण करण्यात आले. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते स्मरणिका आणि कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी केले. तत्पूर्वी नागपूर येथे आल्यानंतर राष्ट्रपती राजभवनात पोहोचल्या. नागपूरला हिवाळी अधिवेशनासाठी उपस्थित असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची राजभवन येथे भेट घेतली. नागपूर भेटीनंतर भारतीय वायुसेनेच्या विमानाने राष्ट्रपती मुर्मू यांनी नवी दिल्लीकडे प्रस्थान केले.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसार माध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)*

■■




## सर्वाधिक एफडीआयमध्ये महाराष्ट्र सलग दुसऱ्या तिमाहीत नं.१

# महा गुंतवणूक’ राष्ट्र

**उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी महाराष्ट्र सलग दुसऱ्या तिमाहीत जगभरातील गुंतवणूकदारांचे सर्वाधिक पसंतीचे राज्य ठरले आहे. राज्यात एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान ६५,५०२ कोटींची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) झाली. दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावरील अनुक्रमे कर्नाटक, गुजरात आणि दिल्लीच्या एकत्रित एफडीआयपेक्षा ती अधिक आहे. विशेष म्हणजे २०१९ पासुन महाराष्ट्र एफडीआयमध्ये देशात अव्वल आहे. तर निर्यातीच्या बाबतीत राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. - डॉ.आरतीश्यामल जोशी**

महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्य असून या राज्याच्या सर्वांगीण विकासात उद्योग विभागाचे मोठे योगदान आहे. राज्याची उद्यमशील प्रतिमा संवर्धनासाठी, प्रगतीशील व पुरोगामी ध्येयांची आखणी व अंमलबजावणी करणे, नवनवीन उद्योगांच्या उभारणीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे, स्वदेशी तसेच परदेशी गुंतवणुकीचा ओघ कायम ठेवून सातत्यपूर्ण विकास साधणे. त्याद्वारे रोजगार निर्मिती त्याचप्रमाणे मानवी संसाधने आणि पायाभूत सुविधांमध्ये वृद्धी करणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. या ध्येय धोरणांच्या अनुषंगाने उद्योग विभाग कार्यरत आहेः

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत नोडल इन्व्हेस्टमेंट प्रमोशन एजन्सी म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) कार्यरत आहे. महामंडळामार्फत भूखंड, रस्ते, पाणी,ड्रेनेज व्यवस्था, वीज, पथदिवे इ. पायाभूत सुविधा पुरविल्या जातात. राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये एमआयडीसीने महत्वाची भूमिका बजावली आहे. महामंडळाच्या माध्यमातून जगातील सर्वोत्तम औद्योगिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. राज्यातील गुंतवणूक वाढीच्या योजनांमध्ये नाविन्यपूर्ण बदल घडवून आणणे आणि भारतातील पहिली एक लक्ष कोटी रुपयांची (ट्रिलीयन डॉलर्स) अर्थव्यवस्था होण्याचा बहुमान महाराष्ट्राला प्राप्त करून देण्यासाठी उद्योग विभाग प्रयत्न करत आहे. येथील पायाभूत सुविधांवर परकीय गुंतवणूकदारांनीही सलग दुसऱ्या तिमाहीत राज्यावर विश्वास दर्शविला आहे. यामुळेच सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक खेचून आणण्यात महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य ठरले आहे.



**महाराष्ट्राची घोडदौड**

सलग दुसऱ्या तिमाहीत सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक खेचून आणण्यात महाराष्ट्र देशातील आघाडीचे राज्य ठरले. हा परकीय गुंतवणूकदारांचा राज्यातील सक्षम यंत्रणा, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा, अखंडीत वीज पुरवठा आणि राज्यातील उद्योग विभागावर असणारा विश्वास दर्शवितो. भविष्यात अजून मोठ्या गुंतवणूकी राज्यात येतील.

**- उदय सामंत, उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य**

केंद्र शासनाच्या उद्योग आणि व्यापार मंत्रालयाअंतर्गत कार्यरत डीपीआयआयटी म्हणजे औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागातर्फे नुकतीच विद्यमान आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीतील एफडीआयची आकडेवारी जाहीर केली. यात पुन्हा एकदा पहिल्या क्रमांकावर असल्याचे समोर आले.

### मागील घट, पण एकूण अव्वल (वर्ष २०२३-२४)

| राज्य | एप्रिल ते जून | जुलै ते सप्टें. | एप्रिल ते सप्टें. | ऑक्टो १९ ते सप्टें २३ |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ३६,६३४ | २८,८६८ | ६५,५०२ | ४,७२,८३० |
| कर्नाटक | १२,०४६ | ११,४१४ | २३,४६० | ३,५८,५१७ |
| गुजरात | ५९९३ | १२,८९१ | १८,८८४ | २,५७,९०९ |
| दिल्ली | १५,३५८ | १०,२२५ | २५,५८३ | २,१५,६७६ |
| तामिळनाडू | ५१८१ | ५९३५ | ११,११६ | ७५,२०२ |

### महा गुंतवणूक’ राष्ट्र

-पहिल्या तिमाहीत म्हणजे एप्रिल ते जून २०२३ दरम्यान ३६,६३४ कोटीची परकीय गुंतवणूक आली

-दुसऱ्या तिमाहीत म्हणजे जुलै ते सप्टेंबर दरम्यान २८,८६८ कोटीची

परकीय गुंतवणूक आली

-एप्रिल ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत एकूण ६५,५०२ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली

-कर्नाटक-२३,४६०, गुजरात-१८,८८४, दिल्ली-२५,५८३ ची एकत्रित गुंतवणूक ६७,९२७ कोटी

-दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावरील राज्यात एफडीआय महाराष्ट्राच्या बरोबरीचा

-एप्रिल २०२२ ते सप्टेंबर २०२३ असा एकत्रित एफडीआय १,८३,९२४ कोटी रुपयांचा

### प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के रोजगार

नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेत एका प्रश्नाच्या उत्तरात राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील नवीन औद्योगिक प्रकल्पांविषयी माहिती दिली. सामंत म्हणाले, रायगड जिल्ह्यातील विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजेच सेझ अंतर्गत संपादित केलेल्या एकूण जमिनींपैकी ६५ टक्के जमीन खाजगी मालकीची आहे. ती शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आली असून उर्वरित जमीन जिल्हाधिकारी कार्यालयाने संपादित केली आहेङ लवकरच शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सामंत पुढे म्हणाले, एमआयडीसी क्षेत्रासह इतर उद्योगांमध्ये स्थानिक लोकांना ८० टक्के रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. त्यामुळे भविष्यात नवीन प्रकल्प सुरू झाल्यावर प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के रोजगार देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. येत्या काही महिन्यात रायगड जिल्ह्यात सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे विविध नवीन प्रकल्प सुरू होणार आहेत. कळंबोली येथे ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून पंचतारांकित सुविधा असलेले स्किल सेंटर उभारले जाईल. छत्रपती संभाजीनगरसह अन्य जिल्ह्यांमध्येही अशा स्वरूपाची यंत्रणा उभारली जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

### मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राची घोडदौड

सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक खेचून आणण्यात महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य ठरले आहे. सलग दुसऱ्या तिमाहीत गुंतवणूकीची आकडेवारी येथील सक्षम यंत्रणा, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा, अखंडीत वीज पुरवठा आणि राज्यातील उद्योग विभागावर असणारा परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास दर्शवितो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात राज्यातील भक्कम सरकारची यशस्वी घौडदौड सुरु आहे. भविष्यात अजून मोठी गुंतवणूक राज्यात दाखल होईल, असे उदय सामंत, उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणाले.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसार माध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)*

■■




पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत मास्टर ट्रेनर्ससाठी प्रशिक्षणार्थी (मास्टर ट्रेनर) आणि ToT च्या फॅकल्टीज (सुपर ट्रेनर्स) सोबत ग्रुप फोटो. १४ ते १८ डिसेंबर २०२३ दरम्यान एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे ६ राज्यांच्या (महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, ओडिशा आणि छत्तीसघर) सहभागासह राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम आयोजित केला गेला.




## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आवाहन

# विश्वकर्मा योजना यशस्वी करण्यासाठी उद्योगांनी पुढे यावे

**राज्यातील महायुती सरकार उद्योग क्षेत्रासंबंधी चांगले निर्णय घेत आहे. या शासनाकडून कोणत्याही उद्योजकांवर अन्याय होणार नाही. खाजगी उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनी शासनाच्या धोरणांवर विश्वास ठेवून शासनासोबत यावे आणि मुख्यमंत्री रोजगार योजना, पंतप्रधान विश्वकर्मा योजना यासारख्या योजनांना यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी येथे केले.**

**- प्रतिनिधी**

ठाण्यातील लक्ष्यवेध इन्स्टिट्यूट आयोजित 'बिझिनेस जत्रा २०२३ - सोहळा उद्योजकतेचा, उत्सव महाराष्ट्रीय लघुउद्योजकांचा...!' या बिझिनेस जत्रेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. उद्योगमंत्री सामंत पुढे म्हणाले, नवउद्योजक घडवून त्यांना बळ देण्याचे धोरण शासन अतिशय गांभिर्याने राबवित आहे. महाराष्ट्राने मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेंतर्गत गेल्या वर्षात ५ हजार १६ उद्योजक तयार केले आणि आता गेल्या ९ महिन्यांत १३ हजार २५६ नवउद्योजक उभे राहिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात अनेक मोठ्या प्रकल्पांसोबत १ कोटी ३७ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. रत्नागिरीत कोकाकोला पहिला मोठा प्रकल्प उभा करीत आहोत. यासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत त्यांनी कोकाकोलाच्या सीईओंना सांगितले की, आमच्याकडे तज्ज्ञांपासून ते कामगारांपर्यंत सर्वकाही आहे. याबरोबरच इतर सर्व आवश्यक सुविधाही आहेत. यावर कोकाकोलाच्या सीईओंनी १,५०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले.

**विश्वकर्मा योजना मिशन मोडमध्ये राबविणार :** उदय सामंत म्हणाले, स्मॉल स्केल इंडस्ट्री बळकट होण्यासाठी शासनही पूर्ण क्षमतेने नवउद्योजकांच्या पाठीशी उभी आहे, यापुढेही राहील असे सांगून सामंत म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी भव्य दूरदृष्टी असलेले नेतृत्व आहे. त्यांच्या

संकल्पनेतून साकारलेली पंतप्रधान विश्वकर्मा योजना राज्यात मिशन मोडमध्ये राबविली जाईल. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीच्या माध्यमातून देश निश्चितच बलवान होईल. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरात लघुउद्योजक तयार होतील. ही योजना राबविण्यासाठी केंद्राने महाराष्ट्र राज्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी लागलीच मंजूरही केला आहे. यातून गावेही बळकट होतील.

**बिझिनेस जत्राचे स्वरूप :** बिझिनेस जत्राचे हे तिसरे पर्व असून, या उपक्रमाचे एमएसएमई क्षेत्रात आणि महाराष्ट्रीय उद्योजकांमध्ये विशेष स्थान आहे. लक्ष्यवेध इन्स्टिट्यूट आयोजित बिझिनेस जत्रा २०२३ मध्ये १२० पेक्षा अधिक उद्योगांचे प्रदर्शन स्टॉल, १० हजारपेक्षा अधिक उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लघु-सूक्ष्म मंत्रालय, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ, ठाणे महानगरपालिका, विविध बँका आणि ५० हून अधिक व्यावसायिक संघटनांचे विशेष सहकार्य लाभले. बिझिनेस जत्रा २०२३ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने मॅग्नेटिक महाराष्ट्र उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचा औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मितीचे व्हिजन आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध उद्योगस्नेही धोरणांचे आणि योजनांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच कौशल्य विकास आणि रोजगार मंत्रालयाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत राबविल्या जाणाऱ्या वैद्यकीय सहायता निधी योजना व उपक्रम याविषयी माहिती देण्यात आली. यात इंडस्ट्री ४.०, ब्रँडिंग, महिला उद्योजकता, व्यावसायिक संघ व्यवस्थापन, व्यवसायाचे आर्थिक नियोजन आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजना यासंदर्भात चर्चासत्र आणि परिसंवादाच्या माध्यमातून दिग्गज व्यक्तींचे मार्गदर्शन करण्यात आले.

**गडचिरोलीत ५ हजार हेक्टर जमिनीचे संपादन :** गडचिरोली येथे झालेल्या एका अन्य कार्यक्रमात उद्योगमंत्री सामंत यांनी जिल्ह्यात ५००० हेक्टर जमीन संपादित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली. दावोस येथील औद्योगिक परिषदेमध्ये राज्य शासनाच्या वतीने विविध उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यात आले होते. या कराराची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच गडचिरोलीमध्ये अनेक मोठे उद्योग येण्यास उत्सुक असल्यामुळे हा निर्णय घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

गडचिरोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयात २४ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग विभाग, तसेच जिल्ह्यात येणाऱ्या नियोजित प्रकल्पांबाबत आढावा घेताना ते बोलत होते. सामंत म्हणाले, दिवाळीमध्ये मुख्यमंत्री शिंदे गडचिरोली जिल्ह्यात येऊन गेले. त्यांच्या सूचनेवरून येथील उद्योगांचा आढावा घेण्यासाठी येथे आलो. लॉयड्स मेटल आणि वरद फेरो या दोन कंपन्या जवळपास २२ हजार कोटींची गुंतवणूक जिल्ह्यात करीत आहेत. याबाबत दोन्ही कंपन्यांना संमतीपत्र देण्यात आले आहेत. नवीन उद्योगांसाठी चामोर्शी तालुक्यात १ ते २ हजार हेक्टर जमीन, मुलचेरा येथे ५०० ते १००० हेक्टर जमीन, आरमोरी क्षेत्रात ५०० ते १००० हेक्टर, सिरोंचा येथे ५०० हेक्टर व इतर ठिकाणी अशी एकूण जवळपास ५००० हेक्टर शासकीय जमीन संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गडचिरोली जिल्ह्यात अंबुजा सिमेंट, जे.एस.डब्ल्यू व इतर कंपन्या गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. उद्योगांच्या बाबतीत गडचिरोली जिल्हा राज्यात पहिल्या ५ जिल्ह्यांमध्ये नक्कीच येईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत स्कील सेंटर ही नवीन संकल्पना राबविण्यात येत आहे. आगामी काळात उद्योजकांची परिषद गडचिरोलीमध्ये घेण्याचे नियोजन उद्योग विभाग करीत आहे. येथे येणाऱ्या उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. तसेच वनाच्छादित असलेल्या या जिल्ह्यात पर्यावरणाच्या उपाययोजना करूनच उद्योग उभारण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेंतर्गत अनेक तरुण-तरुणींची १ ते २ लाख रुपयांपर्यंतची कर्जाची प्रकरणे सादर होत असतात. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांद्वारे सदर प्रकरणे नाकारण्याचे प्रमाण ७० टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे. मोठ्या उद्योगांना कर्ज द्यायचे आणि छोटी-छोटी प्रकरणे नाकारायची, ही अतिशय गंभीर बाब आहे. गडचिरोली जिल्ह्यात तर अतिशय कमी रकमेची प्रकरणे असतात. त्यामुळे अशी प्रकरणे त्वरित मंजूर करावीत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन याबाबत दर १५ दिवसांनी आढावा घ्यावा, अशा सूचना त्यांनी केल्या. तर समाजातील १२ बलुतेदारांसाठी राबविण्यात येणारी पी.एम. विश्वकर्मा योजना हा सुद्धा एक उद्योगच आहे. मिशन गडचिरोलीअंतर्गत पी.एम. विश्वकर्मा योजना जिल्ह्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करा. या योजनेंतर्गत १ लाख रुपये देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने घराघरापर्यंत पोहोचावे. या योजनेमध्ये गावातील सरपंच केंद्रबिंदू असल्यामुळे सरपंच, गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचे प्रशिक्षण घ्यावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी महामंडळाचे मुख्य अधिकारी विपीन शर्मा, पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी संजय मिणा, अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील, म.औ.वि.म.चे सहाय्यक मुख्य अधिकारी विजय राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सूर्यवंशी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्नील राठोड यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. ■■



*दिव्यांग कल्याण आयुक्त मा. श्री. प्रवीण पुरी यांना उद्योजक मासिक भेट देऊन दिव्यांगासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत चर्चाविनिमय केली. यावेळी श्री. सुदाम थोटे, विभागीय अधिकारी पुणे/ कोल्हापूर व श्री. मदनकुमार शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, पुणे दिसत आहेत.*




## उद्योग भवन, रत्नागिरी इमारतीचे भूमीपूजन समारंभ

# मा.ना.श्री.उदयजी सामंत, मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा यांचे शुभहस्ते

**जिल्हयाच्या औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी कार्यालयाच्या सध्याच्या इमारतीच्या जागी नव्याने बांधण्यात येणा-या उद्योग भवन इमारतीच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम मा.ना.श्री.उदयजी सामंत, मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा व मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे शुभहस्ते नुकताच संपन्न झाला याविषयी.**

**- प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय अंतर्गत रत्नागिरी येथील उद्योग भवन इमारतीचे भूमीपूजन मा.ना.श्री.उदयजी सामंत, मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा यांचे शुभहस्ते रविवार दि.२९ ऑक्टोबर, २०२३ रोजी जिल्हा उद्योगकेंद्र, रत्नागिरी कार्यालयाच्या प्रांगणामध्ये संपन्न झाले. उद्योग भवनाच्या माध्यमातून खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, विद्युत निरिक्षक कार्यालय, इ. विविध विभाची कार्यालये एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. यामुळे उद्योजकांना विभागांशी संबंधित विविध कार्यालयातील कामांसाठी इतरत्र फिरत रहावे लागणार नाही. महाराष्ट्र राज्यातील सर्वात सुंदर इमारत ही रत्नागिरीच्या उद्योग भवनाची असणार आहे.

सदर कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलनाने झाली, व प्रास्ताविक श्री.दीपेंद्रसिंह कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग) यांनी केले. यावेळी श्री.एम.देवेंदर सिंह, जिल्हाधिकारी, रत्नागिरी; श्री. शनमुगराजन एस, अतिरिक्त विकास आयुक्त; श्री.कीर्ति किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी; श्री.धनंजय कुलकर्णी, पोलीस अधिक्षक; श्री. संजय देगांवकर, उद्योग सहसचिव; श्री. प्रकाश चव्हाण, मुख्य अभियंता, एमआयडीसी; श्री. कालिदास भांडेकर, अधीक्षक अभियंता; श्री. संजय कोरबू, अतिरिक्त उद्योग संचालक; श्रीमती विजू सिरसाठ, उद्योग सह संचालक या मान्यवरांसह श्रीमती विद्या कुलकर्णी , महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी तसेच विविध विभागांचे अधिकारी, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, बँकांचे प्रतिनिधी व उद्योजक उपस्थित होते.

जिल्हयाच्या औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी कार्यालयाच्या सध्याच्या इमारतीच्या जागी नव्याने बांधण्यात येणा-या उद्योग भवन इमारतीच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम मा.ना.श्री. उदयजी सामंत, मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा व मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे शुभहस्ते व रविवार दि.२९ ऑक्टोबर, २०२३ रोजी जिल्हा उद्योग केंद्र, संपन्न झाला. ४० वर्षापूर्वी बांधलेल्या इमारतीच्या जागी नवीन इमारत प्रस्तावित करुन मा. उद्योग मंत्री तथा पालकमंत्री यांनी जिल्हयातील उद्योग क्षेत्राला अनोखी भेट दिली आहे. बदललेल्या काळानुसार नव्याने निर्माण झालेल्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने इमारतीची रचना प्रस्तावित असून यासाठी सुमारे रु.३८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. नवीन इमारतीमध्ये कॉन्फरन्स



हॉल, अतिथीकक्ष, बहुउददेशीय केंद्र, इ.सुविधांचा अंतर्भाव आहे. उद्योग भवनामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, विद्युत निरिक्षक कार्यालय, इ. विविध शासकीय विभागांची कार्यालये एकाच छताखाली येऊन उद्योजकांना उद्योग विभागाशी संबंधित विविध कार्यालयातील कामांसाठी इतरत्र फिरत रहावे लागणार नाही.

केले. यावेळी जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी सर्व प्रकारच्या सेवासुविधा अशा उद्योग भवनाच्या माध्यमातून दिल्या जातील अशी माहिती दिली. पायाभूत सुविधांचा विकास करणे, निर्यातीला प्रोत्साहनपर आवश्यक निर्णय घेणे, एक खिडकी योजनेतुन सुविधा देणे, यासाठी उद्योग मित्र कायदा झाला असून अशा उद्योग भवनाच्या माध्यमातून या सेवा देण्यात येणार आहेत. ८ हजार २०३ अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी ७ हजार ९१३ अर्जांना





कार्यक्रमाच्या वेळी बोलताना मा. मंत्री (उद्योग) यांनी मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त राज्यात उद्योग भवन उभारण्याचा निर्णय मा. मुख्यमंत्री यांनी जाहीर केला होता. त्यातील पहिल्या उद्योग भवनाचे भूमीपूजन होत आहे. मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयांसह अशी १८ उद्योग भवन उभारण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजने अंतर्गत यापुर्वी वर्षाला ५००० प्रकरणे मंजुर करण्यात आली होती मागील वर्षांमध्ये १२५०० प्रकरणे राज्यात मंजूर झाली आहेत. उद्योग मित्र समित्यांच्या बेठका सातत्याने झाल्या पाहिजेत. उद्योग वाढीसाठी ज्या-ज्या सूचना असतील त्या यामधुन आल्या पाहिजेत असेही मंत्री महोदय यांनी सुचित

परवानगी देण्यात आली आहे, हे याचे यश आहे, असे सांगितले. जिल्हा उद्योग मित्र समितीचे सदस्य श्री. प्रशांत पटवर्धन यांनीही यावेळी मनोगत व्यक्त करुन मैत्री कायदा फायदेशीर असल्याबाबत मत मांडले. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.संजय देगांवकर, सह सचिव (उद्योग) यांनी केले.

रत्नागिरी जिल्हयासाठी परिवर्तनकारी अध्याय म्हणून उद्योग संचालनालयाच्या नवीन इमारतीचे भूमीपूजन मा. मंत्री (उद्योग) व मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे उपस्थितीत पार पडला. सदरचे उद्योग भवन राज्यात समृध्दी आणि औद्योगिक प्रगतीचा पाया रचणारा आहे. ■■




## उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांच्या परिषदेत उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आवाहन

# पीएमइजीपी, सीएमईजीपी, उद्योग विभागाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवून इतिहास घडवा...

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अधिकाऱ्यांनी तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करुन राज्यात इतिहास घडवा. उद्योग विभागाच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी योगदान द्या, असे आवाहन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. तर उद्योग विभागाचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना यशोगाथा पुस्तिका कानाकोप-यातील जनतेपर्यंत/उद्योजकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिका-यांनी मोलाची भुमिका बजावण्याच्या सुचनाही त्यांनी केल्या. उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक व उपसंचालकांसाठी रत्नागिरी येथे आयोजित दोन दिवसीय परिषदेत ते बोलत होते. - प्रतिनिधी**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अधिकाऱ्यांनी तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करुन राज्यात इतिहास घडवा. उद्योग विभागाच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी योगदान द्या, असे आवाहन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. तर उद्योग विभागाचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना यशोगाथा पुस्तिका कानाकोप-यातील जनतेपर्यंत/ उद्योजकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिका-यांनी मोलाची भुमिका बजावण्याच्या सुचनाही त्यांनी केल्या. रत्नागिरी येथील सावंत पॅलेस हॉटेल मधील सभागृहात रविवार, दि.२९ व ३० ऑक्टोबर २०२३ रोजी राज्यातील सर्व विभागीय अधिकारी व महाव्यवस्थापक यांच्या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन उद्योग मंत्री सामंत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.




उद्योग संचालनालय यांच्या वतीने रत्नागिरी येथे आयोजित दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन मा. मंत्री (उद्योग) यांच्या हस्ते झाले. उद्योग विभागाच्या योजना सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचवणे हे विभागाचे काम आहे. सामान्य माणूस उद्योजक कसा निर्माण करता येईल यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम जास्तीत जास्त ग्रामीण भागापर्यंत पोहोचवून उद्दिष्ट पूर्ण केले पाहिजे असे याप्रसंगी सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंच्या मराठी व इंग्रजी भाषेत छापलेली यशस्वी उद्योजकांची यशोगाथा पुस्तिकेचे मा. मंत्री (उद्योग) यांनी प्रशंसा केली व सदर यशोगाथा तसेच उद्योजक मासिकाचे कानाकोप-यातील उद्योजकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिका-यांनी मोलाची भुमिका बजावण्याच्या सुचनाही त्यांनी केल्या. यावेळी विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त शनमुगराजन एस, उद्योग सहसचिव संजय देगावकर, अतिरिक्त उद्योग संचालक संजय कोरबू, उद्योग सहसंचालक विजू सिरसाठ तसेच राज्यातील सर्व उद्योग सह संचालक, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, उद्योग उपसंचालक, MCED व MITCON आदी अधिकारी उपस्थित होते.


उद्घाटनानंतर परिषदेत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले, नोकरीत येण्यापूर्वी प्रत्येकाने केलेला संघर्ष सातत्याने डोळ्यासमोर ठेवून कामकाज करावे. जनतेशी चांगला संवाद ठेवावा. चांगला जनसंपर्क ठेवावा. उद्योग जगतातून अधिकाधिक उद्योजक घडविल्याचे अधिकाऱ्यांनी जनतेपर्यंत जावून सांगावे. जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून उद्योग विभागाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवाव्यात. ग्रामसेवक, तलाठी या कर्मचाऱ्यांच्याही कार्यशाळा घेऊन उद्योग निर्माण करणाऱ्या योजना लोकांपर्यंत पोहोचवाव्यात.

३५ टक्के शासनाची आणि ५ टक्के कर्जदाराची अशी ४० टक्क्यांची हमी




देत असतानाही, कर्ज प्रकरणे मंजूर होण्यासाठी बँकावर आदरयुक्त भीती असायला हवी. या कार्यशाळेतून काहीतरी घेऊन जाताना ते वर्षभरात कामातून दिसलं पाहिजे, अशी अपेक्षाही उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी बोलून दाखविली.

सदर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी विकास आयुक्त (उद्योग) श्री. दीपेन्द्र सिंह कुशवाह यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, मागील वर्षीपेक्षा जवळपास सहा लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची नोंदणी वाढली असून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात `IGNITE' Maharashtra कार्यशाळा आयोजित करून उद्योग विभागाच्या योजना, सोयी-सवलतींबाबत सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. उद्योग विभागाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी या कार्यशाळेचा निश्चित उपयोग होईल. मैत्री कायद्याचा फायदा उद्योजकांना होत आहे. सेवा हमी कायद्याप्रमाणे ७ हजार ९१३ अर्जदारांना वेळेत सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. नव्या पॉलिसीचे ड्राफ्ट करण्यात येत असून, उद्योग विभागामार्फत दहासूत्री कार्यक्रम घेण्यात आला आहे, असेही ते म्हणाले.



परिषदेच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी कोकण विभागास सोपविण्यात आली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. मंत्री (उद्योग), मा.विकास आयुक्त (उद्योग) व मान्यवरांचे स्वागत सरस्वती मानवंदना सुश्राव्य सतार वादनाने स्वागत करुन दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. उद्योग विभागाच्या योजनें अंतर्गत स्थापित मिरज म्युजिकल क्लुस्टरचे श्री.मोहसिन मिरजकर यांचे मार्फत सतार वादन सादर केले. उपस्थित मान्यवरांना, कोकण विभागातील एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) चे प्रतिक म्हणून ठाणे जिल्हयातील-मिलेट प्रोडक्ट्स, रायगड, पालघर व रत्नागिरी जिल्हयातील फिश प्रोडक्ट, आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा व काजू उत्पादनाचे (ODOP) सुशोभित बास्केट भेट म्हणून देण्यात आल्या. तसेच परिषदेमध्ये पालघर जिल्हयाची ओळख असलेली वारली पेंटिग केलेले नोट पॅड देण्यात आले. अशाप्रकारे परिषदेमध्ये कोकण विभागाची वैशिष्टपूर्ण ओळख विभागाच्या सहसंचालक व महाव्यवस्थापक अधिका-यांनी सादर केली.



कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना उद्योग सहसंचालक श्रीमती सिरसाठ यांनी उपस्थित अधिकाऱ्यांच्या वतीने मंत्री महोदयांना आश्वासित केले की, मंत्री महोदयांनी उद्योग विभागाच्या क्षेत्रीय कामकाजाविषयी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, त्या निश्चितच पूर्ण केल्या जातील. सर्व अधिकारी झोकून देवून काम करतील. उद्योग विभागाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी संपूर्ण योगदान दिले जाईल.

अधिका-यांच्या दोन दिवसीय परिषदेत विविध योजनांचा आढावा घेणे, नवीन धोरणांचे सादरीकरण इ. चा अंतर्भाव होता. सदर परिषदेत समूह विकास कार्यक्रमाबाबत उद्योग सहसंचालक श्री. सुरेश लोंढे यांनी सविस्तर आढावा घेतला. श्रीमती देवराज, अधिक्षकीय उद्योग अधिकारी यांनी ‘मैत्री कायदा -२०२३’ व मैत्री सेलबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त उद्योग विकास आयुक्त श्री. शनमुगराजन एस. यांनी मैत्री कायदाबाबत आपल्या जिल्ह्यातील सर्व उद्योजकांना अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी असे सांगितले. विकास आयुक्त (उद्योग) श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह व अतिरिक्त उद्योग संचालक श्री. संजय कोरबू यांनी उपस्थित अधिकाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन शंकांचे समाधान केले. श्री. संजय कोरबू यांनी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाकडून महाराष्ट्रात २० विस्तार केंद्र स्थापित करण्यासाठी जागा देवू केलेली आहे. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सदर जागेची त्वरित पाहणी करून अहवाल सादर करण्याबाबत सुचविले. त्यानंतर मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाबाबत उद्योग सहसंचालक श्री.एस.एस.सुरवसे यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला. यावेळी विकास आयुक्त(उद्योग) यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना १००%



उद्दिष्टपूर्ती करण्याचे आवाहन करून यासाठी धोरणात्मक नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. श्री. संजय देगावकर, उद्योग सहसचिव, महाराष्ट्र शासन यांनी उद्योग विभागाच्या विविध योजना जसे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, समूह विकास योजना, औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजना, सहकारी औद्योगिक वसाहत, एकात्मिक प्रोत्साहन योजना, इ. योजनांअंतर्गत उपलब्ध निधी व खर्चाबाबत माहिती देवून या योजनांची १००% उद्दिष्टपूर्ती करण्याचे आवाहन केले. तसेच विधिमंडळ प्रश्न, तारांकित प्रश्न,लोकसभा प्रश्न,लक्षवेधी, स्थगन प्रस्ताव, विधानमंडळ, इ. बाबतसुद्धा मार्गदर्शन केले.

सदर परिषदेमध्ये जिल्हास्तरावर काम करताना येणा-या समस्या व अडीअडचणींवर चर्चा करण्यात आली. मु.रो.नि.का चे उदिष्ट १००% साध्य केलेल्या अधिकाऱ्यानी त्यांचे अनुभव कथन केले. तसेच उद्योग सहसंचालक श्रीमती विजु सिरसाठ यांनी CMEGP योजनेचा राज्यस्तरीय कामाचा अनुभव व विभागीय स्तरावरील अनुभवातून, योजनेचे ३०,००० प्रकरणांचे उद्दीष्ट पूर्ततेसाठी राज्य/विभागीय/जिल्हा स्तरावर मोठया प्रमाणात विविध मेळावे, आढावा बैठका, जागरुकता कार्यक्रम राबविण्यात येतात त्यातूनही संभाव्य अर्जदार सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहता कामा नये याकीरता बँकांच्या वेबसाइटवर "Government Supportive Scheme" या टॅब अंतर्गत "Chief Minister Employment Generation Programme" टॅब उपलब्ध करुन देण्याचे सूचविले, ज्यामुळे योजनेची बाजारपेठेत अनोखी छाप पडून व्यापक प्रमाणात जागरुकता निर्माण होईल आणि कोणताही संभाव्य अर्जदार अस्पर्शित राहणार नाही असे मत व्यक्त केले.

परिषदेमध्ये विभागातील अधिकारी यांना तणावमुक्त, जलदगतीने अचूक काम करणे, कार्यक्षमता वाढणे याकरिता सदर कार्यक्रमात कंपास बिझनेस मॅनेजमेंटचे फाऊंडर श्री. विनय सावंत यांचे प्रेरक सत्राचे (Motivational Session) आयोजन करण्यात आले व अधिका-यांना लाभ उपलब्ध करुन देण्यात आला.

उद्योग विभागातील अधिकारी यांच्या सदर दोन दिवसीय कार्यशाळेत



उद्योग विभागाच्या विविध योजना आणि धोरणे याबाबत अभ्यासपूर्ण चर्चेने राज्याचा औद्योगिक शाश्वत विकास आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी एकत्रित प्रयत्नांची व विचारांची देवाणघेवाण, धोरणात्मक चर्चा, सर्व समावेक्षक विकासाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत गतीशील राहील. सदर दोन दिवसीय परिषदेमध्ये कोकण विभागाची वैशिष्टपूर्ण ओळख प्रदर्शित करुन केलेले आयोजन उत्कृष्ट असल्याचे व परिषद यशस्वी संपन्न झाल्याने विकास आयुक्त(उद्योग) श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी कोकण विभागाचे सहसंचालक श्रीमती विजु सिरसाठ, रत्नागिरी जिल्हयाच्या महाव्यवस्थापक श्रीमती विद्या कुलकर्णी व विभागातील इतर अधिका-यांचे मनापासून कौतुक केले. या परिषदेत उद्योग सहसंचालक श्री. सदाशिव सुरवसे, उद्योग सहसंचालक/कार्यकारी संचालक, मउविके श्री.बी.टी.यशवंते यांचे सहकार्य लाभले, तांत्रिक सहाय्य अधिक्षकीय उद्योग अधिकारी श्री. संदीप रोकडे, श्री. विवेक तोंडरे, श्री. स्वप्नील आफळे यांनी विविध विषयांच्या सादरीकरणासाठी सहाय्य केले. या दोन दिवसीय परिषदेचे आभारप्रदर्शन महाव्यवस्थापक सौ. विद्या कुलकर्णी यांनी केले. परिषद यशस्वीतेसाठी महाव्यस्थापक ठाणे श्रीमती. सीमा पवार, महाव्यस्थापक पालघर श्रीमती दराडे, रायगड श्री हरळय्या, सिंधुदंर्ग श्री दामले तसेच विभागातील उद्योग अधिकारी श्री.अमरजित गायकवाड, श्री. मेमाणे, श्री. गायकवाड, श्री. खिरळे, श्री. माने, श्री. हरिभाऊ आंधळे, श्री. प्रशांत पाटील, इ. तसेच कोकण विभाग/जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाचे उद्योग निरीक्षक / कर्मचारी व मउविके अधिकारी, कार्यक्रम समन्वयक व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. ■■








## दिनांक १७ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२३

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना गतिमानता पंधरवडा मोहिम

**विकास आयुक्त (उद्योग) श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी पुढील पंधरा दिवस दि. १७ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२३ पर्यंत मुख्यमंत्री रोजगार योजना गतिमानता पंधरवडा घोषित केला आहे. हा पंधरवडा यशस्वी होण्यासाठी उद्योग संचालनालय आणि खादी व ग्रामोद्योग विभागाच्या अधिनस्त सर्व महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी व जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी/कर्मचारी यांनी केवळ मुख्यमंत्री रोजगार निमिर्ती योजनेचे काम करावयाचे आहे याविषयी. -प्रतिनिधी.**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) हा उद्योग विभाग, महाराष्ट्र शासनाचा फ्लॅगशिप कार्यक्रम असून, युवक युवतींना उद्योजक बनविण्यासाठी सक्षम करणारी आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणारी योजना आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत, सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षाकरिता संपूर्ण राज्यासाठी ३०,००० कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले असून अनुदान वाटपासाठी ५४१ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत कोकण विभागास ५००० कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, अद्याप पर्यंत १०५७ कर्जप्रकरणे मंजूर झाले असून त्याचे प्रमाण लक्षांकाच्या १९ टक्के आहे. त्यामुळे, श्री. दिपेंद्रसिंह कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग) यांनी पुढील पंधरा दिवस दि. १७ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२३ पर्यंत मुख्यमंत्री रोजगार योजना गतिमानता पंधरवडा घोषित केला आहे. यासाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत -- सर्व महाविदयालये, अभियांत्रिकी महाविद्यालयात तसेच शासकीय व खाजगी ITI, अशासकीय संस्था येथे योजनेचे जनजागृती मेळावे, प्रचार व प्रसिद्धी आयोजित करून पात्र लाभार्थ्याचे जागेवर अर्ज भरून घेण्याचे कार्यवाही करावी. हे अर्ज तात्काळ पोर्टलवर upload करणे. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना जसे कि MCED, मिटकॉन, RSeti, skill development येथील तरुण-तरुणींची यादी घेऊन त्यांना या योजनेची माहिती द्यावी. महिला मेळावे घेणे ज्यामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद, महिला बचत गट यांना संपर्क साधून महिलाना प्राधान्याने या योजनेत सहभागी होण्यासाठी कृती आराखडा तयार करून काम करणे.

जिल्ह्यातील सर्व महामंडळे आणि NGO यांना संपर्क साधून लाभार्थी योजनेत सहभागी करून घेणे. एक बँक - एक प्रकरण यासाठी सर्व बँक मॅनेजर यांना संपर्क करून योजनेत सहभाग वाढविणे. एक गाव किमान एक प्रकरण याप्रमाणे काम करणे. एक जिल्हा एक वस्तू याप्रमाणे जिल्ह्यातील उद्योगांना प्राधान्य देणे. औद्योगिक समूह योजनेतील लाभार्थींना लाभ देणे. मासिक, त्रैमासिक बँकेच्या मिटिंगसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठका आयोजित करणे व विस्तृत पाठपुरावा / समन्वय करणे. बँकेत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा पाठपुरावा करून जास्तीत जास्त प्रकरणे मंजूर करून घेणे.

वरील सूचनांचे पालन करून सर्व जिल्ह्यांमध्ये बँकाकडे प्रलंबित प्रकरणाबरोबर लक्षांकाच्या दोन ते अडीच पट प्रकरणे बँकांना पुढील पंधरा दिवसात पाठविण्याची कार्यवाही पूर्ण करणे. डिसेंबर अखेरपर्यंत ५० टक्के मंजुरीचे उदिष्ट व २५ टक्के क्लेम सादर करण्याची कार्यवाही पूर्ण करणे निश्चित केलेली आहे. या पंधरा दिवसात कोणतीही सुट्टी अधिकारी/कर्मचाऱ्यांना घेता येणार नाही. तसेच सर्व महाव्यवस्थापक व जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी एकत्रित दररोज काम करून याबाबतचा आढावा विभागीय सहसंचालक यांनी मुख्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर पंधरवडा यशस्वी होण्यासाठी राज्यभर विभागीय / जिल्हास्तरावर महाव्यवस्थापक व जिल्हा ग्रामोद्योग आधिकारी / कर्मचारी यांचेमार्फत तालुकानिहाय जनजागृती मेळावे, प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत असून पात्र लाभार्थ्यांचे जागेवर अर्ज भरुन घेण्यात येत आहे. महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालयात तसेच शासकीय व खाजगी ITI, अशासकीय संस्था येथेही योजनेची व्यापक प्रमाणात माहिती देण्यात येत आहे. याशिवाय MCED, मिटकॉन, RSeti, skill development येथील तरुण तरुणींना योजनेची माहिती देण्यात येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद, महिल ा बचत गट यांना संपर्क साधून महिलांना प्राधान्याने या योजनेत सहभागी होण्यासाठी विविध ठिकाणी महिलांकरिता मेळावे घेण्यात येत आहेत. 'एक बँक - एक प्रकरण' याकरिता बँकस्तरावर बैठका घेवून त्यांचाही सहभाग योजनेमध्ये घेण्यात येत आहे. तसेच जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने 'एक गाव किमान एक प्रकरण' असेही मेळावे राबविण्यात येत आहेत. एकंदरीत, योजनेच्या गतिमानता पंधरवडयाच्या पहिल्या आठवड्यात राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३००० पेक्षा अधिक अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले आहेत. योजनेच्या गतिमानता पंधरवडयाच्या दुसऱ्या आठवड्यात जनजागृती मेळाव्यासह अपूर्ण अर्ज पुर्ण करणे, करणे व जिल्हाधिकारी स्तरावरील बैठका घेवून प्रकरणे बँकांना शिफारस करणे, मार्जिन मनी क्लेम करणे, इत्यादीबाबींकडेही लक्ष दिले जाणार आहे, त्यामुळे, राज्यभरात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना गतीमानता पंधरवडाचा लाभ सर्व नवउद्योजकांनी घ्यावा, असे आवाहनही करण्यात येत आहे. जेणेकरून या योजनेंतर्गत आपल्या जिल्ह्यांना देण्यात आलेले उद्दिष्टपूर्तता करणे शक्य होईल. ■■



## ५.८१ लाख कोटीसह राज्य दुसऱ्या क्रमांकावर

# देशाच्या निर्यातीत महाराष्ट्राचा १६.०५ % वाटा

**उद्योग क्षेत्रातील सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक खेचून आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. तर राज्यातील तयार मालालाही परदेशात पसंती मिळत आहे. यामुळेच गेल्या ५ वर्षात राज्याच्या निर्यातीत दरसाल तब्बल ६ टक्क्यांची वाढ होत आहे. तर ५.८१ लाख कोटीच्या निर्यातीसह महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशाच्या एकुण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा थोडाफार नव्हे तर १६.०५ टक्के आहे हे विशेष. राज्यातील निर्यातीला चालना देणाऱ्या धोरणांमुळे हे यश गाठता आले आहे.**

**- प्रतिनिधी.**

महाराष्ट्र हे भारताच्या निर्यातीत सर्वाधिक योगदान देणाऱ्या राज्यांपैकी एक आघाडीचे राज्य आहे. राज्याचे निर्यात धोरण, प्रोत्साहन आणि व्यापार सुलभीकरण उपक्रमांद्वारे महाराष्ट्र जागतिक व्यापारात आपला वाटा सतत वाढवत आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये तब्बल ५.८१ लाख कोटीच्या निर्यातीसह महाराष्ट्र देशातील सर्वाधिक निर्यात करणारे दुसरे राज्य ठले. या काळात देशाच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा सुमारे १६.०५% होता. गेल्या पाच वर्षांत म्हणजे आर्थिक वर्ष २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०२२-२३) दरम्यान राज्यातील निर्यातीत दरसाल ६ टक्क्यांची वाढ होत आहे.

निती आयोगाने प्रकाशित केलेल्या २०२०, २०२१ आणि २०२२ च्या निर्यात तयारी निर्देशांकात (इंड्) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातून सर्वाधिक निर्यात होणाऱ्या मालामध्ये हिरे, हिरे आणि सोन्याचे दागिने, मोटारसायकली, औषधे, शुद्ध साखर, वाहनांचे पार्ट्स आणि ॲक्सेसरीज, बोनलेस, फ्रोझन मीट, हिरे (प्रयोगशाळेत तयार केलेले) आणि सोन्याचे सामान्य दागिने यांचा समावेश ओह. तर राज्यातून निर्यात केल्या जाणाऱ्या टॉप १० देशांमध्ये यूएसए, यूएई, हाँगकाँग, बेल्जियम, यूके, चीन, सिंगापूर, नेदरलँड, जर्मनी आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

### देशातील हस्तकलेला जोडणारा कार्यक्रम

फोटो कॅप्शन-केंद्र शासनाच्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या (पीआयबी) संपर्क कार्यक्रमात वन डिस्ट्रीक्ट वन प्रॉडक्ट म्हणजेच (ओडीओपी-एक जिल्हा एक उत्पादन) च्या क्षमता अधोरेखीत करण्यात आल्या.

केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय आणि केंद्र शासनाची प्रसिद्धी यंत्रणा प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या (पीआयबी) संयुक्त विद्यमाने ५ सप्टेंबर २०२३ रोजी देशव्यापी एक जिल्हा एक उत्पादन-पीआयबी संपर्क कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून एमएसएमईला चालना देण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन केले होते. कार्यक्रमाला उद्योग क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत करण्यात आले. यात प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेचे कान्सुलेट जनरल आंद्रेया कुहन आणि राज्यातील प्रसिद्ध उद्योगपतींचा समावेश होता. त्यांनी राज्यातील ओडीओपी उत्पादने तसेच येथील सांस्कृतिक व आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी आवश्यक

धोरणांबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रात, या कार्यक्रमात पारंपारिक हस्तकलाकार आणि त्यांच्या उत्पादनांवर प्रकाश टाकण्यात आला. ओडीओपी कार्यक्रमाबद्दल जागरुकता वाढवून तो यशस्वी करण्यासाठी आवश्यक सूचना करण्यात आल्या. देशातील विविध भागातील उत्पादनांच्या विक्रीतून झालेल्या बदलाच्या यशोगाथा मांडण्यात आल्या. त्या माध्यमांपर्यंत पोहचवून अधिकाधिका प्रसिद्धीसाठी प्रयत्न करण्यात आले.

संपर्क कार्यक्रमाद्वारे ओडीओपी योजनेचा मुख्य उद्धेश प्रमुख भागीदारांपर्यंत प्रभावीरित्या पोहचविण्यात पीआयबी यशस्वी झाले. पीआयबीने उपस्थितांचे म्हणने थोडक्यात मांडून त्यांनी घेतलेल्या मेहनतीचा संदेश समाजातील आवश्यक घटकापर्यंत पोहचविला. हा संपर्क कार्यक्रम भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने पीआयबीच्या सहकार्याने सुरू केलेला देशव्यापी उपक्रम आहे. या माध्यमातून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची (एमएसएमई) वाढ आणि स्वदेशी उत्पादनांच्या विकासाला प्रोत्साहन देणे हे उद्धिष्ट आहे. हा कार्यक्रम सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना संभाव्य खरेदीदार आणि गुंतवणूकदारांपर्यंत पोहचण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून उपयोगी ठरले. तर यामुळे ओडीओपी उत्पादनांना ब्रँड प्रस्थापित करणे आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील व्यापाराला चालना देण्याचा मार्ग खुला झाला.

**प्रगतीसाठी दोन सामंजस्य करार** : महाराष्ट्र राज्य सातत्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी सक्रिय चर्चेद्वारे सहयोगात्मक भागीदारीसाठी प्रयत्न करत असतो. नुकतेच राज्याने कोरिया-इम्पोर्टर्स असोसिएशन आणि ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्ससाठी सामंजस्य करार केले. या कराराचे उद्धिष्ट विविध क्षेत्रांसाठी कौशल्य, संसाधने आणि समर्थन मिळवणे हे आहे. तर हे करार भागधारकांना विपणन, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि तंत्रज्ञानाचा अवलंब, वाढ आणि प्रगतीसाठी उपयोगी ठरतील. दोन्ही देशातील धोरणात्मक भागीदारीसाठी हे करार महत्त्वाचे ठरणार आहेत.

**कोरिया-इम्पोर्टर्स असोसिएशन** : ११ सप्टेंबर रोजी स्वाक्षरी करण्यात आलेला हा सामंजस्य करार दोन्ही देशातील व्यापाराला बळकटीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल. करारामुळे ज्ञानाची देवाणघेवाण तसेच औद्योगिक विकास, व्यापार सुलभता आणि संभाव्य गुंतवणुकीसाठी एकत्रितरित्या काम करण्याचा मार्ग खुला करून देईल.

**ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्स (ONDC)**: सद्याच्या बाजारपेठेत ई-कॉमर्सचा सुमारे ४.३% वाटा आहे. त्यात भविष्यात मोठी वाढ होणार आहे. या शक्यतांचा विचार करता राज्याने अधिक समावेशक आणि प्रवेशयोग्य इकोसिस्टमला प्रोत्साहन देण्यासाठी ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्स- ONDC सोबत भागीदारी केली. यामाध्यमातून ग्राहकांना विस्तृत निवड, स्थानिक व्यवसायास प्राधान्य आणि व्यवसायाची विश्वासहर्ता प्रदान होईल. हे सामंजस्य करार विविध क्षेत्रांमधील वाढ आणि विकासासाठी महाराष्ट्राच्या सहभागाचे दर्शन घडवितात. यातून महाराष्ट्राची आर्थिक विकासासाठी कटिबद्धता अधोरेखित होते

**महाराष्ट्राच्या निर्यात क्षमतांना चालना देणारे धोरण** : राज्याच्या निर्यातीला चालना देण्यासाठी तसेच ओडीओपीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्राने नुकतीच निर्यात प्रोत्साहन धोरण जारी केले आहे. या धोरणात जागतिक मूल्य साखळीतील राज्याचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. २०२७-२८ या आर्थिक वर्षापर्यंत महाराष्ट्रातून दुप्पट म्हणजेच १५० बिलीयन्स अमेरिकी डॉलर्सची निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निर्यात धोरणात निर्यात-केंद्रित इंडस्ट्रियल पार्क विकसीत करण्याचा समावेश आहे.

या धोरणात ओडीओपी आणि आणि भौगोलिक मानांकित (GI) उत्पादने यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. याद्वारे विविध जिल्ह्यांतील विशिष्ट उत्पादनांना जगासमोर आणून त्यांची विक्री वाढविण्यासाठी, बाजारपेठेत त्यांचे ओळख करून देण्यासाठी ब्रँडिंगवर भर दिला जाईल.

निर्यात धोरणात निर्यात सुलभतेसाठी महाराष्ट्र निर्यात प्रोत्साहन परिषद (MEPC) आणि निर्यात सुविधा सेल (EFC) यासारख्या संस्थात्मक व्यवस्था स्थापन करण्याचाही समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून निर्यातदारांना मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाईल. तर सिंगल-विंडो क्लीयरन्स सिस्टम तयार करून निर्यात सुलभतेवरही (EoDE) भर देईल. महाराष्ट्राचे निर्यात धोरण हे निर्यातीला प्रोत्साहन देणाऱ्या तसेच लॉजिस्टिक, आयटी/ आयटीईएस आणि वस्त्रोद्योग धोरणे असणाऱ्या अन्य राज्यांच्या धोरणांशी समन्वय साधणारे आहे. यामुळे राज्याला निर्यात प्रोत्साहनासाठी व्यापक दृष्टिकोन मिळणार आहे. ■■



*महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रम माननीय श्रीमती रिटा सेनगुप्ता, माजी संचालक, निसबुड, नवी दिल्ली आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये त्यांच्या शुभहस्ते मुख्यमंत्री रोजगार निर्मिती वाचन साहित्याचे प्रकाशन करतांना. दिसत आहेत. सोबत एमसीईडीचे कार्यकारी संचालक श्री. बी.टी. यशवंते व एमसीईडीचे अधिकारी दिसत आहेत.*




## उद्योग विभागातर्फे ३६ जिल्ह्यात आयोजन

# राज्याच्या आर्थिक समृद्धीसाठी इग्नाईट'अभियान

**महाराष्ट्र हे भारतातील आघाडीचे राज्य असून देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा सुमारे १३ टक्के वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन्स अमेरिकी डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवले असून यात महाराष्ट्र २०२८ पर्यंत १ ट्रिलीयन्स डॉलर्सचा वाटा उचलणार आहे. त्या दृष्टीने राज्याची आर्थिक प्रगती साधण्यासाठी उद्योग विभागाने कंबर कसली आहे. राज्यातील उद्योगस्नेही वातावरण तसेच औद्योगिक आणि गुंतवणूकीच्या क्षमतांची जाणिव करून देण्यासाठी उद्योग विभागाशी संबधित स्टेकहोल्डर्ससाठी आर्थिक सर्वसमावेशक परिवर्तन आणि सक्षमीकरणासाठी औद्योगिक विकास नेटवर्किंग (IGNITE)' अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. ५ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर दरम्यान सर्व ३६ जिल्ह्यात आयोजित कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला. - प्रतिनिधी.**

महाराष्ट्र हे देशातीले महत्त्वाचे व मोठे राज्य असून आर्थिक वर्ष २०२२ मध्ये ४४४ बिलीयन्स डॉलर्सच्या उलाढालीसह राज्याचा देशाच्या जीडीपीमध्ये सुमारे १३ टक्के वाटा राहिला. २०१४ मध्ये भारताची अर्थव्यवस्था जगात १० व्या स्थानावर होती. आता ती ५ व्या स्थानावर आली आहे. २०२८ पर्यंत ५ ट्रीलीयन डॉलर्ससह भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील करण्याचा पंतप्रधान मोदींचा मानस आहे. पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राने २०२८ पर्यंत १ ट्रीलीयन्स डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा उचलण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्याचा विकास वृद्धी दर ८.५० टक्के आहे. राज्याला २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट गाठण्यासाठी ११ टक्के वृद्धी दर गाठावा लागेल. त्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे.

राज्याची आर्थिक स्थिती भक्कम असतांनाच यूके इंडिया बिझनेस कौन्सिलच्या डुइंग बिझनेस इन इंडिया' अहवालानुसार इझ ऑफ डुइंग बिझनेसच्या बाबतीत महाराष्ट्र सातत्याने उच्च स्थानावर आहे. देशात महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक २,२५,०७३ रुपये एवढे आहे. इंडियाज स्किल रिपोर्ट २०२१' नुसार कुशल मणुष्यबळ जोपासण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. यातून महाराष्ट्राची आर्थिक समृद्धी अधोरेखीत होते. तर सुशासन निर्देषांकात (गुड गव्हर्नन्स इंडेक्स) मध्ये राज्याचे स्थान अव्वल असून ते राज्यातील सकारात्मक औद्योगिक वातावरणाची ग्वाही देते.

देशाच्या विकासात महाराष्ट्राच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणिव करून देण्यासाठी राज्याच्या उद्योग विभागाने ५ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर २०२३ दरम्यान सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जागरूकता अभियान मोहीम आर्थिक सर्वसमावेशक परिवर्तन आणि सक्षमीकरणासाठी औद्योगिक विकास नेटवर्किंग म्हणजेच Industrial Growth Networking for Inclusive Transformation and Empowerment (IGNITE)' चे आयोजन केले होते. या अभियानातून उद्योग व व्यवसाय क्षेत्राशी संबंधित सर्व भागीदारांना राज्याची आर्थिक ताकद, गुंतवणुकीची क्षमता आणि व्यवसायासाठी अनुकूल वातावरण याविषयी प्रबोधन करण्यात आले.

**इग्नाईट अभियानातून अमर्याद संधी :** राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये इग्नाईट अभियानाचे आयोजन करण्यात आले. याद्वारे राज्यातील उद्योजक आणि व्यावसायिकांना आर्थिक जागरूकता आणि प्रगतीला चालना देण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यात आले. प्रत्येक सत्राला सरासरी २५० हुन अधिक स्टेकहोल्डर्स उपस्थित होते. प्रत्येक कार्यशाळेमध्ये माहितीपूर्ण चर्चा, सादरीकरणे आणि औद्योगिक परिसंस्थेच्या विविध भागधारकांमधील सकारात्मक संवादांचा समावेश होता. प्रत्येक कार्यशाळा उपस्थितांना समृद्ध करून गेली.

### कार्यशाळेची उद्दिष्टे

**जागरूकता निर्माण करणे :** उद्योग विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती उद्योजक आणि भागधारकांपर्यंत पोहचविणे.

**व्यासपीठ निर्माण करणे :** उद्योजकांना कर्ज पुरवठा, लॉजिस्टिक, डिजिटल ई-कॉमर्स, प्रशिक्षण, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि गुणवत्ता या विषयांवर प्रबोधनासाठी व्यासपीठ प्रदान करणे.

**परस्पर संवाद वाढविणे :** कार्यशाळेत सहभागी उद्योजक, व्यावसायिक, सरकारी विभाग आणि भागधारक यांच्यात अर्थपूर्ण परस्परसंवाद आणि सहयोग वाढवणे.

**सुशासनाला चालना :** प्रशासनातील विविध विभागांमध्ये सुशासन आणण्यासाठी पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जबाबदारीचे पालन करणे.

अनुकूल इकोसिस्टम तयार करणेः उद्योगांची वाढ आणि विकासासाठी अनुकूल वातावरण तयार करणे.

**प्रत्येक सत्रातून माहितीचा खजिना :** अभियानातील प्रत्येक दिवसाचे सत्र अत्यंत सुनियोजनबद्ध पद्धतीने तयार करण्यात आले होते. एका दिवसात सहभागी सदस्यांना अधिकाधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीने याची आखणी करण्यात आली होती. सकाळचे सत्र विविध उद्योगांनी घेतलेल्या चाकोरीबाहेरील उपक्रमाची माहिती देणाऱ्या सादरीकरणासाठी राखीव होते. तर उर्वरीत दिवसात भागदारांचे प्रेझेंटेशन, पॅनल डिस्कशन, चर्चासत्र आदीचा समावेश होता. कार्यशाळांमध्ये विविध क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

**गुंतवणुकीला प्रोत्साहन :** एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र आणि डीजीएफटीच्या प्रतिनिधींनी महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधी आणि विकास धोरणांबद्दल मार्गदर्शन केले.

**आर्थिक तज्ञ :** सीडबी (SIDBI), आयडीबीआय (IDBI), सीजीटीएमएसई (CGTMSE), बँक ऑफ महाराष्ट्र आणि एनएसई (NSE) द्वारे कर्ज पुरवठा, आर्थिक सहकार्य आणि गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**वाहतूक आणि निर्यात :** ईपीसी (EPC), एफआयईओ (FIEO), वर्ल्ड ट्रेड सेंटर (WTC), भारतीय डाक विभाग, ॲपेडा (APEDA), ईपीसीएच (EPCH), आणि एमपेडा (MPEDA) च्या वतीने देशांतर्गत आणि जागतिक स्तरावर निर्यात सुविधा, लॉजिस्टिक आणि बाजार विस्ताराबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

**डिजिटल कॉमर्स तज्ञ :** ओएनडीसी (ONDC) आणि जेम (GeMd) तज्ञांनी डिजिटल कॉमर्सच्या क्षेत्रातील संधी, व्यवसायवृद्धी, विकास याबाबत माहिती दिली.

**पॅकेजिंग, ब्रँडिंग, डिझाइनिंग :** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पॅकेजिंग आणि क्वालिटी कंट्रोल इंडिया (QCI) च्या तज्ञांनी पॅकेजिंग, ब्रँडींग, डिझायनिंग आणि गुणवत्तेबाबत मार्गदर्शन केले. यातूनच जागतिक बाजारपेठेत मालाला मागणी मिळणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

कार्यशाळांना उद्योगांचे प्रतिनिधी, संभाव्य गुंतवणूकदार, एसएमईचे संचालक, सरकारी अधिकारी, शैक्षणिक आणि माध्यम प्रतिनिधींचा समावेश होता. उद्योग संघटना, शैक्षणिक संस्था आणि विविध भागधारकांच्या सहकार्याने मोहिमेचे उद्दिष्ट कौशल्य आणि नेटवर्कला एकत्रित करणे हे होते. राज्यातील काही इग्नाईट अभियानांना राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची उपस्थिती होती. त्यांनी या अभियानाचे कौतुक करतांना १ ट्रिलीयन्स डॉलर्स अर्थव्यवस्थेपर्यंत पोहचण्यासाठी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. अशा उपक्रमांना शासनाचे पाठबळ देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

इग्नाईट अभियान महाराष्ट्राच्या आर्थिक समृद्धीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ओह. या माध्यमातून महाराष्ट्र हे गुंतवणूकीसाठी महत्त्वाचे राज्य असल्याचे स्टेक होल्डर्सना पटवून देण्यात आले. भविष्यात इग्नाईटच्या माध्यमातून मोठ्या परिवर्तनाची अपेक्षा आहे. हे परिवर्तन केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्याआर्थिक विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट बाळगून आहे.




*महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे , विभागीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांच्या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी उद्योग संचालनालयाचे अतिरिक्त उद्योग संचालक मा.श्री.संजय कोरबू, उद्योग सहसंचालक मा.श्री.सुरेश लोंढे यांनी भेट दिली. यावेळी डावीकडून श्री. संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक उद्योजक मासिक, श्री संदीप आफळे, उद्योग संचालनालय, मा.श्री.बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक एमईसीडी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर व श्री.विनोद तुपे, कनिष्ठ प्रकल्प अधिकारी, जालना दिसत आहेत.*



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा'', असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा. - संतोष बोर्डे**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

### Chief Minister Employment Generation Programme

### स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी

निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** - राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** - उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी,

भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय :**

**हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ -** www.maha-cmegp.gov.in

www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, औरंगाबाद येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*



## १००० हवाई मार्ग,
## १०० विमानतळांची निर्मिती

# हवाई वाहतूक उद्योगाची गगनभरारी

**भारताचा हवाई वाहतूक उद्योग मोठ्या वेगाने वाढत आहे. कोरोना महामारीचा या उद्योगाला फटका बसला होता. अवघ्या तीनच वर्षात प्रवाशांची संख्या कोरोना पूर्वीच्या ९५% पर्यंत पोहोचली आहे. यास केंद्राची उडान योजना महत्त्वाची ठरत आहे. सर्वसामान्य नागरिकांना हवाई प्रवासाचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या या योजनेअंतर्गत सध्या ४२५ मार्गांवर विमाने सुरू असून लवकरच ही संख्या १००० वर जाईल. गेल्या काही वर्षात देशभरात ६८ नवीन विमानतळे उभारण्यात आले. आहेत त्यांची संख्या लवकरच १०० च्या पुढे नेण्यासाठी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालय प्रयत्न करत आहे. येत्या ४ वर्षांत देशातील ४० कोटींहून अधिक लोक विमान प्रवास करतील, असा शासनाचा कयास आहे. - प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदा देखील सात डिसेंबर रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक दिन' साजरा झाला. जगभरातील विमानतळांवरील कर्मचारी व्यवस्थापन आणि हवाई वाहतूक नियंत्रणासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. अखिल विश्वातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात नागरी उड्डाणाचे महत्त्व काय आहे, याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस पाळला जातो. भारतात शहरीकरण वाढले असून, मध्यम तसेच उच्चवर्गीयांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे. त्यामुळे देशातल्या देशात विमानाने प्रवास करण्याच्या संख्येत सतत भर पडत आहे. तीन महिन्यांपूर्वी मुंबई ते अहमदाबाद या आकाश एअरच्या पहिल्या विमानसेवेचे उद्घाटन झाले. पूर्वी विमानाने प्रवास करणे हे केवळ उच्चभ्रू लोकांना शक्य होते. आता पूर्वीच्या तुलनेत परवडणाऱ्या दरात हवाई प्रवास करणे शक्य होऊ लागले आहे. 'उडान' योजनेअंतर्गत ४२५ हवाई मार्ग आहेत. ते लवकरच १००० पर्यंत जातील. भारतात ६८ नवीन विमानतळ उभारण्यात आले असून, लवकरच त्यांची संख्या १०० वर नेण्यात येणार आहे. येत्या चार वर्षांत नागरी हवाई वाहतूक सेवेमार्फत भारतात ४० कोटी लोक प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. रेल्वे वाहतूक आणि रस्ते वाहतुकीसोबतच नागरी विमान वाहतूकही भारतातील वाहतुकीचा मोठा आधार बनणार आहे.

गेल्या महिन्यात केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी गोव्यातील नागरी हवाई वाहतूक सेवा संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या आशिया पॅसिफिक परिषदेला संबोधित केले. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की भारतीय नागरी हवाई वाहतूक क्षेत्र आगामी सात ते दहा वर्षांत प्रचंड गतीने वाढणार आहे. भारतीय हवाई वाहतूक उद्योग कोविडपूर्व प्रवासी वाहतुकीच्या जवळपास ९५ टक्केपर्यंत पोहोचला आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री विजयकुमार सिंग यांनी तेथे दिली. गोव्यातील नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार असून, त्यामुळे गोव्यात पर्यटनाच्या अधिक संधी उपलब्ध होतील, अशी माहिती गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी यावेळी दिली.

भारतीय लोक मोठ्या प्रमाणात जग पर्यटनाला बाहेर जातात. बड्या बड्या ट्रॅव्हल कंपन्यांच्या जाहिराती आणि त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहिला, तरी याची सहज कल्पना येते. हिवाळ्यात भारतात पर्यटनाला येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर, चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भारताची आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक ही प्रवासी संख्येच्या दृष्टीने कोविडपूर्व अवस्थेत पोहोचली असून, ही आनंदवार्ताच मानायला हवी. एप्रिल ते डिसेंबर २०२३ या सहामाहीत भारतात हवाईमार्गे येणारे आंतरराष्ट्रीय प्रवासी आणि भारतातून बाहेर देशांत जाणारे प्रवासी यांची संख्या तीन कोटी १४ लाख इतकी झाली. मागच्या वर्षात हा आकडा ३ कोटी १३ लाख इतका होता. २०२२ पासूनच आंतरराष्ट्रीय प्रवासात सुदृढ वाढ होऊ लागली होती. २०२२-२३ मध्ये भारतात येणाऱ्या व भारतातून बाहेर जाणाऱ्या प्रवाशांची संख्या ही जवळपास अडीच कोटींपर्यंत पोहोचली होती. मात्र २०२० मध्ये जी संख्या होती, त्या तुलनेत ही आकडेवारी २१ टक्क्यांनी कमीच होती. भारतात ये-जा करणारे प्रवासी मुख्यतः परदेशी विमान कंपन्यांच्या विमानातून प्रवास करतात; परंतु तरीही गेल्या चार वर्षांत देशी विमान कंपन्यांच्या बाजार हिश्श्यात नऊ टक्क्यांची वाढ झाली आहे. याचा अर्थ त्यांची कामगिरी उपेक्षणीय म्हणता येणार नाही. अगोदर भारतीय विमान कंपन्यांचा बाजार हिस्सा ३५ टक्के होता. तो आता ४४% झाला आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत एकूण तीन कोटी १४ लाख प्रवाशांनी परदेशी प्रवास केला. त्यापैकी एक कोटी ३९ लाख व्यक्तींनी भारतीय हवाई कंपन्यांमार्फत भारतीय प्रवास केला

**मुख्यतः** इंडिगो आणि विस्तारा या खासगी कंपन्यांचा दबदबा या काळात वाढला आहे. एअर इंडिया ही पूर्वी सरकारी कंपनी होती. आता ती टाटा समूहाचा एक भाग बनली आहे. तिनेही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. उलट स्पाइस जेटसारखी कंपनी अडचणीत असून, तिचा बाजारहिस्सा घटला आहे. वाडिया समूहाच्या मालकीची गोफर्स्ट ही कंपनी असून, तिचा व्यवसाय कमी झाला आहे. मे महिन्यापासून तर तिने आपला व्यवसाय स्थगित केला आहे. एअर इंडिया एक्स्प्रेस या एअर इंडियाच्या कंपनीतला बाजारपेठेतील वाटा घटला आहे. इंडिगो, विस्तारा आणि एअर इंडियाने आपले नेटवर्क विस्तारले असून, क्षमतादेखील वाढवली आहे. काही विदेशी कंपन्यांच्या वाहतूक क्षमतेतही थोडीबहुत वाढ झाली आहे. तसेच रशिया-युक्रेन युद्धामुळे काही नॉर्थ अमेरिकन कंपन्यांनी आपल्या विमानांच्या उड्डाणांमध्ये घट केली आहे. त्याचा फायदा भारतासारख्या देशांना होत आहे. इंडिगोचा बाजारपेठेतील वाटा एक वर्षापूर्वी १५.७% होता. तो आता १७.८% झाला आहे. चार वर्षांपूर्वी तर तो फक्त दहा टक्के इतका होता. विस्ताराचा बाजारहिस्सा ०.१% होता. तो आता ३.२% इतका झाला आहे. एअर इंडियाचा वाटा १२.२ टक्क्यांवरून १२.६ % इतका झाला आहे. एअर इंडिया एक्सप्रेस, एअर इंडिया आणि विस्तारा या तिन्ही कंपन्या टाटा समूहातील असून, एकूण आंतरराष्ट्रीय प्रवाशांपैकी २३ टक्के प्रवासी या कंपन्यांच्या विमानांमधून प्रवास करतात. इंडिगोपेक्षा त्यांचा वाटा जास्त आहे. स्पाइस जेटचा बाजारपेठेतील वाटा ३.६ टक्क्यांवरून २.६ टक्क्यांवर आला आहे. अर्थातच कार्यक्षमता, विश्वासार्हता, प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा, त्यांची गुणवत्ता अशा घटकांवर कोणती हवाई वाहतूक कंपनी लोकप्रिय ठरते, हे निश्चित होत असते. एकूणात भारताचा हवाई वाहतूक उद्योग भरभराटीस आला आहे, हे नक्की. ■■

2023-24 साठी अंदाज, बांधकाम, खाणकाम, वीजनिर्मितीत वाढ

# विकासदर @ 6.5 टक्के



**गाझा पट्टीतील युद्ध तसेच रशिया-युक्रेन संघर्षामुळे भारतात निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पातील तरतुदीच्या ४९इ भांडवली खर्च केला आहे. खरं तर गेल्या वर्षभरात घडत असलेल्या घडामोडींमुळे बाहेरील देशातून येणारी माल व सेवांची मागणी घटल्यामुळे विकासदरात मोठी घसरण होण्याचा अंदाज होता; परंतु तुर्तास तसे दिसत नाही. यामुळेच २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.२ ते ६.७ टक्के राहील, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. केंद्र सरकारने ६.५इ विकासदराचा अंदाज वर्तवला आहे. सर्वाधिक वाढ खाणकाम, वीजनिर्मिती, उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रात होण्याची शक्यता आहे.**

**- हेमंत देसाई**

केंद्र सरकारचा वाढता भांडवली खर्च, तसेच उपभोग्य वस्तू क्षेत्र तसेच सेवाक्षेत्राची भरारी यामुळे जुलै ते सप्टेंबर २०२३ च्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पन्न किंवा जीडीपीत ६.७ ते ७ टक्क्यांपर्यंत वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वास्तविक एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत विकासदर ७.८ टक्के झाला होता, हे खरे आहे; परंतु त्यानंतरच्या काळात बाहेरील देशांतून येणारी माल व सेवांची मागणी घटल्यामुळे विकासदरात खूपच घसरण होईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. घसरण झाली आहे; पण ती लक्षणीय म्हणता येणार नाही. संपूर्ण २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६.२ ते ६.७ टक्के इतका विकासदर राहील, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे, तर रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकारने ६.५ टक्के विकासदराचा अंदाज व्यक्त केला आहे. खाणकाम, वीजनिर्मिती, उत्पादन क्षेत्र आणि बांधकाम यात चांगली वाढ होईल, अशी चिन्हे आहेत.

गाझापट्टीतील युद्ध तसेच रशिया-युक्रेन संघर्षामुळे निर्यातीवर परिणाम झाला आहे. महालेखापालांच्या ताज्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारने आतापर्यंत ४९ टक्के भांडवली खर्च (अर्थसंकल्पातील तरतुदीच्या तुलनेत) केला आहे. त्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे. बिगरबँकिंग वित्त कंपन्यांच्या असुरक्षित कर्जात भरपूर वृद्धी झाली असून, याबद्दलची चिंता व्यक्त करत, रिझर्व्ह बँकेने काही पावलेही उचलली आहेत. डिजिटल ॲप्सच्या माध्यमातून वाट्टेल तशी कर्जे कोणालाही दिली जात आहेत. ती मोठ्या प्रमाणात बुडण्याची शक्यताही नाकारता येत नाही; परंतु त्याचवेळी राष्ट्रीयीकृत बँकांनीही आतापर्यंत ९३ हजार कोटी रुपयांची असुरक्षित कर्जे दिलेली आहेत. मात्र बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांना बोल लावून, राष्ट्रीयीकृत बँका आपण मात्र जणू काहीच चूक केलेली नाही, अशा थाटात वावरत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर एक दिलासा देणारी बाब म्हणजे, २०२३-२४ या कर-आकारणी वर्षात (आर्थिक वर्ष २०२२-२३) जी सात टक्के विवरणपत्रे सादर झाली, ती ५३ लाख नवीन करदात्यांकडून. एप्रिल ते ऑक्टोबर या काळात ठोकळ प्रत्यक्ष करसंकलन १७ टक्क्यांनी वाढून, ते ११ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचले. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे (सीबीडीटी) अध्यक्ष नितीन गुप्ता यांनी सांगितले की, या वर्षीचे करसंकलनाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट आम्ही नक्कीच पार करू. कंपन्यांवरील करांचे दर घटले असले, तरीदेखील करसंकलन मात्र वाढले आहे. कंपन्यांवरील करांतील संकलन ७.३ टक्क्यांनी, तर व्यक्तिगत कर-उत्पन्नाची वसुली घसघशीत अशी २९ टक्क्यांनी वाढली आहे. जवळपास ६० ते ७० टक्के करदाते नवीन करप्रणाली स्वीकारतील, अशी चिन्हे आहेत. नवीन करप्रणालीत करातील सवलतीची मर्यादा पाच लाख रुपयांवरून सात लाख रुपयांवर नेण्यात आली आहे. शिवाय

५० हजार रुपयांपर्यंतची प्रमाणित वजावट नवीन करप्रणालीतही मिळणार आहे. एकूण प्रत्यक्ष करमहसुलात सिक्युरिटीज ट्रांझॅक्शन टॅक्समधून १६,३०० कोटी रुपये जमा झाले आहेत. मागच्या वर्षी याच कालावधीत हा आकडा १४,२५० कोटी रुपये इतका होता. करदात्यांच्या बँक खात्यांच्या व्हॅलिडेशन किंवा प्रमाणांकनातील विसंगतींमुळे ३५ लाख करपरताव्याची प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. मात्र एकूणात तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आणि सुगमीकरणामुळे करवसुली वाढली आहे, हे महत्त्वाचे आहे.

दुसरीकडे, वस्तू आणि सेवाकर परिषदेच्या गेल्या बैठकीत बराच काळ प्रलंबित राहिलेल्या ऑनलाइन गेमिंग, कॅसिनो आणि अश्वशर्यतींवर वस्तू आणि सेवाकर, म्हणजेच जीएसटी आकारण्याचा मुद्दा अखेर मार्गी लागला. यावर २८ टक्के दराने कर आकारला जाईल, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यामुळे सरकारचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढले असून, ही आनंदाची बातमीच आहे.

पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंग यांनी, देशातील करांचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर सुधारले पाहिजे, असे मत सार्थपणे व्यक्त केले होते. कर व राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर सामान्यतः १५ टक्के इतके असावे, असे मानले जाते. बेल्जियम, स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स यांचे हे गुणोत्तर ४० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे, तर भारताचे ११.२ टक्क्यांच्या आसपास आहे. कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे, हे आवश्यकच असते. आर्थिक मंदी वा कोरोनासारखी संकटे असोत, त्या काळात सरकारी महसूल घटतो. म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्क्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के असे असते, तर भारतात ते आहे अनुक्रमे ४८ टक्के आणि ५२ टक्के असे. याचा अर्थ, भारतात तुलनेने सधन व उच्च मध्यमवर्गीय गटावर कमी भार असून, गोरगरीब व निम्न मध्यमवर्गीयांवर अधिक भार आहे. गरिबांवर कमी भार आणि श्रीमंतांवर जास्त भार, हेच आर्थिक न्यायाचे तत्त्व असते. आर्थिक विषमता कमी करून, समतेच्या दिशेने अर्थव्यवस्था नेण्यासाठी प्रत्यक्ष कर वाढवणे व अप्रत्यक्ष कर कमी करणे, हा खरा उपाय आहे. भारतातील ८३ टक्के लोक हे असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. ते प्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतच नाहीत. भारतात जेमतेम तीन टक्के लोक कराचा भरणा करत असतात. भारताच्या एकूण उत्पन्नात खालच्या ५० टक्के लोकांचा फक्त १५ टक्के वाटा आहे. यावरून देशात आर्थिक विषमता किती टोकाची आहे, हे लक्षात येते. बेहिशेबी व्यवहार, हवाला, काळा पैसा अशा मार्गाने विशिष्ट वर्ग प्रचंड श्रीमंत होत आहे. उलट वाढत्या महागाईमुळे गरिबांचा खिसा रिता होत आहे.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*




*महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या प्रेरक प्रशिक्षकांची क्षमता बांधणी कार्यक्रम वारंवार घेतले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून प्रगत सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रम मा. श्रीमती रिटा सेनगुप्ता, माजी संचालक, निसबूड, नवी दिल्ली व श्रीमती रेखा भारद्वाज, वरिष्ठ प्रेरक प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली चार दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केला होता या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी घेतलेले छायाचित्र.*

### वसमतला बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन प्रक्रिया केंद्राच्या उभारणीला वेग

# हिंगोलीची हळद जाणार सातासमुद्रापार



**हळदीचा वापर खाद्यपदार्थाला पिवळा रंग व चव आणण्यासोबतच धामिर्क कार्यामध्येही मोठ्या प्रमाणात होतो. हळदीमुळे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढते, रक्?त शुद्ध होते, त्वचेचा रंग उजळतो, ही जंतुनाशक आहे. ही वनस्पती बारमाही आहे. हळद चुर्ण गरम पाण्याबरोबर घेतल्याने हृदविकार, मधुमेह,कर्करोग, मेंदुचे विकार होण्यापासुन प्रतिबंध होतो. एवढे महत्त्व असणा?या हळदीचे उत्पादन घेणारा जिल्हा म्हणून हिंगोलीची ओळख आहे. येथील हळदीला देशभरातून मागणी असते. त्यामुळे राज्य शासनाने हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन प्रक्रिया केंद्र मंजूर केले. त्याच्या उभारणीस वेग आल्यामुळे हिंगोलीची हळद सातासमुद्रापार जाण्यासाठी सज्ज झाली आहे.**

**- प्रतिनिधी**

भारतात हळद हे मसाला पिकांतील प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखले जाते. भौगोलिकदृष्ट्या हळद लागवडीस भारतात अनुकुल वातावरण असल्यामुळे भारतात सर्वदूर हळदीची लागवड होऊ शकते. भारतात हळद प्रामुख्याने महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, छत्तीसगड, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यात घेतली जाते. सन २०१९-२० मध्ये देशात हळद पिकाखालील क्षेत्र २.१८ लक्ष हेक्टर होते. त्यापैकी ५४ हजार ८८५ हेक्टर क्षेत्र हे महाराष्ट्रात होते. सन २०२१-२२ च्या आकडेवारीनुसार राज्यात एकूण १.०२ लक्ष हेक्टर क्षेत्र हळद पिकाखाली आहे. राज्यात हळदीचे क्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यात सर्वाधिक आहे. राज्यातील हळद पिकाखालील क्षेत्रापैकी मराठवाड्यात हळद पिकाखाली एकूण क्षेत्र ८२ हजार ९ हेक्टर म्हणजे ८० टक्के आहे.

जगातील हळदीखालील क्षेत्राचा विचार केल्यास ८१ टक्के क्षेत्र भारतात आहे. त्यानंतर चीन ७ टक्के, म्यानमार ४ टक्के, नायजेरिया ३ टक्के, बांगलादेश ३ टक्के, तसेच व्हिएतनाम व श्रीलंका प्रत्येकी १ टक्का याप्रमाणे क्रम येतो. देशातील एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रातील हळद उत्पादनाचा विचार करता राज्यातील एकूण उत्पादनाच्या ६० टक्क्याहून जास्त वाटा एकट्या हिंगोली जिल्ह्याचा आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्यातील हळद पिकाखालील क्षेत्र १ लाख २ हजार १६२ हेक्टर होते. यामध्ये हिंगोली जिल्ह्यात ४९ हजार ७६४ हेक्टर, नांदेडमध्ये २१ हजार ४१४, परभणीत ८ हजार ८०७ हेक्टर, यवतमाळ ६ हजार १६६ हेक्टर, वाशिम ५ हजार ६०४ हेक्टर, सातारा १ हजार ७८८ हेक्टर, बुलढणा १ हजार ५२५ हेक्टर, जालना १ हजार ७७ हेक्टर, जळगाव ९८४ हेक्टर, चंद्रपूर ७८४ हेक्टर, सांगली ७७८ हेक्टर, भंडारा ३९५ हेक्टर, लातूर ३५२ हेक्टर, नागपूर ३५१ हेक्टर, गोंदियात ३४१ हेक्टर तर इतर जिल्ह्यात २ हजार ३२ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली.

मराठवाड्यातील हिंगोली हे हळदीचे राज्यातीलच नव्हे तर देशातले प्रमुख हब आहे. येथे छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, बुलडाणा, नांदेड या जिल्ह्यातून हळदीची आवक होत असते. भल्या पहाटेच वाहनांच्या रांगा येथील संत नामदेव हळद बाजार समितीच्या आवारात पाहवयास मिळतात. राज्यासह राज्यस्थान, पंजाब, गुजरात या राज्यातून हिंगोलीच्या हळदीला मागणी असते. यामध्ये सौंदर्य प्रसाधने तयार करण्याचे घटक असल्याने कंपन्याकडूनही मोठी मागणी येते. येथील व्यवहार चोख असल्यामुळे शेतकऱ्यांचा कलही याच बाजारपेठेकडे अधिक दिसून येतो.

हिंगोली परिसरात वायगाव प्रतिभा सेलम या जातीच्या हळदीची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. राज्यात मागील वर्षी हळद लागवडीचे एकूण क्षेत्र सुमारे ८४ हजार ६६ हेक्टर आहे. त्यापैकी एकट्या हिंगोलीत ४९ हजार ७६४ हेक्टर क्षेत्रावर हळद लागवड केली आहे. हे क्षेत्र एकूण क्षेत्राच्या तुलनेत निम्म्याहून अधिक आहे. मराठवाडा आणि विदर्भात हळदीचे क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे उत्तर भारतातील व्यापारी सांगली ऐवजी मराठवाड्यातील हळदीला पसंती देत आहेत. दरम्यान, जिल्ह्यात मंजूर

झालेल्या हळद प्रक्रिया उद्योगाने उच्चशिक्षित बेरोजगार युवकांसाठी हा प्रकल्प वरदान ठरणार आहे.


हळदीचे विक्रमी उत्पादन घेणारा जिल्हा असल्याने येथील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासनाने हळद संशोधन प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. आधुनिक पद्धतीने ओल्या हळकुंडावर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांची हळद शिजविणे, वाळविणेसाठीचा खर्च कमी करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात वसमत येथे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन प्रक्रिया केंद्र उभारले जाणार आहे. यासाठी निधीदेखील मंजूर करण्यात आला आहे. यामुळे हिंगोलीची हळद सातासमुद्रापार जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी, हळद पिकालाही महत्व येणार आहे. अनेकांना यातून रोजगार मिळणार असून, जिल्ह्यासाठी हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरणार आहे. या बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्रामुळे हिंगोलीची हळद जगाच्या नकाशावर पोहोचणार आहे.

जिल्ह्यात हळदीमध्ये अडचणीची बाब म्हणजे हिंगोलीसह मराठवाड्यातील हळदीत कुरक्युमीनची मात्रा कमी आहे. इथल्या हळदीचा रंग आणि चव उत्तम असल्यामुळे या हळदीला घरगुती वापरासाठी मोठी मागणी आहे. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून केंद्रामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे पिकांचे आयुष्यमान वाढविण्यासाठी रेडिएशन सेंटर, कूल स्टोअरेजची व्यवस्था होणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी भाभा परमाणू अनुसंधान केंद्राच्या अग्री बायोटेक विभागामार्फत प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. हळदीचे संकरीत बियाणे, खत आणि पाण्याचे योग्य नियोजन व हळदीसाठी लागणारे कृषी अवजारे, यांत्रिकिकरण, बॉयलर व पोलिशर साहित्यासाठी शेतकऱ्यांना सबसिडी, कुरकुमीन तपासणी केंद्र, हळद निर्यात केंद्र, व्यवस्थापन, माती-पाणी तपासणी केंद्र आदी सुविधा केंद्राच्या माध्यमातून मिळणार आहे. एवढेच नाही तर टिश्यू कल्चर प्रयोगशाळा उभारुन त्यावरही काम केले जाणार आहे. एक जिल्हा एक पीक या योजनेत हिंगोलीचा अगोदरच समावेश झाला आहे. तसेच हळद काढणी पश्चात ओले हळकुंड शिजवणे, त्यांना सूर्यप्रकाशात वाळविणे हे कौशल्याचे काम आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळाची कमतरता नेहमीच भेडसावते. या समस्येवर मात करण्यासाठी समितीने विविध उपाययोजना सुचविल्या आहेत. हळकुंड तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रती एकर १० हजार रुपयापर्यंत खर्च येतो. काढणी प्रक्रियेचा खर्च कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कच्ची हळद ते हळद पावडर करण्यासाठी केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था, म्हैसूर यांनी हळद काढणी पश्चात नवीन तंत्रज्ञान तयार केले आहे. यामुळे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्र हा प्रकल्प जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

या भागात राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या बाजूला शासकीय जागा उपलब्ध झाल्यास ११०० कोटी रुपये खर्च करुन हळदीच्या कल्स्टरसाठी १०० एकर जागेवर लॉजिस्टीक पार्क उभारण्यात येणार असल्याचे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये हिंगोली दौऱ्यावर आले असताना सांगितले आहे. येथे हळदीपासून विविध उत्पादने निर्माण केल्यास आपली हळद जगाच्या नकाशावर येऊन साता समुद्रापलीकडे जाणार आहे. सध्या जालना येथे एक्सपोर्ट-इम्पोर्ट सुरु होणार आहे. त्यामुळे हिंगोली येथील हळद सातासमुद्रापलीकडे जगात जाईल आणि शेतकरी समृध्द होतील.

दरम्यान, कोरोनानंतर हळदीला जगभरात मोठे महत्व आले आहे. पाश्चिमात्य राज्यात रोग प्रतिकार शक्ती वाढविणारा (इम्युनिटी बुस्टर) घटक म्हणून हळदीच्या गोळ्या विकल्या जात आहेत. स्टार बक्ससारख्या आंतरराष्ट्रीय चैन असलेल्या कॅफेमध्ये 'गोल्डन टर्मरिक ल्याटे' या नावाने हळदीचे दूध महागड्या दराने विकले जात आहे. युरोपात अल्झायमर व पार्किन्सन आदी आजारांच्या औषधामध्ये हळदीपासून निर्माण होण्या?या तेलाचा वापर करण्यात येत आहे. हळदीमधील कुरकुमिनचा वापर सौंदर्य प्रसाधनांमध्ये त्वचा उजळ करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे. हळद प्रक्रिया करुन हळदीपासून निघणारी साल ही मच्छररोधक व अगरबत्तीमध्ये वापरण्यात येते. यापुढे हळदीच्या सालीलाही मोठी मागणी असणार आहे. तसेच कृत्रिम रंग उद्योगातही हळदीला मोठी मागणी आहे. त्यामुळे भविष्यात हिंगोलीसह संपूर्ण मराठवाड्यात हळदीचे मोठे क्ल स्टर तयार करण्याचे आणि या क्लस्टरच्या माध्यमातून हळदीचे बेणे, सिंचन पध्दती यात बदल होणे आवश्यक आहे.

हिंगोलीत बाजारपेठ उपलब्ध झाल्याने आणि सरासरी नऊ हजार ते दहा हजार प्रती क्विंटल दर मिळतो. टिश्यू कल्चरची रोपे, औषधे, कीडनाशके, सेंद्रीय हळद उत्पादन करण्याची शास्त्रशुध्द पध्दतीचा विकास, हळदीची काढणी पश्चात प्रक्रिया, मसाल्यासह विविध ?लोपॅथिक आणि आयुर्वेदिक औषधांचे आणि सौंदर्य प्रसाधनाच्या उत्पादनाचे कारखाने आणि हळदी विक्रीची जागतिक साखळी निर्माण करण्यासाठी काम सुरू असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. संशोधन केंद्रामुळे तंत्रशुध्द पध्दतीने वाढीव उत्पादन कसे घ्यावे याची शेतकऱ्यांना माहिती होणार आहे. तर याच ठिकाणी प्रक्रिया उद्योग उभारले जाणार असून, तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. राज्यात सर्वाधिक हळदीचे उत्पादन हे हिंगोली जिल्ह्यात होत असून, येथून अधिकची निर्यात केली जात होती. मात्र, प्रक्रिया उद्योगामुळे व्यवसायाला अधिक चालना मिळणार आहे. मराठवाड्यातील शेतकरी आणि उच्चशिक्षित बेरोजगार युवकांसाठी वरदान ठरणारा हा प्रकल्प लवकरच पूर्ण होईल, यासाठी राज्य सरकार देखील प्रयत्नशील आहे. त्यामुळे हा प्रकल्प संपूर्ण मराठवाड्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.



*मा.श्री.मधुकर राजे अर्दड, विभागीय आयुक्त, मराठवाडा विभाग हे IGNITE जालना कार्यक्रमात उद्योजक मासिक वाचताना.*

यशोगाथा : वैभव व गौरव शिंदे, संचालक, शिंदे सेल्स कॉर्पोरेशन

# घराला घरपण देणारी माणसं




**प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात हक्काचे घर असावे हे स्वप्न असतं. ते सत्यात उतरविण्यासाठी तो सतत धडपडत असतो. मोठ्या कष्टाने घर बांधायला काढले तर त्यासाठी विश्वासनीय अशा ठिकाणाहून टाइल्स, मार्बल, सॅनिटरी वेअर, किचन वेअर अशा अनेक गोष्टी लागतात. वैभव आणि गौरव शिंदे यांनी ग्राहकांच्या नेमक्या गरजा, आवड आणि बजेटचा अभ्यास करून हे साहित्य पुरविण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. शिंदे सेल्स कॉर्पोरेशनच्या माध्यमातून २०१७ पासून ते या निर्जीव गोष्टींसोबत आपुलकी, विश्वास, प्रेम आणि सकारात्मक ऊर्जा देण्याचे काम करत आहेत. म्हणूनच घराला घरपण देणारी ही माणसे परिसरात प्रत्येकाला आपलीशी वाटतात.**

**- प्रसाद घारे**

अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन प्रमुख गोष्टींचा समावेश पृथ्वीतलावरील प्रत्येक मनुष्याच्या मूलभूत गरजांमध्ये होतो. यामध्ये अन्न आणि वस्त्र या दोन गोष्टी मिळवण्यासाठी हल्ली खूप धडपड, धावपळ करावी लागत नाही. आपल्या देशाचा विचार केला तर भुकबळी जाण्याचे प्रमाण आता खूपच कमी झाले आहे. गरिबातील गरिबाला दोन वेळचे अन्न देण्याची व्यवस्था सरकार करते किंवा देशभरातील अनेक संस्था, संघटना, सेवाभावी संस्था, देवस्थाने गरिबांसाठी दररोज मोफत जेवण देताना दिसतात. अंग रक्षणासाठी आवश्यक असणारा नवा, जुना कपडालत्ता देखील समाजातील तळागाळातील व्यक्तींना हल्ली सहज उपलब्ध होतो. मूलभूत गरजांमधील घर, निवास मग ते भाड्याचे असो किंवा स्वतःच्या मालकीचे असो, हे मिळविण्यासाठी प्रत्येकच आर्थिक स्तरातील व्यक्तीला त्याच्या आवडीचे घर घ्यायला बरीच धावपळ करावी लागते. असंख्य तरुण-तरुणींना त्यांच्या उमेदीची दहा, पंधरा, वीस वर्षे घराचे हप्ते फेडण्यातच जातात. गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना, म्हाडा, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत विविध राज्ये आणि केंद्र सरकारे घर, निवारा देण्याचे काम गेली अनेक वर्षे सातत्याने करीत आहेत. आगामी काळात हे गृहनिर्माणाचे काम चालू राहणार आहे. भारतीय अर्थव्यवस्था जसजशी विकसित होईल तसतशी महानगरे, लहान-मोठी शहरे, जिल्हा केंद्र, तालुका पातळीवरील गावांमध्ये गृहप्रकल्प, अपार्टमेंट, सोसायटीज, बंगले, रो हाऊस, अन्य व्यावसायिक इमारती, मॉल, शाळा, दुकाने इत्यादी बांधकाम वेगाने वाढत जातील, असा अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त झाला आहे. म्हणूनच बांधकाम क्षेत्रातील विविध साहित्य निर्मितीला तसेच त्याच्या विक्रीला नक्कीच 'अच्छे दिन' येतील, याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. ही पार्श्वभूमी सांगण्याचे कारण असे की, काही दिवसांपूर्वीच पुणे-नाशिक महामार्गावरील पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर या एका छोट्या गावात जाण्याचा योग आला. या गावातील वैभव आणि गौरव दिलीप शिंदे या दोन धडपड्या तरुण उद्योजक/व्यावसायिकांना भेटण्याची संधी मिळाली. हे दोघे सख्खे भाऊ. वैभव शिंदे मोठा तर गौरव शिंदे धाकटा. दोघेही शाळेत असल्यापासून अभ्यासात अतिशय हुशार. जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण झाल्यावर वैभव लहान वयातच व्यवसायाची धुळाक्षरे गिरविण्यासाठी नारायणगावमधील शिक्षण महर्षी आणि असंख्य तरुणांमध्ये उद्योग/व्यवसायासाठीची ज्योत पेटविणाऱ्या जयहिंद ग्रुपच्या तात्यासाहेब गुंजाळ आणि त्यांच्या परिवारासह प्रत्यक्ष फिल्डवर काम करू लागला. जयहिंद ग्रुप हा प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रात गेली ३५-४० वर्षे कार्यरत असणारा या भागातील एक नावाजलेला उद्योगसमूह. तात्यासाहेब गुंजाळ यांचे नाव शिक्षण, सहकार आणि उद्योग क्षेत्रात आदराने घेतले जाते. वैभव अभ्यासात हुशार असला तरी त्याला साचेबद्ध अभ्यासपद्धती फारशी आवडत नव्हती. म्हणूनच त्याने पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवसायात Practical experience घ्यायला सुरुवात केली. हा अनुभव घेत असतानाच त्याने बी.कॉम. ही पदवी देखील संपादन केली. या पदवीच्या कागदापेक्षा तात्यासाहेब गुंजाळ आणि सुभाषशेठ गुंजाळ यांच्याबरोबर तो व्यवसायातील चढ-उतार, ग्राहकांशी संवाद कसा साधायचा, हिशेब कसे करायचे, विविध आर्थिक व्यवहार, बाजारपेठेतील अन्य व्यवहार याचबरोबर ग्राहकाची पारख कशी करायची हे शिकत होता. हे शिक्षण त्याला साचेबद्ध शिक्षणपद्धतीत कधीच मिळाले नसते. त्यामुळेच त्याला उद्योग-



व्यवसायाची गोडी लागली. गौरव शिंदे हा वैभवचा धाकटा भाऊ. हा देखील अभ्यासात हुशार. जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतल्यावर विज्ञान (सायन्स) या विषयातून त्याने अकरावी-बारावीचे शिक्षण घेतले. त्यानंतर राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या नारायणगाव केंद्रातून बीबीए (ॲग्री) म्हणजेच ॲग्री बिझिनेस मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला. गौरव अतिशय चुणचुणीत. त्याला लहानपणापासून अध्यात्माची आवड. संस्कृत श्लोक, गीता आणि संतवचनांच्या वाचनाचा जणू त्याला छंदच. म्हणूनच पंचवीशीत देखील तो खूपच परिपक्व (मॅच्युअर्ड) वाटतो. तो म्हणतो, मी कृषी/शेतीचा अभ्यास केला असला तरी मला त्या क्षेत्रात जायचे नव्हते. यासाठीच दादा म्हणजे वैभव शिंदे यांनी सुरुवात केलेल्या शिंदे सेल्स कॉर्पोरेशन या कौटुंबिक उद्योग/व्यवसायात काम करायला तयार झालो. गेली पाच वर्षे हे दोघे सख्खे भाऊ अतिशय गुण्यागोविंदाने शिंदे सेल्स कॉर्पोरेशनची उलाढाल आणि नावलौकिक कसा वाढवता येईल याचा एकत्रित विचार करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट म्हणावी लागेल. मंचरमधील पुणे-नाशिक महामार्गाजवळील अवसरी येथे शिंदे सेल्स कॉर्पोरेशनची आलिशान शोरूम आहे.

विविध ब्रॅन्डेड कंपन्यांच्या असंख्य प्रकारच्या टाईल्स, ग्रेनाईट, बिल्डिंग टॉर स्टील, मार्बल, सॅनिटरी वेअर्स, किचन, बेसिन, अनेक प्रकारचे बांधकाम साहित्य, सिमेंट आणि दगडी कोरीव काम केलेली तुळशीवृंदावने अशा असंख्य दर्जेदार गोष्टी स्पर्धात्मक किमतीला येथे उपलब्ध आहेत. पुणे, पिंपरी- चिंचवड, मोशी, खेड, राजगुरूनगर, चाकण, नारायणगाव, जुन्नर, आंबेगाव आणि भीमाशंकर परिसरातील तसेच सातारा, कोल्हापूर, मुंबई, बीड, नाशिक असा दूरचा ग्राहकवर्ग शिंदे सेल्स कॉर्पोरेशनकडे कायम येत असतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आदरातिथ्य, आपुलकी. ग्राहकवर्गाला नेमके काय हवे आहे, याचे योग्य निदान ते करतात. त्याच्या नेमक्या गरजा, आवड आणि बजेटचा अभ्यास करून वैभव आणि गौरव शिंदे त्यांना त्यांच्या पसंतीच्या टाईल्स, बेसिन किंवा अन्य बांधकाम साहित्य देतात. या शोरूममध्ये येणाऱ्या ग्राहकवर्गाचे समाधान कसे होईल याला हे बंधू प्राधान्य देतात. त्यांच्या या कामाच्या पद्धतीमुळे मोठा ग्राहकवर्ग त्यांनी जोडला आहे. 'रिपीट कस्टमर' चे प्रमाण त्यांच्याकडे अन्य व्यावसायिकांच्या तुलनेत जास्त आहे.

शिंदे सेल्स कॉर्पोरेशन हे Kajaria (India's No. 1 Tile Company), Nirali (India's No. 1 Sink Company), Kalinga Stone, CARYSIL KITCHEN APPLIANCES, JK Super Cement या भारतातील आघाडीच्या बांधकाम साहित्य क्षेत्रातील कंपन्यांचे Authorized Dealer आहेत. या कंपन्यांची सर्वात लेटेस्ट उत्पादने यांच्या शोरूममध्ये ग्राहकांना प्रत्यक्ष बघायला आणि हाताळायला मिळतात. शिंदे सेल्स कॉर्पोरेशन हे Authorized Dealer प्रमाणे स्टॉकिस्ट देखील आहेत. त्यामुळे ग्राहकांना लहान-मोठ्या ऑर्डरसाठी थांबावे लागत नाही. लगेचच सर्व साहित्य मिळू शकते. शिंदे सेल्स कॉर्पोरेशनच्या शोरूममध्ये पार्किंग, व्हरांडा, हॉल, किचन, बाथरूम, वॉशरूम, स्वंयपाक घर, बेडरूम, बाल्कनी, टेरेस आणि बंगला, इमारतीभोवतीचे कंपाउंड यासाठी कोणत्या टाईल्स, स्टोन वापरायचे यांचा सुंदर डिस्प्ले केला आहे. त्यामुळे एखाद्या लग्नाचा बस्ता बांधायला आलेली मंडळी जशी एखाद्या दुकानात चार-पाच तास थांबून सगळी खरेदी करतात तसेच काहीसे येथे होते. 'लग्न करावे पाहून तसे घर पाहावे बांधून' असे म्हणतात. याचा प्रत्यय येथे येतो. घर बांधायचे, फ्लॅट सजवायचा म्हटले की आवडीच्या दर्जेदार गोष्टींचा शोध घ्यावाच लागतो. अनेक ग्राहकांचा हा प्रवास शिंदे सेल्स कॉर्पोरेशनमध्ये सुरू होतो आणि तेथेच संपतो. वैभव आणि गौरव शिंदे म्हणजे जणू 'घराला घरपण देणारी आपली माणसं' आहेत; कारण हे दोघे प्रत्येक ग्राहकाला आपले दैवत मानतात आणि त्याचे समाधान कसे होईल हे पाहतात. म्हणूनच गेल्या पाच वर्षांत त्यांनी आपल्या व्यवसायाची कोटीच्या कोटी उड्डाणे चालू ठेवली आहेत. एका लहान गावात देखील मोठा व्यवसाय कसा करायचा हे या दोन भावांकडून शिकण्यासारखे आहे.

वैभव आणि गौरव शिंदे यांना उद्योग-व्यवसायाचे बाळकडू घरातूनच मिळाले. पणजोबा, आजोबा आणि वडील दिलीप शिंदे यांनी विविध प्रकारचे व्यवसाय केले. त्यामुळे घरात कायम उद्योग-व्यवसायाच्या चर्चा व्हायच्या. त्यामुळे लहानवयातच स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करणे त्यांना अजिबात अवघड गेले नाही. उद्योग-व्यवसायाचा पायाच भक्कम असल्याने तो लवकर बहरला, फुलला आणि विस्तारला देखील. वैभव आणि गौरवचे वडील दिलीप शिंदे यांना नवनवीन कल्पनांचे प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतर करण्याची तसेच काही Innovative करण्याची आवड. या आवडीतूनच त्यांनी पोल्ट्री व्यवसाय केला, त्यानंतर शेतीसंबंधित काही उत्पादने तयार केली (कोंबावर बसणारे बारिक किडे पकडण्यासाठी ट्रॅप विकसित केले) आणि त्याची मोठ्या प्रमाणात विक्री केली. आजोबा कै. दत्तात्रय उद्धवराव शिंदे आणि भरतशेठ उद्धवराव शिंदे यांनी मुंबईमध्ये उत्तम पद्धतीने भाजीपाला व्यवसाय केला. वडिलांनी केलेले विविध व्यवसाय वैभव आणि गौरवला जवळून बघायला मिळाले. आई सौ. सविता दिलीप शिंदे यांनी संपूर्ण घराची जबाबदारी सांभाळतानाच आपल्या दोन्ही मुलांना व्यवसायासाठी कायम मदतीचा हात पुढे केला. वहिनी सौ. मोनिका वैभव शिंदे या सध्या शिंदे सेल्स कॉर्पोरेशनच्या Account keeping ची जबाबदारी सांभाळत आहेत आणि आजी चंद्रभागा विष्णुपंत पटाडे यांनी देखील

व्यवसायासाठी कायम प्रोत्साहन दिले. याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष फायदा या दोघांना शिंदे सेल्स कॉर्पोरेशनच्या उभारणीत नक्कीच झाला. आपण कायमच आपले ग्रामदैवत, कुलदैवत यांच्यासमोर नतमस्तक होतो. शिंदे कुटुंबीय दररोज त्यांच्या परिसरातील श्री. दक्षिणमुखी हनुमान मंदिरात जायचे विसरत नाहीत. या हनुमानाचे आशीर्वाद कायम आमच्या मागे असतात अशी त्यांची श्रद्धा आहे, असे वैभव आणि गौरवने आवर्जून सांगितले.

घर हे जरी दगड, माती, विटा, टाईल्स अशा निर्जीव गोष्टींपासून बनत असले तरी या घराला घरपण देण्याचे काम वैभव आणि गौरव शिंदे त्यांच्या शिंदे सेल्स कॉर्पोरेशनच्या माध्यमातून सन २०१७-१८ पासून अतिशय काळजीने करीत आहेत. ग्राहकांना घरासाठी आवश्यक असणाऱ्या निर्जीव गोष्टींसोबत त्यांनी आपुलकी, विश्वास, प्रेम आणि सकारात्मक ऊर्जा देण्याचे काम केले आहे. म्हणूनच त्यांचा ग्राहकवर्ग या दोघांना 'घराला घरपण देणारी आपली माणसं' असे नक्कीच म्हणत असतील. या दोघांकडे बघून मला एक प्रसिद्ध कविता आठवली ती अशी -


***घर असावे घरासारखे***
***नकोत नुसत्या भिंती***
***तिथे असावा प्रेम जिव्हाळा***
***नकोत नुसती नाती***
***त्या शब्दांना अर्थ असावा***
***नकोच नुसती वाणी***
***सुर जुळावे परस्परांचे***
***नकोत नुसती गाणी***
***त्या अर्थाला अर्थ असावा***
***नकोत नुसती नाणी***
***अश्रुतुनही प्रीत झरावी***
***नकोच नुसते पाणी***
***या घरट्यातून पिलू उडावे***
***दिव्य घेऊनी शक्ती***
***आकांक्षांचे पंख असावे***
***उंबरठ्यावर भक्ती***

'इवलेसे रोप लावियले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी' या उक्तीप्रमाणे केवळ अठराशे चौरस फूट शोरूमपासून चालू झालेला Tile Display आता सुमारे दहा हजार चौरस फूटपर्यंत गेला असून लवकरच Building Material Hub बनविण्याचा मानस आहे. वैभव आणि गौरवला आगामी काळात घरासाठी लागणाऱ्या 'ए टू झेड' सर्व गोष्टी त्यांच्या दुकानात उपलब्ध करून द्यायच्या आहेत. आजचे हे शोरूम आगामी पाच वर्षांत मोठ्या मॉलमध्ये रूपांतरीत करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. भविष्यकाळात उंच भराऱ्या मारण्यासाठी त्यांच्या पंखात बळ यावे यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा!

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल* **prasad.ghare@gmail.com** *आहे.)*

■ ■



## सोने, शेअर बाजार वधारला, बाजारात चैतन्य

# कर संकलनात 20% वाढ




**दिवाळीचा सण संपून दोन महिने उलटल्यानंतरही बाजारपेठांमध्ये प्रचंड चैतन्याचे वातावरण आहे. शेअर बाजाराने विक्रमी पल्ला गाठला आहे, तर सोन्याचे भावही गगनाला भिडले आहेत. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे देशातील कर संकलनामध्ये थोडीफार नव्हे तर तब्बल २२ टक्क्यांची वाढ झाली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात १८ लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष कर संकलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. ते गेल्या वर्षीपेक्षा सुमारे पावणेदहा टक्क्यांनी अधिक आहे. हे उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. कर संकलन वाढणे म्हणजेच वैयक्तिक करदात्यांचे उत्पन्न वाढले असे म्हटले जाते. नवीन वर्षात अर्थव्यवस्थेची ही भरारी अशीच सुरू राहील हीच अपेक्षा.**

**- हेमंत देसाई**

शेअर बाजार त्यावेळी दिवाळीच्या मुहूर्ताच्या सौंदर्यामध्ये प्रचंड उत्साह दिसून आला आणि सेन्सेक्समध्येही ३५४ अंशांची वाढ दिसली. यंदा एकूणच बाजारपेठांमध्ये टेलिव्हिजन संच, फ्रीज, एसी, कूलर, मोबाईल, कार्स, मोटरसायकल्स यांची तुफान खरेदी झाली. सोन्या-चांदीच्या बाजारपेठेचाही अक्षरशः जल्लोष होता. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे अत्यंत सकारात्मक असे वातावरण आहे. कोरोनानंतर अर्थव्यवस्थेने गती घेतली असून, हे आशादायक चिन्ह आहे. विविध दलाली फंडांच्या अंदाजानुसार, संवत्सर २०८० मध्ये कंपन्यांची कामगिरी उत्तम होईल, अशी अपेक्षा आहे. वास्तविक अमेरिकी मध्यवर्ती बँकेला महागाई नियंत्रणात येण्याबाबत अजूनही आत्मविश्वास नाही. त्याचे प्रतिबिंब जगभरातील भांडवली बाजारांवर उमटले असले, तरीही या चिंतेवर मात करत भारतीय शेअर बाजारात तेजीवाले जोरात आहेत. देशांतर्गत आघाडीवर ऑक्टोबरमध्ये महागाई कमी होण्याची शक्यता असून, विकासदर देखील वाढेल असा होरा आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीने सप्टेंबर अखेरच्या तिमाहीत ७,९२५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे. निव्वळ नफ्यात जरी घसरण झाली असली, तरी गुंतवणुकीतून मिळणारे निव्वळ उत्पन्न सुमारे ८४ हजार कोटी रुपयांवरून वाढून ते ९३ हजार कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. एलआयसीचे सॉल्व्हन्सी मार्जिनही वाढ दर्शवत आहे. देशाचे निव्वळ प्रत्यक्ष करसंकलन नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत वार्षिक तुलनेत २२ टक्क्यांनी वाढून, ते १० लाख ६० हजार कोटी रुपयांवर गेले आहे. संपूर्ण वर्षासाठी अर्थसंकल्पीय उद्दिष्ट जे निश्चित करण्यात आले होते, त्याच्या ५८% इतके हे प्रमाण आहे. यंदा वैयक्तिक प्राप्तिकर संकलन वाढल्याने एकूण करमहसूल वृद्धी दर्शवत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातून होणारे करसंकलन १२ टक्क्यांनी वाढले आहे, तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलन ३१ टक्क्यांनी विस्तारले आहे. स्थूल आधारावर कंपनी आणि वैयक्तिक प्राप्तिकर समाविष्ट असलेल्या प्रत्यक्ष करातून मिळणाऱ्या करसंकलनात १७ टक्क्यांची वाढ होऊन, ते १२ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. प्रत्यक्ष करसंकलन गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील निव्वळ संकलनापेक्षा २१% अधिक आहे. याचबरोबर मागील महिन्यात करदात्यांना अंदाजे २७ हजार कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला. २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात सुमारे १८ लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष करसंकलनाचे लक्ष निश्चित करण्यात आले आहे, जे गेल्या आर्थिक वर्षात जमा झालेल्या उत्पन्नापेक्षा पावणेदहा टक्क्यांनी जास्त आहे. प्रत्यक्ष करात वाढ होणे, याचा अर्थ वैयक्तिक करदात्यांचे उत्पन्न वाढले आहे. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट क्षेत्राची प्राप्तीदेखील वाढली आहे. शिवाय करप्रणाली जितकी सुगम होते, तितकी वसुली अधिक होत असते. अप्रत्यक्ष करांचा फटका गरिबांना अधिक बसतो, तर प्रत्यक्ष कर हे अधिक न्यायपूर्ण असतात, असे मानले जाते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

देशातील निर्मिती क्षेत्राची कामगिरी आणि उत्पादनवृद्धीचे प्रतिबिंब ज्यात पडते, त्या आयआयपी किंवा औद्योगिक उत्पादन निर्देशांकाने संपलेल्या सप्टेंबरमध्ये ५.८% पुढे मजल मारली आहे. याचा अर्थ औद्योगिक क्षेत्र गतिमान बनले आहे. गेल्या वर्षी, म्हणजे सप्टेंबर २०२२ मध्ये ३.३% वाढ नोंदवली गेली होती. मात्र ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यात औद्योगिक उत्पादन दरात मोठी घट झाली आहे. ऑगस्ट महिन्यात तो १०.३ टक्के नोंदवला गेला होता, तरीदेखील गेल्या वर्षाच्या तुलनेत प्रगतीचा वेग चांगलाच आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, निर्मिती क्षेत्राने सप्टेंबर महिन्यात ४.५% वाढ नोंदवली आहे. खाणकाम तसेच वीजनिर्मिती क्षेत्राने अनुक्रमे ११.५% आणि ९.९% दराने वृद्धी साधली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील एप्रिल-सप्टेंबर या कालावधीत औद्योगिक उत्पादनातील वाढ ६ टक्के आहे. ही वाढ एका वर्षापूर्वीच्या याच कालावधीतील ७.१ टक्क्यांवरून खाली आली आहे. औद्योगिक निर्देशांकाला कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत खास महत्त्व असते. त्यावरून कारखान्यांची प्रगतीची दिशा कळू शकते.

औद्योगिक क्षेत्रात भरभराट झाली, तर रोजगारविकासही चांगल्या पद्धतीने होतो आणि कामगारांच्या हातात पैसे खुळखुळायला लागले, तर शेतमालाची खरेदीही चांगली होते. तसेच त्याचा ग्रामीण बाजारपेठेवर अनुकूल परिणाम होत असतो. मात्र मध्यम व मोठ्या कंपन्यांप्रमाणेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंपन्यांची स्थितीही उत्तम असली, तर अर्थव्यवस्था सुदृढ असल्याचे मानले जाते; परंतु सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंपन्याच्या क्षेत्राकडे जेवढे लक्ष केंद्रित केले पाहिजे, तेवढे ते दिले जात नाही.

जागतिक पातळीवर विचार करायचा झाला, तर चीनच्या थेट परकीय गुंतवणुकीत घट झाली असून, त्याचा भारतात फायदा मिळू शकतो. चीनमधील थेट परकीय गुंतवणूक १९९८ नंतर पहिल्यांदाच नकारात्मक पातळीवर घसरली असून यंदाच्या तिसऱ्या तिमाहीत ती १०० अब्ज डॉलरवरून ११ अब्ज डॉलरपर्यंत घसरली आहे. म्हणूनच देशातील थेट परकीय गुंतवणुकीत किंवा एफडीआयमध्ये घसरण होत असली, तरी पुढील काळात परदेशी कंपन्या भारतात प्रकल्पांच्या उभारणीसाठी गुंतवणूक करतील अशी चिन्हे आहेत. परदेशी कंपन्यांकडून प्रकल्प उभारणीसाठी पसंती असलेल्या देशांमध्ये युनोच्या व्यापार व विकास परिषदेने भारताला आघाडीच्या तीन देशांमध्ये स्थान दिले आहे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक पातळीवरून नवीन गुंतवणूक आकर्षित करण्यात भारत अधिकाधिक यशस्वी ठरत आहे, हे सुचिन्हच म्हणावे लागेल. ही नवी आशा आणि नवी उमेद अशीच टिकून राहो.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*

■■



### गेल्या वर्षीचे अपूर्ण स्वप्न नवीन वर्षात पूर्ण करण्यासाठी

# संकल्पपूर्तीचा 'स्मार्ट' पासवर्ड

**बघता बघता २०२३ सरले आणि २०२४ च्या पहिल्या महिन्यात आपण उभे आहोत. दरवर्षी आपण काही संकल्प करतो. मात्र, कामाच्या गडबडीत किंवा योग्य दिशा नसल्याने ते अपूर्ण राहतात. मागील वर्षात अपूर्ण राहिलेले असेच काही संकल्प-स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'स्मार्ट' पद्धती योग्य मार्ग ठरू शकते. स्मार्ट म्हणजे कामातील नेमकेपणा, कामाचे योग्य मोजमाप, निश्चित उद्दिष्टे आणि त्यासाठी लागणारी कालमर्यादा निश्चित करणे. ही उद्दिष्टे सत्यात उतरविण्यासाठी पद्धतशीर कृती योजना असणे गरजेचे आहे. याकडे लक्ष दिले तर निश्चितच नवीन वर्षात मागील संकल्पना पूर्ण होतील. शिवाय नवीन संकल्पही पूर्णत्वास जातील.**

**- जीवन मुळे**

**'उठा! जागे व्हा!! आणि**
**निश्चित ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!!!**
**- स्वामी विवेकानंद यांचे युवांना आवाहन**

**नवीन वर्षांच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**

आपण सर्वजण नव्या वर्षाचे नवे संकल्प, उद्दिष्ट ठरविण्यासाठी सज्ज झालेला असणार हे निश्चित. नव्या वर्षात तुमचे स्वप्न, संकल्प, ध्येय वा उद्दिष्ट नक्की साध्य व्हावे असं वाटत असेल, तर 'स्मार्ट' कार्यपद्धतीचा जरूर अवलंब करा. नवी पिढी स्मार्ट जनरेशनची प्रतिनिधी आहे. सध्याचं जीवनही स्मार्ट फोनसारखं 'फास्ट फॉरवर्ड' आहे. त्यामुळे आपल्या स्मार्ट तरुणाईला नव्या वर्षाचे उद्दिष्ट (Objective), ध्येय ठरविण्यासाठी (Goal setting) ही स्मार्ट पद्धत निश्चितच अधिक उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

गतीने प्रगतीकडे, मोठ्या बदलाकडे झेपावणाऱ्या एकविसाव्या शतकातील तेवीस वर्षे पाहता-पाहता पूर्ण होऊन नवे वर्ष २०२४ च्या वळणावर आपण उभे आहोत. हीच ती वेळ, हाच तो क्षण, जेव्हा आपण या वळणावर क्षणभर थांबून सिंहावलोकन करण्याची, जे आतापर्यंत यश-अपयश मिळाले त्याचा चिकित्सकपणे आढावा घेण्याची. तसेच जे काही चांगले, आनंददायी, उद्यमशील घडवण्याचा मानस असेल त्याचा शांत मनाने विचार करण्याची गरज असते. शिवाय, काय आणि कुठे चुक झाली, हेही तपासणे आवश्यक असते. संपलेल्या वर्षांच्या धडा शिकवणाऱ्या आठवणी यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. त्यानंतरच नव्या ध्येयाची पुढच्या वाटचालीसाठीची दिशा ठरवणे योग्य असते.

सरत्या वर्षात केलेले काही संकल्प, पाहिलेली स्वप्नं अद्यापही अपूर्ण राहिलेले असण्याची शक्यता असते. त्या सर्वांच्या अपूर्णतेची कारणं कदाचित ध्येयनिश्चितीच्या बीजामध्ये असू शकतात. तज्ज्ञांच्या मते, ८० टक्के लोकांची उद्दिष्टपूर्ती न होण्याचे एक प्रमुख कारण या उद्दिष्ट, ध्येय ठरविण्याच्या पद्धतीमध्ये दडलेले असते. ही पद्धत व्यवहारी असावीच; परंतु परिणामकारक असणे आवश्यक असते. व्यावसायिकांना व्यावहारिक दृष्टिकोनाचे महत्त्व वेगळे सांगण्याची आवश्यकता आहे का? म्हणूनच नवउद्योजकांनी आपला उद्योग सुरू करताना आपला दृष्टिकोन, विचार नीट तपासून पाहायला हवेत. आपले स्वप्न हे वैयक्तिक असो वा व्यावसायिक, ते सिद्ध (साकार) होऊन तुम्हाला सुप्रसिद्ध, जगप्रसिद्ध होता आले, तर तुमच्या ज्ञानाचे, कौशल्याचे, परिश्रमाचे आणि दृष्टिकोनाचे खऱ्या अर्थाने सार्थक झाले, असे म्हणता येते. त्याचा पाया योग्य उद्दिष्ट निश्चिती पद्धतीवर आधारित असतो.

**योग्य उद्दिष्ट ठरवण्याची स्मार्ट (SMART) पद्धती** : यासाठीचे गुपित SMART या शब्दाच्या प्रत्येक अक्षरात दडलेले आहे. हाच मंत्र तुमच्या संकल्पाच्या सिद्धीचा मार्गदर्शक असणार आहे, हेच पंचामृत स्मार्ट उद्योजकतेचे पाचक आणि प्रेरक असेल. ते सूत्र खालीलप्रमाणे आहे.

**S = Specific action oriented (नेमके कार्याभिमुख, उद्देशयुक्त, विशिष्ट)** : आपल्याला नेमके कोणते काम करायचे आहे, का करायचे आहे, किती वेळात करायचे आहे आणि ते अधिकाधिक चांगले करण्यासाठी कोणती संसाधने उपलब्ध आहेत, इत्यादी माहितीचा काम सुरू करण्यापूर्वी विचार करा. पारंपरिक कार्यपद्धतीच्या ऐवजी आधुनिक, नवीन कल्पक (इनोवेटिव्ह) वा अधिक कार्यक्षम, परिणामकारक, वेळेची बचत करणारी पद्धत अवलंबण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी चाकोरीबाह्य विचार करायला हवा. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्राधान्य द्या. अशाप्रकारे आवश्यक पूर्वतयारी करूनच नेमक्या कार्याभिमुख कामाला सुरुवात करा.

**M = Measurable (मोजण्यायोग्य, मापनक्षम)** : ठरविलेले उद्दिष्ट शक्यतोवर संख्यात्मक वा तत्सम मोजण्यायोग्य असावे. अन्यथा उद्दिष्टाचा किती भाग पूर्ण झाला आहे, याचा निश्चित अंदाज आपल्याला येणारच नाही. प्रत्येक पायरीवर आपण उद्दिष्ट कितपत आणि कुठपर्यंत साध्य केले आहे, हे जर नक्की तपासले तर गरजेनुसार पुढील पायऱ्यांवर योग्य

ती सुधारणा वा बदल करणे सहज शक्य होते. परिणामी, अंतिम उद्दिष्ट प्रगती मोजणे शक्य होते. या अहवालावरून वरिष्ठांना प्रगतीचे आकलन होणे सोईस्कर होते. वेळोवेळी (शक्यतोवर दर आठवड्याला) उद्दिष्टाच्या किती जवळ आपण पोहोचलो आहोत हे समजून घेणे हितकारक ठरते.

**A = Achievable, Attainable (प्राप्त करण्यासारखे, साध्य करता येण्यासारखे) :** नेहमी प्राप्त करण्याजोगे, संस्थेची गरज आणि आपली क्षमता विचारात घेऊन ध्येय ठरवावे. उद्दिष्ट ठरवताना प्रामुख्याने पुढील गोष्टींचा विचार करावा - १) आपली कुवत, कौशल्य, अनुभव, मानसिकता २) आवश्यक संसाधनांची उपलब्धता ३) हातातली इतर कामे ४) अपेक्षित अडचणी ५) मूल्यवर्धन, वगैरे. वरील सर्व बाबींचा वस्तुनिष्ठ विचार करून तसेच वरिष्ठांचे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन, ठरलेल्या वेळेतच पूर्ण करण्याजोगे उद्दिष्ट ठरवावे.

**R = Relevant (वास्तववादी, समयोचित) :** आपले निर्धारित उद्दिष्ट वास्तववादी असले पाहिजे. यासाठी उपयुक्त सर्व बाबींचा वस्तुनिष्ठ विचार करावा लागतो. उद्दिष्ट हे व्यक्तिनिष्ठ नसावे, ते वस्तुनिष्ठ असावे. त्यामुळे आवश्यक असणारी योग्य ती संसाधने उपलब्ध करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणे शक्य होईल. व्यवसायामध्ये ऑर्डरनुसार मागणीचा पुरवठा वेळेत करण्यासाठी संसाधनांचं योग्य पद्धतीने आयोजन केल्यास उद्दिष्टाला भेडसावणाऱ्या अनेक अडचणी दूर होऊ शकतात.

उद्दिष्ट स्वतःसाठी असो वा व्यवसायासाठी, ते आपल्या आवाक्यातलेच असले पाहिजे. अतिरंजित स्वप्नासाठी अवास्तव उद्दिष्ट ठरविणे, हट्ट धरणे टाळलेच पाहिजे.

उद्दिष्ट तुमच्या टीमच्या आवाक्यातले तसेच त्यांना पूर्ण करण्यायोग्य असावे.

**T = Time bound (वेळनिर्धारित) :** प्रत्येक कामासाठी, लक्ष्यासाठी (टार्गेट) एक योग्य कालमर्यादा निश्चित केलेली असते. काम पूर्ण करण्याची अंतिम तारीख असते. त्याप्रमाणे कामाची आखणी केली पाहिजे. मागणी केलेले उत्पादन, मागणी नोंदकर्ता व्यक्ती / संस्था यांना अपेक्षित वेळीच, अपेक्षित गुणवत्तेनुसार द्यावे लागते. सध्याच्या तीव्र स्पर्धात्मक युगात याबाबत खूपच दक्ष आणि वक्तशीर राहणं आवश्यक आहे. हा आपल्या नावलौकिकाचा (रेप्युटेशन) ही प्रश्न असतो. त्यासाठी काम वेळेपूर्वीच पूर्ण करण्याचे नियोजन करावे लागते. उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी निर्धारित वेळ ठरवून सुरुवात करा, तुम्हाला यश नक्की मिळेल याची खात्री बाळगा.

थोडक्यात, तुमचे उद्दिष्ट नेमके, वास्तववादी, मोजण्यायोग्य, प्राप्त करण्यासारखे आणि समयबद्ध असेल, हे निश्चित करूनच पुढील कृती कार्यक्रम हाती घ्या.

### असावी पद्धतशीर कृती योजना :

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी तुमचं स्वप्न, उद्दिष्ट महत्त्वाची भूमिका बजावत असते. उद्दिष्ट निश्चितीनंतर, आता ध्येयपूर्तीसाठी कृती योजना लेखी स्वरूपात तयार करणे योग्य ठरते. वरील कार्यपद्धतीवर योग्यप्रकारे अवलंबून आपण आपले ध्येय पूर्ण करू शकता. अर्थात, उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतरचा आनंद अवर्णनीय असतो. येत्या काळात सर्व प्रयत्नांमध्ये सफल होण्यासाठी हा गुरुमंत्र असू शकतो.

### नवीन वर्षासाठी महत्त्वाच्या टिप्स

जीवनातील स्वप्न, ध्येय साध्य करण्यासाठी सतत नवीन ज्ञान मिळवत राहा, कठोर परिश्रम करत राहा. त्याला एकविसाव्या शतकाच्या कौशल्याची जोड द्या आणि सर्वात शेवटी पण महत्त्वाचे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून प्रारंभ करा. इतरांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्याचा प्रयत्न करा. Passion चे Profession मध्ये रूपांतर करा.

सध्या युवक-युवतींना रोजगार-स्वयंरोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत आहेत. त्यासाठी प्रत्येक युवानं आपले स्वप्न वा उद्दिष्ट डोळसपणे पाहून योग्य पद्धतीने ठरवावे. तसेच ते साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर उद्दिष्टपूर्ती होण्याची शक्यता बळावते. तेव्हा मित्रांनो, उज्ज्वल भविष्याची मोठी स्वप्नं जरूर पाहा; परंतु स्वप्नरंजनात फार वेळ मात्र वाया घालवू नका. लवकर जागे व्हा! Get up!! Start up!!!

यंदाच्या जानेवारीमध्ये साजरा होत असलेल्या राष्ट्रीय युवा दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*

■ ■



*माननीय श्रीमती श्वेतिका सचन, भाप्रसे, संचालक, उद्योग, व्यापार व वाणिज्य, गोवा शासन, गोवा यांना एमसीईडी संस्थेची माहिती व उद्योजक मासिक भेट देताना डॉ.अभिराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख व श्री.राजेश गावडे, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, सिंधुदुर्ग दिसत आहेत.*



आर्थिक प्रगतीकडे वाटचाल

# भारत आर्थिक प्रगतीचे नवे पर्व- २०२४

**भारत महासत्ता बनणार म्हणजे नक्की काय होणार आणि मुख्य म्हणजे आपल्या आयुष्यात काय बदल घडणार, असे प्रश्न सर्वांना पडतात. मात्र या महासत्ता बनण्याच्या प्रक्रियेत मध्यमवर्गीय भारतीय समाजाची महत्त्वाची भूमिका असणा आहे. भारत आज प्रगतीच्या एका नवीन पर्वाच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि पुढची २५-३० वर्षे हा देशासाठी 'अमृतकाळ' असणार आहे. या विकासपर्वाचे महत्त्वाचे भगीदार सर्वसामान्य मध्यमवर्ग असणार आहे.**

**- डॉ. अभिराम डबीर**

भारत सरकारने देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनश्र डॉलर्सपर्यंत नेण्याचा संकल्प केला आहे. यात कृषी क्षेत्राची भागीदारी एक ट्रिलियन डॉलर्स करण्याचे उद्दिष्ट आहे. उर्वरित चार ट्रिलियन डॉलर्समध्ये सेवा आणि उत्पादन क्षेत्रांचा समावेश आहे. कृषी क्षेत्राचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अनेक धोरणमक बदल या क्षेत्रत करावे लागणार आहे. आजही जवळपास ६०-६५ टक्के जना थेट शेतीशी निगडीत आहे आणि त्यांचे कृषी क्षेत्रातील जीडीपीमधील महत्त्व आणि योगदान घडून केवळ १५`-२० टक्के इथपर्यंत खाली घसरले आहे.

पीपल्स रिसर्च ऑन इंडियाज कन्झ्युमर एकॉनॉमी या संस्थेने भारतातील हजारो कुटुंबीयांचे सर्वेक्षण करून निष्कर्ष काढला आहे की, आर्थिक प्रगतीमुळे सर्वसामान्यांचे जीवनमान बदलणार आहे. यामुळे सर्वसामान्यांची जीवनशैली उंचावल्याने नागरिकांचे प्रयत्न उत्कर्षासाठी व विकासासाठी पुरक ठरतील.

भारतातील २०२३ हे सरते वर्षे तिहेरी आनंदाचे ठरले आहे. एकीकडे संयुक्त राष्ट्रानो २०२३ हे आंतरराष्ट्रीय मिलेट इअर म्हणजेच भरड धान्यांचे वर्षे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले. भारताने या देशातील या पारंपरिक धान्यांना श्रीअन्न असे नामकरण करून त्याचा जोरदार प्रचार प्रसार सं थरा सुरू केला आहे. जागतिक स्तरावर देखील मिलेटस व यापासून बनवलेले विविध पौष्टिक पदार्थ हे प्रसिद्ध होत आहेत. तर दुसरीकडे देशाचा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षभर देशभरात उत्साहाने सर्वत्र अत्यंत जोशाने साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने देशभर विविध देशभक्तीपर सामाजिक सांस्कृतिक बंद वाढवणारे कार्यक्रम घेण्यात आले अनेक विभागांनी विशेषतः उद्योग विभागाने रोजगार स्वयंरोजगार उद्योजकता आयात निर्यात इज ऑफ दोईंग बिजनेस वन डिस्टिक मेक इन इंडिया स्टार्ट अप इंडिया यासारख्या विविध उपक्रमातून देशाच्या वाढ होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले आहेत याच वर्षी २०२३ मध्ये भारताचा जी ट्वेंटी चे अध्यक्ष पद मिळाले भारत हा छोटे शेतकरी अल्पभूधारक आणि प्रामुख्याने लघुउद्योगांचा देश आहे हे शेतकरी आणि लघुउद्योग देशाच्या आर्थिक सामाजिक व राजकीय व्यवस्थेचा भरभक्कम आधार राहिले आहेत देशाची अन्नसुरक्षा आणि पर्यावरणी शाश्वता यामध्ये शेतकऱ्यांची नेहमीच महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे

कुठल्याही देशाची आर्थिक सरासरी उत्पन्न दरडोई उत्पन्न २००० डॉलर्सच्या वर गेले की मध्यमवर्ग झपाट्याने वाढतो सेवा सुविधा ग्राहक उपयोगी वस्तूंची मागणी यात वाढ होते सहाजिकच जगभरातील कंपन्या तेथे येतात गुंतवणूक येते नोकरी व्यवसायाच्या संधी निर्माण होतात त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढते आणि त्यामुळे लोकांची क्रयशक्ती खर्च करण्याची मर्यादा वाढते सर्वसामान्य विशेषतः मध्यमवर्ग हॉटेलिंग पर्यटन प्रवास, कपडा लगता, सौंदर्यप्रसाधने, स्टेशनरी स्थावर जंगम मालमत्ता, मोबाईल लॅपटॉप साधने, नवनवीन दुचाकी, चार चाकी वाहने अशा हजारो गोष्टी व सेवा वापरू लागतो, खरेदी करतो, त्या तो नाविन्य विविधता शोधू लागतो. यामुळे बाजारपेठ उन्नत व्हायला सुरुवात होते. यामुळे देशाची अर्थव्यवस्था वाढू लागते दवडू लागते .

### मराठी उद्योजकता व उद्देशकांचे स्थान

आत्मनिर्भर भारत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर दिशाक्रमण करीत असताना मराठी माणसाचे उद्योजकीय भाव विश्व कसे आहे याचा विचार देखील करणे प्राप्त ठरते सर्वात पहिले म्हणजे बहुतांश मराठी उद्योजकाला उद्योकाची परंपरा नसते, तो पहिल्या पिढीचा उद्योजक असतो मोठे होण्याची काहीतरी व्यवसाय उद्योग करण्याची त्याच्यामध्ये जिद्द असते. अनेक जण त्यामुळे नोकरी सोडून व्यवसायात येतात त्यांना उद्योग हे क्षेत्र पूर्णपणे नवीन असते उद्योगातील सर्व खाच खळगे अडीअडचणी याविषयी तो अनभिज्ञ असतो.

दुसरा मुद्दा असा आहे की मराठी उद्योजकाला घरात मित्रांमध्ये नातेवाईक आप्तेष्ट समाजात याविषयी योग्य मार्गदर्शन उपलब्ध नसते त्यासाठी शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र एमसीईडीसारखी शासनाची उद्योग विभागांतर्गत कार्यरत संस्था समाजाची उद्योजकिकरण तळागाळात करण्यासाठी १९८८ पासून राज्याच्या प्रत्येक जिल्हास्तरावर

कार्यरत आहे. संस्थेच्या वैविध्यपूर्ण उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मराठी नाव उद्योजकांना हे मार्गदर्शन शासकीय योजना अंतर्गत विनामूल्य आणि माफक दरामध्ये आज सर्वत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. याची माहिती मराठी उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी सातत्याने बाळगणे आवश्यक आहे. यासाठी एमसीईडी संस्थेने उद्योजक हे मराठी मासिक मुखपत्र दरमहा प्रकाशित होते. संस्थेचे पोर्टल वेबसाईट .स्म्.म्द.ग्ह यावर उद्योजकांना घरबसल्या महाराष्ट्रभर सुरू असलेल्या सर्व उद्योजकता विषयक प्रशिक्षण व घडामोडींची अद्यावत माहिती एका क्लिकवर आज उपलब्ध आहेत. मराठी नवोद्योजकांनी याचा सातत्याने फायदा घेणे गरजेचे आहे. उद्योगात पावलोपावली अडचणी येतात आवश्यकता असते ती योग्य मार्गदर्शन प्रशिक्षण आणि समुपदेशनाची ते जर मराठी उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या युवकाला योग्य वेळी मिळाले तर तो अडीअडचणींवर मात करू शकतो.

असेही लक्षात येते की मराठी उद्योजक संघटित नाहीत उद्योगात एकमेकांना धरून चालणे संघटित होऊन प्रश्न सोडवणे इतरांशी जुळवून घेणे त्यासाठी मराठी उद्योजकांच्या संघटना उभारणे त्या मजबूत करणे 'कॉन्फिडरेशन ऑफ मराठी उद्योजक', 'मराठी उद्योजक संघ' असे पूरक संघटना महाराष्ट्रभर उभे राहणे हीपण काळाची गरज आहे. मराठी उद्योजकांमध्ये उद्योग सुरू करण्यास नेटवर्किंगचा अभाव दिसतो, नेटवर्किंगचे अनेक फायदे असतात. इतर समाजातील अनेक उद्योजक नेटवर्किंगद्वारे आपल्या घरातील व्यवसाय आपल्या समाजातच कसा टिकवता येईल, वाढेल व तो व्यवसाय वृद्धिंगत कसा होईल याचे सातत्यपूर्ण नियोजन व कसोशीने प्रयत्न करताना दिसतात. तसे प्रयत्न करतात मराठी उद्योजक मागे पडतो. 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' ही भावना जोपासली तर एकत्र येऊन मोठी योजना आखणे मोठा प्रकल्प उभारणे असे फायद्याचे उद्योग उभारता येतात त्यासाठी उद्योग विभाग महाराष्ट्र शासनाने क्लस्टर योजना आणलेली आहे. ज्याचा फायदा वरीलपणे एकत्रित संघटित संघटनेद्वारे घेतल्या जातो आज पावतो महाराष्ट्रमध्ये २५० च्या वर क्लस्टर आधारित अनेक उद्योजक जाळे ग्रामीण शहरी भागात यशस्वीपणे कार्यरत आहेत. उद्योग व्यवसाय करताना भावनिक होऊन चालत नाही. भावनेला नफा तोट्याचे गणित कळत नाही. उद्योगात निर्णय घेताना मराठी व्यावसायिकाने गणिताच्या तारखांच्या बुद्धीच्या अनुभवाच्या आधारावर कायम निर्णय घेणे योग्य. उद्योगात डोक्याचा व भावनेचा कमीत कमी वापर करणे योग्य होय.

कर्ज व्यवस्थापन हा देखील अत्यंत कळीचा मुद्दा आहे. कर्ज व्यवस्थापन शिकले पाहिजे त्याचे नियम पाळले पाहिजे, असे पण नाही छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी जवळच्या नातेवाईकांच्या मदतीने स्वतःचे भाग भांडवल वापरून सुद्धा नफा कमावता येतो. कर्जाची परतफेड करण्यामध्ये मराठी उद्योजकांचा टक्का अग्रेसर आहे. मात्र तो कर्जाच्या दबावात येतो, कर्ज वसुली करण्याच्या दबावात येतो, इतर समाज घटकांचे तसे नाही. १४० कोटी लोकसंख्या आणि ३०३ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था यामुळे भारताची सरासरी वार्षिक दरडोई उत्पन्न २३०० डॉलरच्या पलीकडे गेले आहे. येत्या पाच ते दहा वर्षात ते पाच हजार डॉलरचा पल्ला गाठील असा वित्तीय संस्थांचा निष्कर्ष आहे. सध्याचा भारताचा सर्वे अहवाल असे सांगतो की येत्या २५ वर्षात २०४७ पर्यंत भारतातील मध्यमवर्ग दुपटीने वाढणार आहे सध्या ३१ टक्के असलेल्या मध्यमवर्ग ६३ टक्के होईल, असा अंदाज आहे. २०४७ मध्ये मध्यमवर्ग १०० कोटी पेक्षा जास्त असेल. २०३० पासून निम्म्याहून जास्त खर्च मध्यमवर्ग करेल, ही क्रयशक्ती भारतातील सर्वात मोठी बाजारपेठ असणार आहे. अर्थदुर्बलता कुटुंबे देखील मध्यम वर्गात येतील अर्थ दुर्बलांची संख्या घटत जाईल त्यामुळे लोकसंख्येची आर्थिक रचना व मध्यभागी फुगवता आणि खाली निमुळती अशी हिऱ्यासारखी दिसू लागेल. अशी प्रबळ शक्यता आहे. आज २०२३ मध्ये १५ टक्के जनता गरीबीच्या रेषी खाली आहे. २०३० मध्ये हे प्रमाण सहा ते आठ टक्के असेल तर देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात २०१७ साली केवळ दोन-तीन टक्के भारतीय गरिबी रेषेच्याखाली असतील असा अंदाज आहे.

शिक्षणातील गुंतवणूक सर्वोच्च व्याजाची हमी देते, असे बेंजालीन फ्रंक्लीन या अमेरिकेतील अग्रणी राजकीय सामाजिक तत्त्वचिंतकाने १७५१ साली म्हटले आहे. तसेच या धर्तीवर 'उद्योजक देशात संपत्ती निर्माण करतो' म्हणून तो हवा. ॲडम स्मिथने 'वेल्थ ऑफ नेशन्स' या सुप्रसिद्ध ग्रंथात ज्याचे सुंदर विवेचन केले आहे. तसेच उद्योजक हा अनेकांना रोजगार देतो, नफा हा उद्योगाचा अविभाज्य घटक आहे. प्रामाणिकपणे जिद्दीने चिकाटीने अपयशाची भीतीने बाळगता व यशाचा निर्धार मनाशी बाळगून संभाव्य धोके पत्करत उद्योग करीत राहिल्यास नफा मिळतोच. उद्योजक हा देशाच्या विकासाचा कणा आहे. भारतात प्रगतीच्या एका नवीन पर्वाच्या उंबरठ्यावर उभा आहे. अर्थात वारे व विकासाच्या दिशा आणि वाटा भारतासाठी अनुकूल असल्या तरी वैयक्तिक पातळीवर स्वउन्नतीसाठी प्रयत्न ज्याचे त्यालाच करावे जे आहेत. कौटुंबिक स्तरावर आर्थिक प्रगतीच्या उन्नतीच्या वाटा शोधताना चुकीच्या प्रलोभनापासून दूर राहणे, अति कर्जदारीच्या विळख्यात भौतिक गोष्टींच्या हव्यासापोटी न सापडणे, सातत्याने छोटी छोटी सुयोग्य गुंतवणूक करीत राहणे या गोष्टींवर सर्वसामान्य लघुउद्योगांना लक्ष केंद्रित करावे लागेल.

उद्योगाला लागणारी पूरक परिसंस्था इकोसिस्टीम निर्माण करणे ही मराठी उद्योजकाची पहिली आवश्यकता आहे. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र ही शासनाच्या उद्योग विभागाच्या अधिपत्याखाली हे काम अविरतपणे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात करीत आहे. स्वर्गीय माधवराव भिडे यांनी उभारलेली सॅटर्डे क्लब ट्रस्ट ही अशीच उद्योजकांची संघटना मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. स्वर्गीय ॲड. शशिकांत पवार यांनी स्थापलेल्या मराठा बिझनेस फोरम डिकी दलित इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या श्री. मिलिंद कांबळे यांनी स्थापलेली संस्था अंत्रप्रिट्युनर्स रत्नदीप कांबळे यांनी स्थापन केलेली संघटना आनंद कांबळे यांनी स्थापलेली 'द मिलेनियर चेंबर्स कॉमर्स अँड इंडस्ट्रीज', पुण्यातील संजय कुलकर्णी यांची स्थापन केलेली 'मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघ' मुंबईत देखील याच धरतीवर प्रकाश बाविस्कर यांची संस्था आहे. 'ब्राह्मण बिझनेस नेटवर्क' अशी ही संघटना आहे यांची सर्वांची पूरक परिसंस्था म्हणून कामे जोमात सुरू आहे. संघटित होणे आणि उद्योग सुरू केला, तयार करणे मजबूत करणे, ही मराठी उद्योजकांची पहिली आवश्यकता आहे. प्रत्येकालाच त्याच्या कष्टाचे संघर्षाचे कल्पकतेचे औद्योगिक तत्परतेचे उद्योजकतेचे जोखमीचे फळ या अमृतपर्वात मिळू शकेल. यासाठी आपणसारेच कटिबद्ध असणे हीच काळाची गरज आहे.

*(या लेखाचे लेखक हे राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रेरक-प्रशिक्षक आहेत. सध्या ते एमसीईडी मुख्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५९ आहे.)*

मुलाखत -

कृषिपर्यटन तज्ज्ञ पांडुरंग तावरे

# कृषिपर्यटनातून समृद्धीचा मार्ग



**शहरातील धकाधकीचे जीवन, धावपळ, प्रदूषण, गोंगाट याला पर्याय म्हणून आता शहरी नागरिक ग्रामीण भागात जाणे पसंत करत आहेत. त्यांना आकर्षित करण्यासाठी कृषी पर्यटन आता वेग घेत आहे. राज्यात कृषी पर्यटनाची संख्या १३०० च्या पुढे असून सर्वाधिक केंद्र पुणे जिल्ह्यात तर त्या पाठोपाठ साताऱ्यामध्ये आहे. खरं तर जगभरातच या संकल्पनेचा विस्तार होत आहे. शेतीला जोडूनच हा व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा एक नवीन मार्ग खुला झाला आहे. नेमके काय आहे कृषिपर्यटन, कशा आहेत यातील संधी, जाणून घेऊया कृषी पर्यटन विकास संस्थेचे संचालक पांडुरंग तावरे यांच्याकडून.**

**- सुधीर साबळे**

शेतीच्या माध्यमातून चांगले उत्पन्न मिळू शकते. इतकेच नाही तर शेतात पिकणाऱ्या मालाची शहरी भागापासून दूर असणाऱ्या आयटीपासून ते विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना थेट शेताच्या बांधावर येऊन खरेदी करता येऊ शकते. या उपक्रमाच्या माध्यमातून ॲग्री टुरिझमला चांगल्या प्रकारची गती मिळू शकते. इतकेच नाही, तर शेतीच्या माध्यमातून स्थानिक भागात राहणाऱ्या व्यक्तींना रोजगाराच्या संधी मिळू शकतात. इतकेच नाही तर शहरातील प्रदूषित वातावरणापासून दोन-चार दिवसांसाठी सुटका होऊ शकते आणि शेतातल्या हिरव्यागार वातावरणात मोकळा श्वास घेत, अस्सल ग्रामीण धाटणीचे पदार्थ चवीला उतरतात. गावातील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन स्थानिक युवकांच्या माध्यमातून घडणे सोपे होऊन जाते, हे मॉडेल ॲग्री टुरिझमचे यशस्वी मॉडेल म्हणून ओळखले जात आहे. सध्या महाराष्ट्रात तेराशेच्या आसपास ॲग्री टुरिझम केंद्रे कार्यान्वित आहेत. फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशात आणि यंदा जगाच्या पाठीवर देखील ॲग्री टुरिझमने ३०० US बिलियन डॉलरचे मार्केट गाठले आहे. दरवर्षी त्यामध्ये १२ टक्क्यांनी वाढ होत आहे. फक्त अमेरिकाच नाही तर युरोपमधले अनेक देश या संकल्पनेचा वापर करून शेतीच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारे प्रगती करत आहेत. या संकल्पनेमध्ये चांगल्या प्रकारचा रोजगार तयार होऊ शकतो, अनेक हातांना काम मिळून त्यामधून रोजगाराची निर्मिती होऊ शकते. जगभरात सध्या हा कल मोठ्या प्रमाणात वाढत आहे. देशात आणि जगभरात वाढणाऱ्या ॲग्री टुरिझम या संकल्पनेच्या बाबत पांडुरंग तावरे, संचालक, कृषी पर्यटन विकास संस्था, बारामती, यांच्याबरोबर सुधीर साबळे यांनी केलेली बातचीत...

**सध्या ॲग्री टुरिझमची परिस्थिती कशी आहे, त्याबद्दल काय सांगाल?**

**पांडुरंग तावरे -** सध्याच्या काळात वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. कधी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेले पीक जात आहे. त्यामुळे ते अडचणीत सापडत आहेत. शेतात पिकणाऱ्या पिकाला योग्य किंमत मिळायला हवी; पण बऱ्याचदा तसे होताना दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समोरील अडचणीत वाढ होते. या सगळ्या अडचणींमधून बाहेर पडण्यासाठी आपल्याकडे एक वेगळा पर्याय असायला हवा म्हणून अनेकजण आता ॲग्री टुरिझमच्या संकल्पनेकडे वळू लागली आहेत. आपल्या शेतात पिकणारा शेतमाल हा प्रत्येकाला शहरी भागापर्यंत पोहोचवणे शक्य होत नाही; पण शहरातील मंडळींना आपल्या शेताच्या माध्यमातून कृषी पर्यटनाचे दर्शन घडवताना आपल्या इथे पिकलेल्या शेतमालाची थेट त्यांना विक्री करणे त्यांना शक्य होते. त्यामुळे कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कृषी मालाला योग्य तो भाव मिळवणे शक्य होते. त्यामुळे फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशात ॲग्री टुरिझमची संकल्पना विस्तारत चालली असून, शेतकऱ्यांना आपली प्रगती करणे शक्य होऊ लागले आहे.

**गावातील तरुण मंडळींना रोजगार मिळवून देणारे एक साधन म्हणून ॲग्री टुरिझम कसे उपयुक्त ठरू शकते?**

**पांडुरंग तावरे -** आठवड्यातून दोन दिवस आपल्या शेतावर शेतकरी मंडळी ही संकल्पना राबवू शकतात. त्यामध्ये कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरी भागात राहणाऱ्या मंडळींना शेतीची ओळख करून द्यायची, आपल्या गावातील संस्कृती, परंपरा, यांच्याबरोबरच गावाच्या परिसरात असणाऱ्या ऐतिहासिक वास्तू, पुरातन मंदिरे, काही जुन्या खाणाखुणा, इतिहासाशी जवळीक असणारी ठिकाणे, यांची ओळख आपल्याकडे येणाऱ्या पर्यटकांना करून देता येऊ शकते. तरुण मंडळींना गावाची चांगली माहिती असेल तर त्यांना या माध्यमातून चांगल्याप्रकारे रोजगार प्राप्त होऊ शकतो. याबरोबरच गावातील अनेक महिला बचतगटाच्या माध्यमातून अनेक प्रकारची उत्पादने तयार करत असतात, त्यांच्या उत्पादनांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारची बाजारपेठ मिळू शकते. याबरोबरच विविध प्रकारच्या प्रक्रिया केलेल्या पदार्थांची विक्री करण्यासाठी ॲग्री टुरिझम हे चांगल्या प्रकारचे व्यासपीठ आहे. आपली नेहमीची नोकरी - व्यवसाय सांभाळून कृषी पर्यटनाच्या माध्यमाचा वापर करून अशा प्रकारच्या रोजगार मिळवणाऱ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शेतकऱ्यांच्या बांधावरच उत्तम प्रतीचा शेतमाल उपलब्ध होऊ शकतो. याचे मार्केटिंग केले तर त्या माध्यमातून देखील रोजगाराची निर्मिती होणे शक्य आहे. शेतकऱ्यांच्या बरोबरच गावाचा विकास करणे शक्य होणार आहे. आपण जर ठरवले तर ॲग्री टुरिझमच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचा रोजगार मिळवणे सहजशक्य आहे. फक्त त्यासाठी तीव्र इच्छाशक्ती आणि कष्ट करण्याची तयारी हवी. ॲग्री टुरिझममध्ये असणाऱ्या रोजगाराच्या संधीसाठी शैक्षणिक पात्रता म्हणाल तर ज्याला काम करण्याची इच्छा आहे अशी कोणीही व्यक्ती इथे काम करू शकते.

**२३ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या ॲग्री टुरिझम या संकल्पनेने केलेली प्रगती चांगली आहे, सध्या त्यामध्ये काय नवीन प्रयोग होत आहेत का? त्याविषयी काय सांगाल?**

**पांडुरंग तावरे -** २००३ मध्ये बारामती परिसरात कृषी पर्यटन या संकल्पनेची सुरुवात झाली. सुरुवातीला ही संकल्पना शेतकऱ्यांना समजावून सांगणे, त्याकडे आकर्षित करणे, त्यामधून होणारे फायदे पटवून देणे हे एक प्रकारचे टास्कच होते. शेतीच्या बरोबरीने अर्थार्जन करून देणारा एक जोड उद्योग असा विचार करून अनेकजण त्याकडे वळले आहेत. २००२ मध्ये जे राष्ट्रीय पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले होते त्यामध्ये ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी आधारित असणाऱ्या कृषी पर्यटनावर सर्वाधिक भर देण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण पर्यटन, गावातली संस्कृती, परंपरा, कला, आदी गोष्टींची जोड देण्यात आली होती. एका ॲग्री टुरिझमच्या केंद्रामधून किमान १५ ते २० जणांना थेट रोजगाराची संधी मिळू शकते. त्यामध्ये स्थानिक महिला, युवक, बचतगट अशा अनेकांचा समावेश असतो. अनेकजण कृषी पर्यटन केंद्रावर नावीन्यपूर्ण संकल्पना राबवू लागले आहेत. त्यामध्ये पतंग उत्सवासारख्या कल्पनांचा समावेश आहे. नव्या कल्पनांमुळे पर्यटक त्याकडे आकर्षित होतात आणि कृषी पर्यटनाला चांगल्या प्रकारची चालना मिळणे शक्य होत आहे.

**सध्या राज्यात किती कृषी पर्यटन केंद्रे आहेत?**

**पांडुरंग तावरे -** राज्यात कृषी पर्यटनाची संख्या १३०० पर्यंत गेली आहे. त्यामध्ये सर्वाधिक ३१४ कृषी पर्यटन केंद्रे ही पुणे जिल्ह्यात आहेत. त्या खालोखाल १४३ केंद्रे साताऱ्यामध्ये आहेत. मराठवाड्यात हे प्रमाण २८ तर विदर्भात ही संख्या ६० च्या आसपास आहे. भारतात कृषी पर्यटनाची केंद्रे तीन हजारपर्यंत आहेत. या संकल्पनेचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात यामध्ये चांगल्या प्रकारची वाढ होऊ शकते.

जगभरात देखील या संकल्पनेचा विस्तार होत आहे. यंदा जगाच्या पाठीवर देखील ॲग्री टुरिझमने ३०० US बिलियन डॉलरचे मार्केट गाठले आहे. दरवर्षी त्यामध्ये १२ टक्क्यांनी वाढ होत आहे. फक्त अमेरिकाच नाही तर युरोपमधले अनेक देश या संकल्पनेचा वापर करून शेतीच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारे प्रगती करत आहेत. या संकल्पनेमध्ये चांगल्या प्रकारचा रोजगार तयार होऊ शकतो, हे यामधून सिद्ध झाले आहे. सध्या जगात युरोपातील देशांनी कृषी पर्यटनाच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारची आघाडी घेतली आहे. भविष्यकाळात त्यामध्ये चांगल्या प्रकारची वाढ झाल्याचे आपल्याला पाहायला मिळेल. भारताबरोबरच चीन, तैवान, ब्राझील या देशांना कृषी पर्यटनाचे महत्त्व समजले आहे. त्यामुळे त्या देशातील सरकारने देखील कृषी क्षेत्राला पाठिंबा देण्याचे नियोजन केले आहे.

**शहरी पर्यटकांचे वाढते आकर्षण हा मुद्दा किती महत्त्वाचा वाटतो?**

**पांडुरंग तावरे -** नक्कीच... शहरी भागात राहणाऱ्या मंडळींना प्रदूषणाच्या वाढत्या समस्यांमुळे मोकळा श्वास घेणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. त्यामुळे सुटीच्या दिवशी निवांत ठिकाणी मोकळा श्वास जिथे मिळेल अशा ठिकाणी जाण्यास त्यांचे प्राधान्य असते. त्यापैकी अनेकजण शेतावर जाऊन कृषी पर्यटनाचा आस्वाद घेणे पसंत करू लागले आहेत. त्यामुळे कृषी पर्यटनाच्या विकासाला चांगल्या प्रकारची गती मिळू लागली आहे. वैयक्तिक मंडळींच्या बरोबरच कॉर्पोरेट कंपन्या, शाळा, महाविद्यालये यांना प्राधान्य देऊ लागली आहेत. विशेष म्हणजे पतंग उत्सव, हुरडा पार्टी अशा उपक्रमांच्यामध्ये त्याचा सहभाग वाढू लागला आहे. शेतकरी देखील त्यामुळे थेट ग्राहकांपर्यंत पोहोचला आहे. शेतीला जोडूनच हा व्यवसाय असल्यामुळे त्यामधून चांगल्या प्रकारचे आर्थिक उत्पन्न मिळवणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. कृषी पर्यटनाची संकल्पना हे वैयक्तिक शेतकरी, कृषी महाविद्यालये, कृषी विकास केंद्रे यांना राबवणे शक्य आहे.

*(मुलाखतकार वरिष्ठ पत्रकार असून विविध नियतकालिकांसाठी विविध विषयांवर लिखाण करीत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९४२१०८००७२ असा आहे.)*

■■

यशोगाथा : सूरज लोंढे,
अंगकोर ट्रॅव्हल्स कॉर्पोरेशन

# पर्यटनातून घडविली यशाची इमारत




**सूरज लोंढे यांनी सुरुवातीच्या काळात मार्केट रिसर्च आणि खाजगी बँकांमध्ये नोकरी केली; परंतु स्वतःचा उद्योग उभारण्याची इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे नोकरी सोडून बिल्डर्सचे तयार फ्लॅट आणि प्लॉट विक्रीचा व्यवसाय उभारला. यात चांगला जम बसला. मात्र त्यांचे मन सातासमुद्रापार, पर्यटनाकडे लागले होते. त्यामुळे फ्लॅट विक्रीचा व्यवसाय सोडून अंगकोर ट्रॅव्हल्स कॉर्पोरेशन ही टुरिझम कंपनी उभारली. आता भारतासह जगभरात पर्यटकांना घेऊन जातात. चांगली सेवा दिल्यामुळे त्यांना जाहिरात करण्याची गरज भासत नाही. दिवसेंदिवस त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत होत असतानाच सर्वसामान्य नागरिकांचे जगभ्रमंतीचे स्वप्नही पूर्ण होत आहे.**

**- निशिगंधा उमेश कणकवलीकर**

मी सूरज संध्या बाबुराव लोंढे. माझा जन्म १७ डिसेंबर, १९७८ रोजी झाला. बारावीच्या परीक्षेनंतर मी मार्केट रिसर्चचे काम केले. त्यामुळे मी लोकव्यवहारात पटाईत झालो. पुढे मी आयसीआयसीआय बँकेअंतर्गत मार्केटिंग क्षेत्राकडे वळलो. त्यानंतर मला डीएचएफएलमध्ये चांगल्या पगाराची कायमस्वरूपी नोकरी मिळाली; पण मी नोकरीत संतुष्ट नव्हतो. माझा सौ. गीता सोबत प्रेमविवाह झाला. २०१४ च्या सुमारास माझ्या जीवनात एक टर्निंग पॉइंट आला. तो म्हणजे 'मी विजेता होणारच!' कार्यक्रम पाहणे आणि 'मी विजेता होणारच!' पुस्तक वाचणे. मी डॉ. उमेश कणकवलीकर सरांच्या आदरयुक्त प्रेमात पडलो आणि जीवनात नोकरी सोडून काहीतरी आगळेवेगळे करण्याचा विचार करू लागलो. सरांच्या कार्यक्रमातून आणि पुस्तकातून आपणही शून्यातून विश्वनिर्मिती करू शकतो याची जाणीव झाली होती; पण धाडसी पाऊल टाकण्यासाठी मला कोणीतरी कड्यावरून ढकलण्याची गरज होती, जेणेकरून मी कम्फर्ट झोन सोडून ग्रोथ झोनमध्ये झेप घेण्यास सक्षम झालो असतो. तो काळ माझ्यासाठी संघर्षाचा होता. मी अक्षरशः नैराश्यात होतो. संसार, नोकरी आणि उद्योजक होण्याची इच्छाशक्ती या तिहेरी चक्रामध्ये मी गुरफटलेलो होतो.

मी धीर करून सरांना फोन केला. तो माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय क्षण होता. एका महान व्यक्तीशी संवाद साधताना एक आगळावेगळा अनुभव येत होता. त्यानंतर सरांनी सलग तीन दिवस माझे समुपदेशन केले. मला प्रशिक्षित केले आणि आयुष्यभर पुरेल अशी ज्ञानाची शिदोरी सप्रेम भेट म्हणून अर्पण केली. त्या तीन दिवसांचे सरांनी माझ्याकडून एकही रुपया मानधन घेतले नाही. माझ्या मनात सरांची एक व्यावसायिक प्रतिमा होती; पण सरांनी दिलेल्या योगदानामुळे ती प्रतिमा कायमची पुसली गेली. सरांच्या यशस्वी माणूस घडवणाऱ्या कार्याविषयी सुस्पष्ट चित्र उभे राहिले. सर जे बोलतात, ते करून दाखवतात. ते आपले विचार लोकांपर्यंत रोखठोक मांडतात. ते सत्याची कास धरतात. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या म्हणीप्रमाणे त्यांचे जीवन आहे. सत्याची कास धरणे हे कठीण जरी असले, तरी अशक्य नसते. सर लाखो लोकांना मार्गदर्शन करतात; पण त्यातले काहीच सरांशी थेट संपर्क करू शकतात. सर एक व्हीआयपी व्यक्तिमत्त्व आहेत; पण मी त्यांच्यापर्यंत पोहोचू शकलो, म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजतो. आजही आम्ही आमचे स्नेहसंबंध जोपासत आहोत. एका वाक्यात बोलायचे झाले, तर आपल्या स्वप्नांसाठी आपल्याला प्रज्ज्वलित करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. उमेश कणकवलीकर.

एखाद्या महान व्यक्तीशी भेट झाली तर त्या तात्पुरत्या झालेल्या भेटीने तात्पुरता आनंद निश्चित मिळतो; पण सरांची झालेली ती भेट कायमस्वरुपी सुख, समाधान आणि आनंद देणारी ठरली. त्या तीन दिवसांच्या भेटीने माझे आयुष्य १८० अंशामध्ये बदलले. आकर्षणाचा सिद्धांत ऐकला होता; पण मी तो प्रत्यक्ष अनुभवला आहे. यशदा, पुणे येथे मी सरांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण घेतले आहे, ज्याचा मला

आयुष्यभर फायदा होत आहे. सर प्रशिक्षणादरम्यान म्हणतात की, आपल्या यशाच्या रॉकेटचे यशाच्या दिशेने उड्डाण करायचे असेल, तर ज्याप्रमाणे रॉकेटच्या बुडाखाली आग लावलेली असते, तशी आपल्याला ज्वलंत इच्छाशक्तीची आग लावून घेता आली पाहिजे. कर्म-धर्म-संयोगाने मला हे जमले. मला खात्री होती की या व्यक्तिमत्त्वामुळे माझ्या जीवनाला कलाटणी मिळेल. 'आम्ही तुमचे भविष्य घडवत नाही, आम्ही तुम्हालाच भविष्यासाठी घडवतो', या सरांच्या ब्रीदवाक्याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे.

मी नोकरी सोडली आणि फ्रीलान्सिंग विक्रेता झालो. स्वतःच्या हिमतीवर बिल्डर्सना थेट संपर्क करून त्यांचे प्लॉट्स आणि फ्लॅट्स ग्राहकांना थेट विक्री करू लागलो. हळूहळू मी एक यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपाला येऊ लागलो; पण फक्त पैसा कमावणे आणि कुटुंबासोबत सुखा-समाधानाने उदरनिर्वाह करणे हे माझ्या जीवनाचे उद्दिष्ट नव्हते. माझी आवड होती पर्यटन. इच्छा असली की मार्ग सापडतो. त्या वेळेस रिअल इस्टेट उद्योगात सरकारने नियम, अटी आणि निर्बंध लागू केले. अर्थात हे सर्व ग्राहकांच्या हिताचे होते; पण माझ्या मनाने कौल दिला, हीच ती वेळ आहे आपल्याला जे आवडते, आपले जे पॅशन आहे त्यालाच मिशन बनवायचे आणि स्वतःला सिद्ध करून विजेता व्हायचे. निर्णय घेणे आणि घेतलेला निर्णय तडीस नेणे हे मी आतापर्यंत शिकलो होतो. मी रिअल इस्टेटचा उद्योग सोडून पर्यटन क्षेत्राच्या उद्योगाकडे वळलो आणि जीवनाला मनाजोगी कलाटणी मिळाली.

माझ्या उद्योगाचे नाव आहे 'अंगकोर ट्रॅव्हल कॉर्पोरेशन'. पुण्यात डेक्कन जिमखाना या मध्यवर्ती ठिकाणी आमचे कार्यालय आहे. अंगकोर हे जगातील सर्वांत विशाल प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर कंबोडिया देशामध्ये आहे. काही लोक म्हणतात की हे विष्णूचे मंदिर आहे, तर काही म्हणतात हे बुद्धाचे मंदिर आहे. मी या मंदिरात अनेकदा यात्रेसाठी जातो. याच मंदिरात माझ्या अंतर्मनातून आवाज आला की, मी पर्यटन क्षेत्रातील यशस्वी उद्योजक होणारच! त्या अनुषंगाने मी पर्यटन क्षेत्राचा अभ्यास सुरू केला. या विषयाचे ज्ञानार्जन करत असताना हा विषय मी जनसमुदायाकडे प्रत्यक्ष, फोनद्वारे किंवा सोशल मिडियाच्या माध्यमातून सादर करू लागलो. लोकांना माझे मार्गदर्शन आवडू लागले. आज हाच माझा अर्थार्जनाचा विषय झाला आहे.

अंगकोर ट्रॅव्हल्समध्ये आम्ही आशिया खंडाकडे लक्ष केंद्रित केलेले आहे. दुबई, सिंगापूर, थायलंड, बँकॉक, पटाया, मलेशिया, कंबोडिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम, बाली, श्रीलंका, म्यानमार इत्यादी देशांमध्ये आम्ही सहलींचे आयोजन करतो. या देशांमध्ये मध्यमवर्गीय कुटुंब सहज जाऊ शकतात. त्यांना खाण्यापिण्याची आणि भाषेची अडचण येत नाही. तसेच भारतातील गोवा, केरळ, काश्मीर, राजस्थान, सिक्कीम, दार्जिलिंग येथील सहलींचेसुद्धा आम्ही आयोजन करतो. आम्ही आमच्या उद्योगात ग्राहक-संतुष्टतेचा जास्त विचार करतो. ग्राहकांना त्यांच्या मनाजोगी सेवा पुरवली की तेच आपल्या उद्योगाची माऊथ-टू-माऊथ पब्लिसिटी करतात आणि नवीन ग्राहक मिळवून देतात. त्यामुळे आम्हाला आमच्या उद्योगाची कुठेही जाहिरात करावी लागत नाही, ही आमच्या यशस्वी उद्योजकतेची पोचपावती आहे. कस्टमाइझ्ड, अर्थात ग्राहकांच्या इच्छेनुसार सहली, हनिमून टूर्स, फॅमिली टूर्स, ग्रुप सहली, धार्मिक सहली, कॉर्पोरेट इव्हेंट टूर्स इत्यादींचे आयोजन करणे ही आमच्या अंगकोर ट्रॅव्हल कॉर्पोरेशनची खासियत आहे. आम्ही पर्यटनादरम्यान अंगकोरच्या ग्राहकांच्या पैशांची बचत करून देतो. कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त चांगली टूर करण्याचा आमचा प्रयत्न असतो. पर्यटकांच्या आवडी-निवडीचा, गरजांचा अभ्यास करून त्या अनुषंगाने आम्ही त्यांना मार्गदर्शन करतो, हे लोकांना खूप आवडते. आम्ही लोकांना पर्यटनाची साद घालू लागलो आणि उत्तम सेवेची कास धरल्यामुळे ग्राहक प्रतिसाद देऊ लागले.

माझ्या पालकांकडून मी इमाने-इतबारे कष्ट करून कसे जगायचे हे धडे घेतले होते. माझ्या आई-वडिलांनी स्वबळावर आशिया आणि युरोप खंडातील देशांच्या सहलींचा आनंद लुटला आहे; पण माझे एक स्वप्न होते की मी माझ्या जन्मदात्यांना माझ्या कष्टाच्या पैशांनी दुबई ट्रीप घडवून आणणारच! आणि मी माझे हे स्वप्न साकार केले. अलीकडेच मी माझ्या आई-वडिलांना इतर पर्यटकांबरोबर काश्मीरच्या टूरला घेऊन गेलो होतो. लहानपणापासूनच 'कश्मीर की कली' हा चित्रपट, तसेच 'ये कश्मीर है' अशी गाणी ऐकली होती. त्यामुळे भारतीयांसाठी आपले काश्मीरच स्वित्झर्लंड आहे, म्हणून मी कपल्ससाठी काश्मीर टूरचे विशेष आयोजन करतो.

माझी पत्नी, सौ. गीता हिची मला मोलाची साथ लाभली आहे. पर्यटनाचा उद्योग म्हटला की घरापासून लांब जाणे स्वाभाविकच असते. माझ्या गैरहजेरीत संसाराचा गाडा ती कुशलतेने सांभाळते. आम्हाला अदिती नावाची एकुलती एक मुलगी आहे. अदितीला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते प्यायल्यावर माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही', हा विचार तंतोतंत पटला आहे. त्यामुळे ती कधीही शाळा चुकवत नाही आणि मनःपूर्वक अभ्यास करते. अदितीचे शिक्षण, आजारपण, मौजमजा इत्यादींकडे माझे बरेचदा दुर्लक्ष होते; पण गीता संगोपनाचे संतुलन अप्रतिमपणे राखते. तिचा स्वतःचा 'गीतांजलीज् ब्युटी केअर' हा विकसनशील बिझिनेस सुरू आहे. ती तिच्या क्षेत्रात यशाच्या पायऱ्या सर करत आहे. तिच्या सहकार्याशिवाय माझा अंगकोरचा उद्योग यशस्वीरीत्या चालवणे शक्य नाही. माझे नशीब बलवत्तर आहे की, मला गीतासारखी सुलक्षणी पत्नी आणि अदितीसारखी समजूतदार मुलगी लाभली. मला माझ्या आई-वडिलांचे, थोरली बहीण ज्योती आणि धाकटा भाऊ तुषार यांचे सहकार्य पदोपदी लाभते.

मी माझ्या कुटुंबीयांनासुद्धा पर्यटनाला घेऊन जात असतो. त्यावेळेचा अनुभव हा आनंददायी असतो; पण जेव्हा मी पर्यटकांना घेऊन जातो, तेव्हा जबाबदारीची भावना जास्त असते. माझ्या सोशल मीडियावरील पोस्ट वाचून सर्व आनंदाने म्हणतात की, 'तुमचं आयुष्य म्हणजे एक आनंदयात्रा आहे. आम्ही रोजच कामाला जातो आणि कधीतरी पर्यटनाला जातो आणि तुम्ही मात्र रोजच पर्यटनाला जाता.' दिसते तसे नसते, ज्याचे जळते त्यालाच कळते; कारण जीवन म्हटले म्हणजे प्रत्येकाला अडचणी असतात. मलाही अशाच अडी-अडचणींवर मात करावी लागते. मी त्याला अपवाद नाही. कोरोना हा काळ आम्हा

उभयतांसाठी संकटग्रस्त कालखंड होता. आमच्या दोघांच्या उद्योगावर त्याचा विशेष परिणाम झाला; कारण या काळात सगळ्यात शेवटी पूर्ववत सुरू झालेल्या उद्योगांमध्ये पर्यटन आणि ब्युटी पार्लर या दोन उद्योगांचा समावेश होता; पण याच काळात आम्ही आमच्या उद्योगांचा सखोल अभ्यास केला आणि कर्दनकाळाचे रूपांतर सत्कार्यात केले. खरे तर आमच्याकडे मिशन आणि पॅशन असल्यामुळे आम्ही आमच्या उद्योगात खंबीरपणे टिकून आहोत. आम्ही उद्योग सुरू केला होता त्यावेळेस परिस्थितीशी खूप झुंज द्यावी लागली होती; पण आता उत्तम ग्राहक सेवेमुळे सतत पर्यटनाविषयीच्या चौकशीचा ओघ चालू असतो.

मला वाचनाचा छंद आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'वाचाल तर वाचाल' आणि आमचे सर डॉ. उमेश कणकवलीकर म्हणतात, 'वाचाल तरच जिंकाल', हे अगदी तंतोतंत सत्य आहे. आज आमच्या घरात ५०० पेक्षा जास्त पुस्तकांची आमची स्वतंत्र लायब्ररी आहे. हे आमच्या मानसिक, शारीरिक, आर्थिक, सामाजिक, आध्यात्मिक प्रगतीचे शक्तिस्थळ आहे. पर्यटन आणि इतर व्यक्तिमत्त्व विकास करणारी पुस्तके आमच्या संग्रही आहेत. आम्ही टीव्ही पाहत नाही, क्रिकेट पाहत नाही. तो वेळ आम्ही आमचा व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी सत्कारणी लावतो. मी अधूनमधून स्वतःसाठी आणि इतरांची सेवा करण्यासाठी विपश्यना केंद्रात जात असतो.

एकदा मी सरांना म्हणालो की, 'तुम्ही तुमच्या जीवनातील तीन दिवसांचा बहुमूल्य वेळ मला दिलात, त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे.' त्यावर सर म्हणाले, 'जगात असंख्य लोकांचे असंख्य प्रश्न आहेत. त्यातील एकाला जरी आपण मदत केली, तरी आपण प्रश्नांचा नाही, तर उत्तराचा भाग होतो. तुम्ही निवडलेल्या पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून लोकांना चांगली सेवा देऊन मदत करा. 'सूरज' या नावाप्रमाणे लोकांच्या जीवनात तुमच्या कार्याचा सूर्यप्रकाश पोहोचवा आणि विजेता व्हा.' या अनमोल मार्गदर्शनामुळे माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. आज त्यांनी दिलेल्या दिव्य संदेशाच्या आधारेच मी उद्योगात प्रगतीपथावर आहे. मी एक यशस्वी उद्योजक म्हणून आजच्या तरुण पिढीला एक मित्रत्वाचा सल्ला देऊ इच्छितो, तो म्हणजे, तुम्ही मोठी स्वप्नं पाहा आणि पाहिलेली स्वप्नं बिनधास्त जगा. भरपूर प्रवास करा; कारण प्रवासादरम्यान नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. ज्या वेळेस सरांनी मला तीन दिवसांचे प्रशिक्षण दिले त्या वेळेस मला तरी कुठे माहीत होते की, आज जे सर मला मार्गदर्शन करत आहेत, तेच पुढे जाऊन मी नावारूपाला आल्यावर माझी 'उद्योजक' मासिकासाठी मुलाखत घेतील? आज माझा आनंद गगनात मावेनासा झालेला आहे. सरांचे उद्योजक मासिकातील लेख वाचताना मी स्वप्न पाहायचो की, एक दिवस माझाही लेख प्रकाशित होईल. आज माझे हे स्वप्न पूर्ण होत आहे. स्वप्न पाहिली आणि ती साकार करण्यासाठी जीवाचे रान केले, तर निश्चितच स्वप्न साकार होतात याची आज प्रचिती येत आहे. 'मी यशस्वी उद्योजक होणारच!' 'मी विजेता होणारच!' जय अंगकोर!

*(या लेखाच्या लेखिका पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी करायच्या. आता त्या एक प्रशिक्षक आणि सामाजिक उद्योजिका आहे. त्यांचे मीच!' नावाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. ८ मार्च, २०२२ या जागतिक महिला दिनी, लहान ते महान प्रवास केलेल्या एका सामर्थ्यशाली, आयकॉनिक भारतीय महिलेला भेटण्याचे माझे स्वप्न मी पूर्ण केले. email – nishamissionvijeta@yahoo.com)*



*महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या प्रेरक प्रशिक्षकांची क्षमता बांधणी कार्यक्रम वारंवार घेतले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) यांच्यासाठी सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रम मा. श्रीमती रिटा सेनगुप्ता, माजी संचालक, निसबूड, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण कार्यक्रम, एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी डावीकडून श्री. प्रमोद लांडे, श्री.किरण जाधव, उद्योग विभाग, छत्रपती संभाजीनगर, श्री.बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर, श्रीमती रिता सेनगुप्ता, माजी संचालक, निसबुड, नवी दिल्ली, श्री. दत्तात्रय थावरे, विभागीय अधिकारी, श्री. विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख, श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक तथा उद्योजक विभाग प्रमुख दिसत आहेत.*



स्वतःच्या वाहनातून परदेशात भटकंती

# सातासमुद्रापार व्हाया सेल्फ ड्राईव्ह रोड ट्रिप

**सचिन अभ्यंकर यांनी २०१० मध्ये पहिल्यांदा इंग्लंडचे पर्यटन स्वतःचे वाहन चालवत पूर्ण केले. पर्यटनाची ही संकल्पना इतरांनाही पसंतीस पडली. त्यांच्या आग्रहाखातर अभ्यंकर यांनी पर्यटनाचा व्यवसाय सुरू केला. विदेशात जाऊन तेथे कार भाड्याने घ्यायची आणि संपूर्ण देश फिरायचा असे या पर्यटनाचे स्वरूप आहे. हे पर्यटन करताना मोठी जोखीमही आहे. प्रत्येक देशाचे वेगवेगळे कायदे, नियम आहेत. त्यांचे तंतोतंत पालन करत पर्यटनाचा आनंद घ्यावा लागतो. त्यांनी आजवर ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, जपान आदी देशांमध्ये असे टूर काढत पर्यटकांना एक वेगळी अनुभूती दिली आहे. - प्रतिनिधी**

प्रत्येकाला कोणता ना कोणता छंद असतो. काहीजण त्याचा वापर मर्यादित स्वरूपात करतात, तर काहीजणांच्या छंदाचे रूपांतर हे व्यवसायात कसे झाले, हे त्याचे त्यांना समजत नाही. तुम्हाला असा प्रश्न पडला असेल मी हे काय सांगतोय. काही नाही, माझ्या बाबतीत घडलेला अनुभव तुमच्याबरोबर शेअर करतोय. मला पहिल्यापासूनच भटकण्याची सवय. दरवर्षाला देशात कुठेतरी एखादे राज्य निवडायचे, तिथली हटके लोकेशन्स शोधायची, बॅग भरायची आणि कुटुंबासोबत ट्रीपला बाहेर पडायचे. या ट्रीपसाठी दोन आठवड्याचा वेळ राखून ठेवायचा. माझ्या या उपक्रमाची सुरुवात झाली ती १९९७ मध्ये. त्यानंतर २००० मध्ये असाच युरोपमध्ये फिरायला गेलो. मीच माझे तिकीट काढले. ऐनवेळी हॉटेलचे बुकिंग केले. अगदी माझ्या सोईनुसार मी ट्रिप केली. त्यानंतर २००३ मध्ये, सिंगापूर, २००५ मध्ये थायलंड अशा ट्रिप सुरू होत्या. दरवर्षी ट्रिप व्हायचीच. त्यामध्ये खंड पडल्याचे मला आठवत नाही.

गोष्ट असेल २०१० मधली. मी इंग्लंडला फिरायला गेलो होतो, तेव्हा आपण सगळी सफर गाडी चालवत करायची हे निश्चित केले होते. तसे तिथे पोहोचल्यावर गाडी भाड्याने घेऊन सेल्फ ड्राईव्ह रोड ट्रिपचा नवा फंडा मला सापडला. तेव्हा गाडी घेऊन मी इंग्लंड, स्कॉटलँड अशी सफर केली. त्यामध्ये लंडन, मँचेस्टर, लेग डिस्ट्रिक्ट अशी सगळी सफर गाडी चालवत पूर्ण केली. या संपूर्ण सफरीमध्ये नवी ठिकाणे पाहायला मिळाली. एखादे मनमोहक निसर्गरम्य दृश्य दिसले की गाडी थांबवायची, फोटो काढायचे, तिथे रमायचे, तिथल्या लोकांशी संवाद साधायचा, तिथल्या पदार्थांची चव चाखायची, त्यामुळे त्या ट्रीपला फारच मजा आली. ती ट्रिप करून पुण्याला परतलो तेव्हा मी गाडी चालवत देश फिरल्याची माहिती मित्रमंडळीपर्यंत पोहोचली होती. त्यामुळे मित्रमंडळी मागे लागली. अरे तू स्वतः गाडी चालवत फिरतोस तर व्यवसाय म्हणून त्याची सुरुवात का करत नाहीस. ट्रॅव्हलिंगची ही कन्सेप्ट फारच भन्नाट आहे, त्याला चांगला रिस्पॉन्स मिळेल. माझा सीए असणारा मित्र जयेश दुधेडिया हा व्यवसाय सुरू कर म्हणून फारच मागे लागला होता. त्यामुळे धाडस केले आणि पॅशनमधून उभा राहिला हा अनोख्या फॉरमॅटचा व्यवसाय... इतकेच नाही तर पहिल्याच ट्रिपमध्ये तो पर्यटकांच्या पसंतीला उतरला...

### सीएचे शिक्षण, पेन्टिंगचा व्यवसाय...

१९९३ मध्ये पुण्याच्या बी.एम.सी.सी. कॉलेजमधून बी.कॉम. झाल्यानंतर सीए, आयसीडब्ल्यूएचे शिक्षण पूर्ण झाले. घरचा रंगकामाचा व्यवसाय होता. त्यामुळे सीए करत असताना देखील आपला घरचा व्यवसाय पुढे चालवायचा. कुठेही सीएचे प्रोफेशन करायचे नाही, नोकरी करायची नाही. आपण जरा वेगळे करायचे हे ध्येय सुरुवातीपासून ठेवले होते. घरचा व्यवसाय पाहता पाहता दरवर्षी भारतात एका ठिकाणी फिरायला जायचे, एक वेळापत्रक सेट होऊन गेले होते. हळूहळू देश फिरता फिरता नकळतपणे २०१० पासून विदेशात फिरायला जाण्यास सुरुवात झाली होती. २०१२ पर्यंत दरवर्षी युरोपमधले दोन देश, अमेरिका नॉर्थ-वेस्ट-कोस्टपर्यंतचा ८००० किलोमीटर अंतराचा प्रवास स्वतः कार चालवत पूर्ण केला. त्यामध्ये नऊ नॅशनल पार्क, पाच मोठी शहरे - त्यामध्ये कॅलिफोर्निया, नेवाडा, ओरिझोना, मॉन्टाना, ओरेगॉ

न अशी राज्य गाडीने प्रवास करून पहिली. गाडीने प्रवास करताना बऱ्याचदा विरळ लोकसंख्येचा प्रदेश, गाडी बंद पडणे, पंक्चर होणे, अशा अडचणींचा सामना करावा लागू शकतो, याची तयारी ठेवावी लागायची. सुरुवातीला जगाच्या सफरीवर वेगवेगळ्या देशात जायला सुरुवात केली तेव्हा मी आणि माझी पत्नी आरती आम्ही दोघेच जण असायचो. आपण स्वतः गाडी चालवत तो देश बघण्यात जी मजा आहे, ती आपल्याला एखाद्या टूरसोबत जाऊन अनुभवता येणार नव्हती. त्यामुळे मी जरा दोन पावले पुढचा विचार करून हा एक वेगळा हटके मार्ग निवडला होता.

### कशाला नको ते साहस

विदेशात जाऊन तिथे कार भाड्याने घेऊन तो देश फिरायचा, या माझ्या उपक्रमाची माहिती घरात सर्वदूरपर्यंत पोहोचली होती. तेव्हा कशाला नको ते साहस करतोयस, एखाद्या टूरबरोबर जायचे, देश बघायचा, परत यायचे, ते कसे अगदी सुरक्षित असते, त्यांच्यावर आपली जबादारी असते, अशी पट्टी मला नातेवाइकांनी पढवली होती. पण त्याकडे लक्ष द्यायचे नाही, हो ला हो करायचे हे मी ठरवले होते. साहस करणे, हे मला पहिल्यापासून आवडते. त्यामुळे आपण हे जे काही करत आहोत तो आपल्या साहसाचा एक भाग आहे, म्हणून मी त्याच्याकडे पाहत आलो आहे.

### २०१३ मध्ये सुरू झाला व्यवसाय...

पर्यटकांना विदेशात घेऊन जायचे आणि गाडीतून फिरवून देश दाखवायचा व्यवसाय सुरू झाला २०१३ मध्ये... आपण विदेशात ज्या प्रकारे फिरतो त्याचा व्यवसाय होईल, असे मला कधीच वाटले नव्हते. मित्रांच्या आग्रहाखातर सुरू केलेला हा व्यवसाय कितपत यशस्वी होईल, लोकांना तो कितपत आवडेल, असे प्रश्न मनात होते. या नव्या व्यवसायाची कोणतीही जाहिरात न करता, ऑफिस न थाटता, किती लोक येतील याबद्दल शाश्वती नव्हती. आपल्याला आर्थिकदृष्ट्या हे कितपत परवडेल, असे एक ना अनेक प्रश्न माझ्यासमोर आ वासून उभे राहिलेले होते. आपण ज्या देशात गेलेलो नाहीत, त्या ठिकाणी पर्यटकांना घेऊन जाण्याचे ठरले. त्यासाठी भरपूर होमवर्क केला आणि २०१३ च्या नोव्हेंबर महिन्यात ऑस्ट्रेलियाला ट्रिप नेण्याचे पक्के केले. जुलै महिन्यापासून त्याचे नियोजन सुरू केले. पहिलीच व्यावसायिक ट्रिप घेऊन जाताना सहा लोक जमतील की नाही अशी धाकधूक मनात होती; पण चक्क १२ जण जमले त्या ट्रिपसाठी. मनातून आनंद झाला होता; पण ती एकदम हटके करण्याचे एक आव्हान माझ्यासमोर होते.

नोव्हेंबर महिन्यात नियोजित वेळापत्रकानुसार सर्व १२ जणांना घेऊन ऑस्ट्रेलियात दाखल झालो. सिडनी, मेलबोर्न, ग्रेट ओशन रोड या जागा दाखवताना ग्रेट बॅरियर रिफ (ज्या ठिकाणी जगातील सर्वांत मोठे नैसर्गिक कोरल फॉर्मेशन आहे ती जागा) रस्त्याने ब्रिस्बेन ते केन्स (पोर्ट डगलस) असा एकूण १७४३ किलोमीटर अंतराचा प्रवास स्वतः गाडी चालवत करत या पर्यटकांना प्रकाशात येणारी विविध ठिकाणे फ्रेझर आयलँड, टर्टल वेस्टीन ॲट बंडाबर्ग या ठिकाणी कासवाने घातलेली अंडी, टाऊन ऑफ १७७० जेम्स कुकने ऑस्ट्रेलियाचा शोध लावला ती जागा, या जागा दाखवल्या. सोबत आलेल्या पर्यटकांना त्याचा अनोखा अनुभव आला. त्यांनी या नियोजनाचे तोंडभरून कौतुक केले. झाले, तिथून या ट्रिपच्या माऊथ टू माऊथ पब्लिसिटीला सुरुवात झाली. आपल्यासोबत आलेले पर्यटक खूश झाल्यामुळे मला देखील आनंद झाला होता.

### भारतातून येणारे तुम्ही पहिले असाल...

टाऊन ऑफ १७७० मध्ये एक मँगो ट्री मोटेल नावाचे हॉटेल होते. तिथे आम्ही सर्वजण गेलो होतो. तेव्हा हॉटेलच्या मालकाबरोबर आम्ही बोलत होतो. तेव्हा तो म्हणाला, भारतातून इथे पर्यटकांना फिरायला घेऊन येणारे तुम्ही पहिले असाल... त्याच्या त्या वाक्यावर मी दोन मिनिटे थबकलो होतो; पण त्याने ते बोलणे म्हणजे माझ्यासाठी चांगल्या कामाची एक पावतीच होती. आपल्यासोबत आलेल्या पर्यटकांना सोयीचे काय आहे ते दाखवण्याऐवजी त्या ठिकाणी उत्तम काय आहे ते दाखवायचे हे मी पहिल्यापासूनच ठरवले होते. त्यामध्ये कुठेही तडजोड करायची नाही हे निश्चित केले. एखादा देश पाहण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या उत्तम कालावधी कोणता आहे, त्याचा विचार करूनच ट्रिपचे नियोजन करायचे हे तत्त्व ठेवून काम करायचे ठरवले होते. त्यामध्ये आजतागायत कोणताही बदल झालेला नाही आणि भविष्यात देखील होणार नाही.

### महामार्गाने न जाता अंतर्गत रस्त्याने फिरण्यात मजा...

विदेशात गाडी घेऊन रोडने सफर करत असताना महामार्गाने



*मा. श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह, भाप्रसे, विकास आयुक्त (उद्योग) तथा , अध्यक्ष, सुकाणू समिती, MCED यांनी MCED नागपूर येथे उद्योग भवनला भेट देऊन प्रशिक्षणाचा आढावा बैठक घेतली. यावेळी श्री. एस. एस. मुद्दामवार, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर, श्री. हेमंत वाघमारे, केंद्र प्रमुख, उपकेंद्र; श्री. श्रीकांत कुलकर्णी, प्रकल्प आधिकारी, कु. शिवानी गायकवाड जिल्हा प्रकल्प समन्वयक सौ. कलावती खैरे, विभागीय लेखा हजर होते .. मा. आयुक्त उद्योग यांनी MCED उपकेंद्र हिंगणा येथे दिनांक १९/१२/२०२३ ला भेट देण्याकरिता वेळ दिला याबद्दल धन्यवाद.*

फिरण्याऐवजी तिथल्या अंतर्गत रस्त्यानं फिरण्यात एकप्रकारची वेगळीच मजा मिळते. त्यामुळे त्या देशाची प्रदेशाची खाशियत काय आहे, याची जवळून ओळख होते. लोकल फूडची चव घेता येते. त्या परिसरात असणाऱ्या सार्वजनिक वाहनातून व्यवस्थेचा अनुभव घेता येतो. त्या भागातील स्थानिक लोक कसे जगतात, त्यांची भाषा, वेश, जेवणातील पदार्थ, असे एक नाही तर अनेक पैलू जवळून अभ्यासता येतात. त्याची मजा काही वेगळीच असते.

२०१४ मध्ये मे महिन्यात झेक रिपब्लिक, स्लोव्हाकिया, हंगेरी, या ईस्टर्न युरोपची सहल आयोजित केली होती. त्याला देखील १२ पर्यटक आले होते. तेव्हा आपल्यासोबत आलेल्या पर्यटकांनी देखील गाडी चालवावी म्हणून मी त्यांना प्रेरणा दिली. त्यामुळे पर्यटक देखील खुश झाले.

### चुकीला माफी नाही...

विदेशात गाडी चालवत असताना वाहतुकीच्या नियमांकडे फार बारकाईने लक्ष द्यावे लागते. अति वेगाने गाडी चालवणे, सिग्नल तोडणे, शहरात फिरत असताना स्कूल बसच्या पुढे जाणे, बऱ्याचदा एखाद्या देशात भाषा समजत नसल्यामुळे गाडी पार्किंग करताना अनावधानाने होणारी चूक महागात पडू शकते. तिथे चूक केली की त्याचा दंड भरावाच लागतो. तिथे चुकीला माफी नाही. २०१४ मधली गोष्ट असेल. अशीच ट्रिप घेऊन मी न्यूझीलंडला गेलो होतो. तेव्हा तिथे वेगमर्यादा लक्षात न आल्याने मला दंड भरावा लागला होता. ट्रिप पूर्ण करून मी पुण्याला परतलो तेव्हा मी ज्या कंपनीकडून गाडी भाड्याने घेतली होती, त्यांनी ते चलन माझ्या पुण्याच्या पत्त्यावर पाठवले होते. ती दंडाची रक्कम मला भरावी लागली होती. एकदा तर ग्रीसमध्ये भाषा समजत नसल्यामुळे माझ्याकडून चुकून नो पार्किंगच्या ठिकाणी गाडी लावली गेली होती. त्याचा दंड मी तिथल्या पोस्ट ऑफिसमध्ये भरला होता. पर्यटकांना घेऊन जाताना गाडी पंक्चर होण्याचे प्रसंग अनेकदा झाले होते.

### अनुभव दक्षिण आफ्रिकेचा

२०१५ मध्ये मी दक्षिण आफ्रिकेमध्ये अशीच टूर घेऊन गेलो होतो. तेव्हा हा देश खूप असुरक्षित आहे, आपण चाललो आहे खरं पण इथे काही लुटालुटीचे प्रकार होतील का, अशी एक भीती माझ्यासोबत असणाऱ्या पर्यटकांच्या मनात होती; पण ती ट्रिप अगदी उत्तम झाली. जोहानन्सबर्ग, केपटाऊनपासून ते वायनरीसाठी जगात प्रसिद्ध असणाऱ्या जॉर्जटाऊनपर्यंतचा तीन हजार किलोमीटरपर्यंतचा प्रवास सुरक्षितपणे केला होता. ब्लाउक्रन्समधील ब्रिजबंजी प्रसिद्ध आहे, त्याचा अनुभव अनेक पर्यटकांनी घेतला.

### फेमस जपान

जपानमधल्या पायाभूत सुविधा उत्तम आहेत, असे आपण ऐकत असतो. अनेकजण तिथे गेले की तिथल्या बुलेट ट्रेनमध्ये बसायचा चान्स सोडत नाहीत. प्रत्यक्षात जपान रस्त्याने फिरत असताना तिथल्या पायाभूत सुविधा कशा उभ्या केल्या जातात याचा अनुभव घेता आला. पर्यटकांना देखील तो दाखवता आला. तिथले रस्त्याचे नेटवर्क अगदी पाहण्यासारखं आहे. जपानमधल्या Contryside असणाऱ्या सुंदर जागा, याखेरीज टाकायामा, शिरकवागो, Qrob हा बर्फाच्छादित प्रदेश, माउंटफुजी परिसरातील पाणतळी, आशिकागा येथील इस्टोरिया फ्लॉवर पार्क अशा कितीतरी अनोख्या जागा सांगता येतील, हे सर्व पाहून पर्यटक भारावून गेले होते. खासकरून गाडीने फिरून देश बघण्यात जी मजा आहे, ती अन्य कशामध्ये नाही, असा अभिप्राय याचा अनुभव घेतलेल्या अनेक पर्यटकांनी नोंदवला आहे.

### टूरचा व्यवहार पारदर्शी

विदेशात गाडीने पर्यटन करण्याचा व्यवसाय करत असताना त्यामध्ये पारदर्शीपणा ठेवण्याचे तत्त्व पहिल्यापासून पाळत आलो आहे. कोणतेही पॅकेज करून त्याची विक्री न करता प्रवाशांना पुणे ते पुणे प्रवास खर्च, तिथले राहणे-खाणे, फिरणे, पर्यटनाच्या ठिकाणी असणारी एन्ट्री तिकिटे, अन्य प्रासंगिक खर्च याची पूर्वकल्पना त्यांना दिली जाते. हे सगळे करण्यासाठी खर्च किती लागणार आहे, याची पूर्वकल्पना त्यांना देतो. त्यामुळे संपूर्ण व्यवहारात पारदर्शकता राहते. त्यामुळे सुरुवातीपासून मी हेच मॉडेल राबवत आलो आहे. पर्यटकांची संख्या मर्यादित असल्यामुळे टूरच्या दृष्टीने ते बरे पडते. २०२० नंतर आलेल्या कोरोनामुळे व्यवसाय बंद झाला होता; पण आता सारे पुन्हा एकदा खुले होतेय. परदेशात प्रवासाला जायचे असेल तर त्याचे नियोजन कसे करायचे, तिकीट, व्हिसा, विमा, हॉटेल बुकिंग, तिथले डे टू डे नियोजन, मेट्रो कुठे पकडायची, कुठे कसे जायचे याचे नियोजन करून देण्याचे काम देखील सुरू केले आहे. ■■






एमसीईडी प्रशिक्षीत उद्योजक : संजय नागरे, नागरेज मसाले...

# सुगरण मसाल्याने दरवळला यशाचा सुगंध

**बालपणापासुन संघर्षाची सवय असणारे संजय नागरे यांनी काही काळ सूतगिरणीत काम केले, खरबूजे विकले, शिक्षक होण्याची महत्वकांक्षा बाळगून डीएड केले, विमा पॉलिसी विकल्या, हॉटेल टाकले, बँकेत वसूलीचे काम केले आणि युरेका फोर्ब्सच्या ॲक्वागार्डही विकले. एवढे करूनही यश हुलकावणी देत असल्याने व्यवसाय करायचे ठरविले. २०११ मध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात १५ दिवसांचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (इडीपी) केला, तर २०१२ मध्ये नशिक येथे मसाला उद्योगाचे १ महिन्याचे प्रशिक्षण घेतले. मग पत्नीच्या मदतीने 'सुगरण रस्सा मसाला' उद्योग सुरू केला. बघता-बघता व्यवसायाला यश आले आणि २०२० मध्ये उद्योगाचा ५००० स्क्वेअर फुट जागेवर विस्तार झाला. यातून १८ ते २० जणांना रोजगार मिळालाय. तर वार्षिक उलाढाल ४ कोटीवर गेली आहे.**

**- प्रतिनिधी**

घरात अठराविश्व दारिद्र्याने,अवघ्या पाच एकर कोरडवाहू शेतीचे उत्पन्न व साखर कारखान्यात मुकादमाचे हंगामी काम करणारे अतिशय मेहनती, प्रामाणिक जीवन जगत कुटुंबाचा सांभाळ करणारे भिकाजी नागरे हे एक कष्टकरी गृहस्थ होते.

परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी, भिकाजींच्या पत्नी तुळसाबाई प्रेमळ आणि सहनशील स्वभावाच्या असल्याने त्यांची भक्कम सोबत भिकाजींना लाभली होती. शेकडो लोकांशी असलेले त्यांचे स्नेहाचे संबंध आणि माणसातच देव शोधणारे भिकाजी...

या दांपत्याला 4 अपत्ये होती.भिकाजी नागरे व त्यांच्या पत्नी अशिक्षित असल्या कारणाने त्यांना आर्थिक नियोजन कधी फारसे जमले नाही.आणि याच कारणाने सावकारी कर्जाच्या ओझ्याखाली नागरे कुटुंबाची प्रगती कायमच दबून राहीली. भिकाजी यांच्या घरात शिक्षणाचा अभाव होताच, पण त्यात देखील त्यांच्या मोठ्या मुलाने नॉन मॅट्रिक तर धाकटा मुलगा संजय यांनी पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले संजय यांनी वडिलांकडून मेहनत आणि चिकाटीचे बाळकडू अर्जित करून आज वयाच्या 42 व्या वर्षी उद्योग जगतात यश संपादन केले. संजय नागरे यांचे यश हे त्यांच्या वडिलांचा परिचय जाणून घेतल्या शिवाय अपूर्ण राहू शकते.

**ध्येयपूर्तीसाठी शून्यातून विश्व निर्माण करणारे,**
**सर्व गृहिणींची पाककला सुकर बनवणारे..**
**मसाला उद्योग जगतातले नाव म्हणजे..**
**'नागरेज मसाले'..जालना.**

संजय नागरे यांच्या संघर्षाचा श्री गणेशा शालेय जीवनापासूनच झाला. खेड्यातील शाळेत शिक्षण घेतांना दोन जोडी कपडे आणि इतरांनी वापरलेली पुस्तके घेऊनच शालेय जीवन रेटावे लागले. घराला हातभार लागावा म्हणून घरच्या शेतात काम देखील करावे लागत असे. प्रसंगी दुसऱ्यांच्या शेतात कामाला जाऊन मिळेल ते पैसे कमावतांना कष्ट करण्याची सवय लागली.

दहावी पर्यंतचे शिक्षण गावात होते, परंतु पुढच्या शिक्षणासाठी दुसऱ्या गावी पायी चालत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. , शेतातील आडवाटेने जातांना जनावरांची वाटणारी भीती देखील सहन करावी लागत असे, कारण सायकल विकत घेण्याएवढी नागरे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सबळ नव्हती. एकंदर परिस्थितीचा अंदाज घेऊन संजय नागरे यांनी शिक्षण सोडून कोल्हापूर येथे बहीण व भाऊजी यांच्या मदतीने काही महिने सूत गिरणीत काम केले.

अकरावीची परीक्षा देण्यासाठी गावाकडे येऊन उन्हाळी सुट्ट्यांमध्ये

शेतातील टरबूज, खरबूज बाजारपेठेत जाऊन विक्री करण्याचे काम देखील केले. याच दरम्यान गावातील शिक्षकांनी संजय यांना जाती आरक्षणामुळे कोल्हापूर जिल्ह्यातून डीएडसाठी नंबर लागू शकतो म्हणून बारावीला कोल्हापूरला ॲडमिशन घेण्याचे सुचवले. 12 वी नंतर डी एड करून शिक्षक बनू शकतो असा सल्ला दिला. आयुष्यात पहिल्यांदा संजय नागरे यांना एक ध्येय मिळाले होते. कमवा आणि शिका या धर्तीवर संजय नागरे यांनी 12 वी ची परीक्षा फस्ट क्लास मध्ये पास केली. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. डी एड ची निवड प्रक्रीया जिल्हास्तरीय न राहता ,राज्यस्तरीय करण्यात आली असल्याने नागरे यांचा डी एड साठी नंबर लागू शकला नाही. मनातल्या सर्व आशा आकांक्षा निस्तेज झाल्या असल्या तरी हार न मानता नौकरी करत नागरे यांनी त्यांचे पुढचे शिक्षण कोल्हापूर येथे राजाराम कॉलेज मध्ये सुरू ठेवले.

सुट्टीच्या काळात जेव्हा कधी गावाकडे जाणे व्हायचे त्या वेळी नागरे यांचे आई वडील लग्न करण्यासाठी त्यांच्या मागे तगादा लावत असे. जोपर्यंत स्वतःच्या पायावर उभे राहत नाही, तोपर्यंत लग्न करायचे नाही, असा ठाम निर्णय घेऊन नागरे यांनी ग्रॅज्युएशन पूर्ण करून स्ज्ञ्, ल्ज्ञ् मार्फत परीक्षा देऊन सरकारी नौकरीला गवसणी घालण्याचे ठरवले. त्याप्रमाणे ते अभ्यास देखील करू लागले.

सरळ रेषेत चालेल ते आयुष्य कसले? या वाक्याचा अनुभव संजय याना लवकरच घ्यावा लागला. आयुष्यात टर्निंग पॉईंट ठरणारी घटना घडली आणि स्वतःचा शोध घेण्याकडे एक पाऊल पडलं. ते देखील विधिलिखितच असावं. वेळ, पैसा, आणि संधी यांची योग्य सांगड कधीच न बसलेल्या संजय नागरे यांना आई वडिलांच्या आग्रहाखातर लगनस होकार द्यावा लागला. संजय नागरे यांचा होतकरूपणा आणि अभ्यासू वृत्ती त्यांच्या भावी सासऱ्यांना आवडली. पत्नी सुरेखा या लगनपूर्वीपासूनच स्टाफ नर्स या पदावर सरकारी नौकरी करत असल्याने, लगननंतर संजय नागरे यांना आर्थिक पाठबळ मिळेल अशा आशेने सुरेखा आणि संजय हे विवाह बंधनात अडकले.

ग्रॅज्युएशन चे शेवटचे वर्ष लगननंतर पूर्ण करून संजय नागरे, पत्नी सुरेखा नागरे यांनी मंठा येथे वैवाहिक जीवनास सुरवात केली. पूर्वीपासूनच कमवा आणि शिका ही विचार सरणी असणारे संजय पत्नीच्या कमाईवर बसून खाणे किंवा काहीही काम न करता अभ्यास करणे त्यांच्या स्वाभिमानी मनाला पटणारे नव्हते. त्यामुळे स्पर्धापरिक्षेचा अभ्यास तिथेच थांबवून संजय नागरे यांनी मंठा येथे इन्शुरन्स चे काम सुरू केले. त्या कामात हवे तसे यश न मिळाले नाही. त्यांनंतर नागरे यांनी हॉटेलचा व्यवसाय देखील केला पण त्यात देखील अपयशाने हजेरी लावली. त्या पाठोपाठ त्यांनी प्ि बँकेत वसुली एजंट चे काम देखील केले. दरम्यानच्या काळात सुरेखा यांची बदली मंठा येथून जालना येथे झाल्याने पुढे वर्षभर जालन्यात देखील संजय यांनी नौकरी केली. या काळात नागरे यांनी स्वतःचे घर अर्थात रो हाऊस घेतले.

नौकरी सुरू असली तरी बँकेत प्रगतीची फारशी संधी दिसत नव्हती. खाजगी नौकरी करत असतांना कामाचे चे स्किल उत्तम प्रकारे अंगीकृत झाले असले तरीही अजून पर्यंत संजय नागरे सरांना त्यांचा शोध लागला नव्हता. आणि स्वतःचा शोध घेत असतांना त्यांना उमगलेली गोष्ट म्हणजे नागरे सर, कुठल्याही प्रकारची नौकरी करण्यासाठी बनलेले नसून ते एक व्यवसायिक होण्यासाठीच बनले आहेत. कदाचीत नियतीने आजपर्यंत त्यांना ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी अपयशाच्या पायऱ्या निर्माण केल्या होत्या.

व्यवसाय सुरू करण्याची इच्छा मनात येताच नागरे यांनी शेलार सरांकडे धाव घेतली. आपल्याला व्यवसाय करायचा असून , प्रोडक्शन करण्याचा विचार नागरे यांनी बोलून दाखवला. शेलार सर (शिवाजी विद्यापीठातील, हेड ऑफ द केमिस्ट्री डिपार्टमेंट) यांनी व्यवसायाबाबतचा फार महत्वाचा सल्ला संजय नागरे यांना दिला. संजय, कुठलीही वस्तू निर्माण करणं सोपं आहे. त्याकरिता सरकार द्वारे प्रशिक्षण आणि कर्ज देखील उपलब्ध होत असते.परंतु आपण निर्माण केलेली वस्तू बाजारात विकल्या जाणं यासाठी मार्केटिंग आणि विक्रीचे चे ज्ञान आवश्यक आहे.

व्यवसाय सुरु करण्यापूर्वी नागरे सरांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनानुसार मार्केटिंग जॉब करायला सुरुवात केली. 2010 मध्ये युरेका फोर्स मध्ये एक्वागार्ड विकण्याचे काम घरोघरी जाऊन केले. अगदी बेसिक कामापासून, घरोघरी जाऊन मार्केटिंग करण्याचा उत्तम अनुभव नागरे सरांनी संपादन केला. दरम्यानच्या काळात वेगवेगळया उद्योगाच्या संधी, आणि प्रशिक्षण कुठे सुरू आहे का याचा शोध घेणे आणि वेळोवेळो महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मध्ये प्रकल्प अधिकारी असलेल्या भारती सोसे मॅडम यांना भेट देऊन नाव नोंदणी करत राहणे असा नित्यक्रम वर्षभर सुरूच होता.

अखेरीला 2011 मध्ये इडीपी चे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण घेऊन उद्योग कसा उभारला जातो, व त्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते याची माहिती घेऊन 2012 मध्ये जालना शहरातील तत्कालीन जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या प्रयत्नाने जालना जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने व्यवसायिक होण्यासाठी 11 उद्योगांचे प्रशिक्षण देण्यात आले.

त्यातील मसाला उद्योगाचे प्रशिक्षण, ख्ब्म् त्र्यंबक विद्या मंदिर नाशिक येथे 14 मार्च 2012 ते 14 एप्रिल 2012 या एक महिन्याच्या कालावधीत नागरे सरांनी पूर्ण केले. या प्रशिक्षणातून नागरे सरांचा आत्मविश्वास उंचावला तसेच मसाला व्यवसायाचा सर्वे करायला सुरुवात देखील केली.

मार्केट मध्ये कुठल्या मसाल्याला जास्त मागणी आहे?

त्यासाठी लागणारा कच्चा माल कुठून आणायचा?

त्यासाठी लागणाऱ्या मशिनरी कशा उपलब्ध होतील?

सर्वात महत्वाचे म्हणजे उद्योगासाठी भांडवल कसे उभे करायचे? या सर्व पायऱ्यांचा विचार करून नागरे सरांनी सोनं बँकेत गहाण ठेऊन 60 हजार रुपयांचे कर्ज घेऊन हळद विकत घेतली. ती कोल्ड हाऊस

ला ठेवली. वर्षभरात हळदीचे भाव वाढल्याने त्यांना हळदीतून एक लाखाचा पहिला नफा मिळाला.

संजय नागरे यांनी जिल्हा रुग्णालय जालना येथे स्टाफ नर्स पदावर कार्यरत असलेल्या त्यांच्या पत्नी सुरेखा नागरे यांच्या मदतीने मसाला व्यवसायात पहिले पाऊल टाकले ते म्हणजे घरगुती 10 किलो मसाला बनवून तो सर्व शेजारी आणि नातेवाईकांना वाटला. सर्वांच्या पसंतीस उतरलेला पहिला घरगुती मसाला ज्याचे नाव 'सुगरण रस्सा मसाला'.

संजय नागरे व त्यांच्या पत्नी हे मुळातच खवय्ये स्वभावाचे असल्याने. आणि वेगवेगळे पदार्थ बनवण्याची देखील आवड असल्याने त्यांची मासाल्यांशी चांगलीच गट्टी जमलेली होती.

लहानपणी आईला पाट्यावर मसाले वाटताना पाहून नागरे सरांच्या मनात नेहमी एक प्रश्न असायचा की, एक पदार्थ बनवण्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते. त्याऐवजी एखादा या प्रकारचा रेडिमेड मसाला असता तर ही मेहनत वाचली असती. अर्थात त्यांच्या उद्योजक होण्याच्या नियतीने बहाल केलेल्या संधीचे पाळेमुळे त्यांच्या बालपणातच दडलेले होते.

दरम्यान 2014 मध्ये साधारण 300 चौरस फूट किरायाच्या जागेत पत्र्याच्या शेड मध्ये हाताने कढाई मध्ये भाजून एका कांडप मशीनवर कुटुन व हाताने चांगला व्यवस्थित मिक्स करून छोट्या छोट्या लेबल लावलेल्या पाकिटामध्ये तयार होत असलेला मसाला सर्वांना प्रचंड आवडला,आणि मसाल्याची मागणी देखील वाढली. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी आता ऑटोमॅटिक मशनरीची आवश्यकता होती आणि त्यासाठी लागणार होतं भांडवल,अर्थात पैसा.

पैसा उभा करण्यासाठी मिसेस ने नोकरी वर जीपीएफ काढलं काही सासरवाडी कडून तसेच खादी ग्रामउद्योगाकडून इईउंइ एख्इ् मार्फत स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडून साडेसात लाख रुपये कर्ज मंजूर झाल्याने त्यामधून मसाला भाजण्यासाठी रोस्टर मिक्सर चेन्नई वरून, मसाला grind करण्यासाठी दोन palvaraizer मशीन मुंबईवरून, मसाला कुटण्यासाठी दोन कांडप मशीन सांगली वरून, मसाला मिक्स करण्यासाठी मिक्सर औरंगाबाद वरून, तर मसाला पॅकिंग करण्यासाठी पॅकेजिंग मशीन सुरत वरून खरेदी करून खऱ्या अर्थाने नागरे सर मैदानात उतरले.

पत्नी सुरेखा हिच्या अनमोल साथीने संजय नागरे आपला मसाला घेऊन स्पर्धेत उडी घेण्यास सज्ज झाले. नागरे दांपत्याच्या संसार वेलीवर उमललेली दोन फुले अनुक्रमे आयुष आणि रिया. यांच्यामुळे वैयक्तिक जीवनात देखील नागरे कुटुंब परिपूर्ण बनले.

2015 दरम्यान नागरे यांच्या सासऱ्यांनी संजय सरांची मेहनत पाहून आर्थिक मदत केली तसेच स्वतःची खाजगी कार त्यांना मार्केटिंग साठी दिली. दुचाकीवर गावोगाव मसाल्याची मार्केटिंग करण्याचे काम आता कार मुळे सुसह्य झाले. जालना जिल्ह्यातील अनेक गावात ' नागरेज मसाले ' पोहचू लागले. 2016 मध्ये स्वतःचे कमर्शिअल वाहन विकत घेऊन व्यवसायाच्या कक्षा रुंदावण्याचे काम सुरू करून 2018 मध्ये 10,000 चौरस फूट स्वतःची जागा विकत घेण्यापर्यंत उडी घेतली. 2020 मध्ये 5000 चौरस फूट जागेचे बांधकाम करून छोट्या युनिटमधून मोठ्या युनिटमध्ये काम सुरू झाले. व्यवसायाचा पसारा मोठा होत गेला तसा मनुष्यबळाचा देखील ओघ वाढत गेला. अभिमानाने सांगण्यासारखी गोष्ट अशी की नागरे यांच्या फॅक्टरीत काम करणारी अर्धे अधिक मंडळी ही घरातीलच आहे.




सरांचे मोठे बंधू प्रोडक्शन मॅनेजर असून सरांचे 2 भाचे सेल्स आणि मार्केटिंग चे काम उत्तमप्रकारे करत आहेत. तरी एक भाचा इन्व्हर्ट आऊटवर्ड सोबतच कंपनीला लागणाऱ्या गरजेच्या वस्तू पुरवण्याचे काम करतो तर पुतण्या या सर्वांना मदतीचे काम करतो संजय नागरे हे स्वतः यशाकडे प्रवास करत असतांना त्यांनी आपल्या माणसांना देखील हात देऊन प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकले.

2020 मध्ये खादी ग्राम मार्फत बाळासाहेब मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली इईउंइ एख्इ् 2 मार्फत एसबीआय कडून 70 लाख लोन मंजूर झाल्याने एका रोपाचे ' नागरेज मसाले' या नावाच्या मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले. अंदाजे 18 ते 20 लोक या वटवृक्षाच्या प्रगतीत आपला सहभाग रोज नोंदवत असतात. आजच्या स्थितीत 4 कोटींचे टर्न ओव्हर होत असून पुढे 2024 पर्यंत 7 कोटींचे ध्येय समोर ठेवलेले आहे.

नागरेज मसाले चे काम आज दुकानातून जालना जिल्ह्यात आणि, जालण्यातून इतर 5 जिल्ह्यापर्यंत पोहचले आहे. सुरवातीला 8 ते 10 दुकांनापासून सुरू केलेला प्रवास आज शेकडो गावांपर्यंत मसाला पोहचत आहे. या प्रवासात आवर्जून सांगावासा वाटणारा एक महत्वाकांक्षी अनुभव असा की, संजय नागरे, लहान असताना गोळ्या बिस्किटांच्या दुकानातून काहीही विकत घेत असायचे तेव्हा त्या लहान मोठ्या पुड्यांवर असणारे नाव वाचून नागरे सर विचारात पडायचे की अशाच एखाद्या पॅकेटवर आपलं देखील नाव असावं; आणि आज प्रत्यक्षात त्यांच्या या विचाराचे कृतीत रूपांतर झाले हा काही निव्वळ योगायोग नक्कीच नाही... संजय नागरे सरांचे कुटुंब स्वतः मध्ये एक नंदनवन असल्याने सर्व नातेवाईकांचा लाभलेला पाठिंबा हा नागरे यांच्या यशाची पोचपावती देणारा आहे.

संजय नागरे हे प्रत्येक नवीन उद्योजकासाठी प्रेरणा स्थान आहे. प्रतिकूल परिस्थितीतून देखील त्यांनी मेहनत, सातत्य, तसेच इच्छाशक्तीच्या जोरावर शून्यातून निर्माण केलेले विश्व कायमच प्रेरित करणारे आहे.

■■

## संदीप देसले यांचा हिरो-झिरो-हिरोचा प्रवास

# यशस्वी जीवनाची 'संजीवनी'



**संदीप देसले यांनी कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच एका मार्केटिंग कंपनीमध्ये काम सुरू केले. मात्र, यशाची फळे चाखण्याची वेळ आली तेव्हाच कंपनी बंद पडली. १४ वर्षांची मेहनत वाया गेली. यातून खचून न जाता त्यांनी नवीन विश्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. एका छोट्या गाळ्यात 'संजीवनी' नावाचे किराणा दुकान सुरू केले. सोबतीला बहीण आणि पत्नीसोबत मिळून 'विजेता कोचिंग क्लासेस'ची उभारणी केली. कठोर मेहनत, जिद्द, आत्मविश्वास, दूरदृष्टी आणि चिकाटीच्या जोरावर नाशिक शहरात आज 'संजीवनी सुपर मार्केट' हा एक ग्राहकांच्या पसंतीस उतरणारा ब्रँड झाला आहे. एका दुकानाचे आता ४ दुकाने झाली असून लवकरच पाचवे सुरू होणार आहे. झिरो ते हिरो, हिरो ते झिरो आणि पुन्हा झिरो ते सुपरहिरो होण्याचा संदीप यांचा प्रवास थोड्याशा अपयशाने खचून जाणाऱ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. - डॉ. उमेश कणकवलीकर**

''सर, मला तो क्षण आजही आठवतो की, तुम्ही माझ्या शेजारी बसला होतात आणि तुम्ही मला विचारले की, तुम्ही काय करता? मी जास्त लक्ष दिले नाही; कारण मी विचार केला, हा कोण अनोळखी माणूस, टाइमपास म्हणून मला प्रश्न विचारू लागला आहे? काही वेळातच प. सा. नाट्यगृहाचा पडदा उघडला आणि तुम्ही स्वतःच 'मी विजेता होणारच!' हा शो सादर करत आहात हे पाहून मी शॉक झालो. आज त्याच शोमुळे मी माझ्या आयुष्यात यशस्वी झालो आहे. आपल्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे करोडपती होऊन विजेता झालो आहे.'' जेव्हा संदीपजींचा हा मेसेज मी वाचला तेव्हा माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

मी 'उद्योजक' मासिकाच्या मुलाखतीसाठी संदीपजींना जेव्हा फोन केला, तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. मुलाखतीसाठी संदीपजी त्यांच्या ओघवत्या वाणीत बोलू लागले, '२४ एप्रिल, १९८२ या दिवशी पांडाणे, दिंडोरी, नाशिक येथे माझा जन्म झाला. माझे एम.ए., बी.एड. पर्यंत शिक्षण झाले आहे. माझे आई-वडील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक असल्यामुळे त्यांची खेडोपाडी बदली होत असे. आता माझे आई-वडील निवृत्त जीवन जगत आहेत. मी वृत्तपत्रामध्ये 'मी विजेता होणारच!' कार्यक्रमाची जाहिरात वाचली. मी गंगापूर रोड, नाशिक येथील के. टी. एच. एम. कॉलेजचा विद्यार्थी आहे. त्यावेळेस मी बी.ए. प्रथम वर्षाला होतो आणि कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहत होतो. मी कार्यक्रमाचे तिकीट काढण्यासाठीसुद्धा उसने पैसे घेतले होते. मला कार्यक्रमाच्या शीर्षकातच दम वाटला, म्हणून विजेता होण्यासाठी मार्गदर्शन लाभेल या हेतूनेच मी कार्यक्रमाला आलो. त्या तीन तासांत तुम्ही रंगमंच गाजवलात. तुम्ही सर्व प्रेक्षकांना तीन तास मंत्रमुग्ध करून खुर्चीला खिळवून ठेवले होते. तुमच्या ज्वलंत विचारसरणीमुळे, घणाघाती शब्दप्रयोगांमुळे अंगावर रोमांच उभे राहिले होते. माझ्या तिकिटाचे पैसे वसूल झाले होते. तरुण वयात जीवनात नक्की काय करायला हवे, हे कळले होते. शिक्षणासोबत पोटापाण्यासाठी स्वतःच्या पायावर उभे राहणे ही काळाची गरज आहे, हा संदेश माझ्या अंतःकरणाला भिडला होता. कलाकार म्हणून तुमचा तो शुभारंभाचा कार्यक्रम होता आणि प्रेक्षक म्हणून माझादेखील तो शुभारंभाचा कार्यक्रम होता.

मी एका नामांकित मार्केटिंग कंपनीचे काम सलग १४ वर्षे केले. कॉलेजमध्ये शिक्षण घेता घेता सुरू केलेले काम सातत्याने केल्यामुळे मला चांगले यश संपादन करता आले. १४ वर्षांचा वनवास भोगल्यानंतर जेव्हा यशाचे फळ चाखण्याची वेळ आली, तेव्हाच ती मार्केटिंग कंपनी कायमची बंद झाली. ज्या कामासाठी उभे आयुष्य वेचले होते, महाराष्ट्रभर ज्या कार्याचे जाळे विणले होते, ते सर्व वाया गेले. मी 'झिरो टू हिरो' हा प्रवास उत्तमरीत्या पार केला होता; पण रातोरात मी 'हिरो टू झिरो' झालो. माझी सर्व स्वप्नं एका झटक्यात भंग झाली. मी कर्जबाजारी झालो. मी नैराश्याच्या आहारी गेलो. आज त्या आठवणींनीसुद्धा अंगावर काटा येतो. माझे घर विकून मी लोकांची देणी देऊन टाकली; कारण मी ऐन तारुण्यात तुमच्याकडून 'सत्यमेव जयते'चे धडे शिकलो होतो. जरी ती मार्केटिंग कंपनी बंद झाली असली, तरी त्या १४ वर्षांत आम्ही ज्ञान आणि कौशल्य विकसित

करणारे धडे घेतले, हे मी मान्य करतो. आयुष्यात सत्याचीच कास धरल्यामुळे मला खात्री होती की, हे वाईट दिवसही जातीलच आणि चांगले दिवस येतीलच!

मी पुन्हा शून्यातून विश्व निर्माण करायला सज्ज झालो. मी एका गाळ्यामध्ये एक छोटेसे 'संजीवनी' नावाचे किराणामालाचे दुकान सुरू केले. संजीवनी हे माझ्या धाकट्या बहिणीचे नाव. आता ती सुखी वैवाहिक जीवन जगत आहे. माझी पत्नी सौ. सुवर्णा ही शिक्षणक्षेत्रात पदवीधर असल्यामुळे आणि तिला शिकवण्याची आवड असल्यामुळे आम्ही दोघांनी मिळून जोडधंदा म्हणून 'विजेता कोचिंग क्लास' सुरू केला. आमच्या पडत्या काळात याच विजेता क्लासेसने आम्हाला आधार दिला. मी ॲडमिशनचे आणि कार्यालयाचे काम पाहायचो आणि सुवर्णा विद्यार्थ्यांना शिकवायची. अंदाजे तीन वर्षे आम्ही हा क्लास 'संजीवनी सुपर मार्केट' सोबत चालू ठेवला; पण त्यानंतर आमच्या संजीवनीच्या उद्योगाची भरभराट सुरू झाली. जिद्द, आत्मविश्वास, उत्साह, चैतन्य, दूरदृष्टी, संकल्प, साहस, चिकाटी, सातत्य आणि प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर आज पंचवटी, नाशिक या भागात संजीवनी सुपर मार्केट हा ब्रँड ग्राहकांच्या पसंतीचा झाला आहे. एका गाळ्याने सुरू केलेला संजीवनी सुपर मार्केटचा उद्योग आता चार गाळ्यांत सुरू आहे. लवकरच संजीवनी सुपर मार्केटचा पाचवा गाळा विकत घेण्याचा मानस आहे. नजीकच्या काळात या उद्योगाच्या शाखा उभारण्याचेही स्वप्न आहे. आमची वार्षिक उलाढाल करोडो रुपयांची होत आहे. दर्जेदार उत्पादने, तत्पर हसतमुख ग्राहक सेवा, सुपर मार्केटमधील टापटीपपणा, प्रामाणिक व्यवहार, ग्राहकांच्या मागणीची उपलब्धता इत्यादी जमेच्या बाजू उत्तमरीत्या सांभाळल्यामुळे आम्ही उत्तरोत्तर प्रगती करत आहोत. आम्ही ग्राहकांना सेवा देण्याचा मनमुराद आनंद लुटतो आणि तो आमच्या उद्योगाच्या भरभराटीस पूरक ठरतो. ग्राहक हाच राजा, ग्राहक देवो भव! याची १००% जाणीव असल्यामुळे आम्हाला भव्यदिव्य यश संपादन झाले आहे.

सौ. सुवर्णाला एका शाळेमध्ये चांगल्या पगाराची कायमस्वरूपी नोकरी मिळाली. त्यामुळे वेळेअभावी आम्ही विजेता क्लासचे काम थांबवले. माझ्या आई-वडिलांचा शिक्षणक्षेत्रातील वारसा माझी पत्नी पुढे नेत आहे, याचा मला अभिमान आहे. आम्हाला आराध्या नावाची एक सुकन्या आहे. ती इयत्ता सहावीत शिक्षण घेत आहे. अलीकडेच मी एस. टी. परिवार या रिअल इस्टेटच्या उद्योगात पदार्पण केले आहे. माझ्याकडे असलेल्या भूतकाळातील अनुभवाच्या जोरावर या कंपनीत मी मार्केटिंगचे काम करत आहे.

मला माझ्या जीवनात तुमच्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही प्रशिक्षकाची कधीच गरज भासली नाही. तुमचे प्रशिक्षण हे पोलिओच्या डोससारखे सदैव उपयुक्त ठरते. इतर प्रशिक्षक येतात, कार्यक्रम करतात, प्रशिक्षण घेतात आणि निघून जातात; पण सर तुम्ही आजही आमच्याशी संपर्क ठेवला आहे. मानवी स्नेहसंबंध कसे जोपासायचे याचे तुम्ही मूर्तिमंत उदाहरण आहात. २००३ ते २०२३ म्हणजे तब्बल दोन दशकांचे आपले गुरू-शिष्याचे नाते आपण जोपासले आहे. आजच्या स्वार्थी जगात निःस्वार्थ भावनेने कोणीही आपुलकी, माणुसकी जोपासत नाहीत; पण तुम्ही सदैव अडीअडचणीच्या काळात हाकेला धावून येता. सतत संपर्कात राहता. ईश्वराची कृपा आहे की, तुमच्यासारखे व्यक्तिमत्त्व आम्हाला लाभले.

तुमच्याकडून मी हे शिकलो की, तुम्ही आणि सौभाग्यवती निशिगंधा मॅडमनी नोकरी सोडली, तुमचा मुलगा डॉ. राजेश याने कधीच नोकरी केली नाही. म्हणून मीही निर्णय घेतला की, मी नोकरी करणारा नाही, तर उद्योग करणारा माणूस म्हणून नावारूपाला येणारच! माझे हे स्वप्नदेखील साकार झाले आहे. मी तुमच्याकडून विजेता जीवन कसे जगायचे याचे सतत मार्गदर्शन घेत असतो. आज माझे आई-वडील, माझे कुटुंबीय आणि मित्रपरिवार माझ्या कामगिरीमुळे संतुष्ट आहेत. मी माझ्या यशाचे श्रेय माझे जन्मदाते आई-वडील आणि गुरुवर्य म्हणून तुम्हाला देत आहे. या प्रसंगी मी माझ्या पत्नीचे, सौ. सुवर्णाचे आभार मानतो; कारण तिने सुख-दुःखात मला मोलाची साथ दिली. माझे थोरले बंधू श्री. सचिन आणि माझी वहिनी सौ. कल्पना यांचाही मी आभारी आहे. सचिन यांनी एम.ए.पर्यंत शिक्षण घेतले आहे. ते देखील माझ्यासोबत आमचा संजीवनी सुपर मार्केटचा उद्योग संभाळतात. आम्ही सर्व कुटुंबीय एकत्र राहतो आणि एकजुटीने उद्योगधंदाही करतो. उद्योजक मासिकात छापून आलेली प्रत मी माझ्या आई-वडिलांच्या चरणी वाहणार आहे; कारण मातृ-पितृ देवो भव!

एक तो दिवस होता की, मी उसने पैसे घेऊन कार्यक्रमाला आलो होतो आणि आज हा दिवस आहे की, मी एक आलिशान कार खरेदी करण्याच्या उंबरठ्यावर आहे. त्या वेळेस मी हॉस्टेलवर राहत होतो आणि आज स्वतःच्या बंगल्यात राहत आहे. एक वाईट काळ होता की मला माझा फ्लॅट विकावा लागला होता आणि आज पंचवटी, नाशिक येथे बंगला बांधण्यासाठी मी एन. ए. प्लॉट विकत घेतला आहे. आजच्या तरुणांना मी इतकेच सांगू इच्छितो की, कधीही माघार घेऊ नका. जीवनात टर्निंग पॉइंट कधीही येऊ शकतो. त्यासाठी आपण सज्ज असले पाहिजे. म्हणून उद्योगात आपण सातत्याने आणि चिकाटीने टिकून राहिले पाहिजे. जीवनात विजेता व्हायचे असेल, तर एक गुरू शोधा. कारण गुरू देवो भव! झिरो टू हिरो, हिरो टू झिरो आणि पुन्हा झिरो टू हिरो या संघर्ष ते उत्कर्षाच्या प्रवासाची वाटचाल मी करू शकलो; कारण मी तुमच्याकडून स्वप्नांची डायरी लिहायला शिकलो आहे. त्या डायरीच्या पहिल्या पानावर मी कायमचे लिहून ठेवले आहे, 'जानता हूँ मंझिल कहां है। अभी तो सफर का इरादा किया है। ना हारुँगा जिंदगी में कभी, ये मैंने औरों से नहीं अपने आप से वादा किया है।' कार्यक्रमाच्या आणि प्रशिक्षणाच्या अंतिम भागात तुम्ही आम्हा सर्वांकडून एक शपथ म्हणून घेता, 'मी शपथ घेतो की, संकटं कितीही आली तरी मी थांबणार नाही. त्या संकटांच्या ढिगाऱ्यावर उभा राहीन आणि मी माझ्या ध्येयसिद्धीची वाटचाल करतच राहीन. मी विजेता होणारच!' हा गुरुमंत्र आणि ही शपथविधी एखाद्या तारकमंत्राप्रमाणे जीवनात पदोपदी उपयुक्त ठरत आहे.'

*(या मुलाखतीचे शब्दांकन करणाऱ्या लेखकाची २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच त्यांनी आजवर मी विजेता होणारच! या कार्यक्रमाचे ३५०० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत. आर्ट ऑफ विनिंग नावाने ते प्रशिक्षण देतात. ते नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून पुणे येथे शिष्यकुल या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांचा e-mail : nishamissionvijeta@yahoo.com असून त्यांचे भ्रमणध्वनी ९८२०२९२०७२ / ९०२९३७३१११ आहेत.)*

# नमुना प्रकल्प अहवाल

## हस्तकला उत्पादने तयार करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा हस्तकला उत्पादने उत्पादीत करण्याचा आहे. हस्तकला हा विषय भारतामध्ये फार प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहे. मध्ये ही कला जवळपास लोप पावली होती पण मागच्या १० वर्षांमध्ये हस्तकलेची बाजारपेठ मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. आजकाल बरेचसे स्टार्टअप या हस्तकलेचा व्यावहारिक स्वरूपात चांगल्या प्रकारे वापर करत आहेत. भारतामध्ये प्रत्येक राज्याचे काही ना काही हस्तकलेचे उत्पादन प्रसिद्ध आहे. त्यामध्ये टेक्सटाईलपासून ते लाकडी उत्पादनापर्यंत त्याचा समावेश होतो. येणाऱ्या काळात हस्तकलेची बाजारपेठ भारतीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे व ती आणखीन वाढणार आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा १०,००० चौरस फूट
इमारत ७,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** ॲडेझीव्ह, बांबू व इतर

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-७, अर्धकुशल-४, अकुशल-३

**लागणारी यंत्रसामग्री :** कटींग मशीन इत्यादी

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ३७,८०,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | ३०,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ५०,००० |
| इतर | २०,००० |
| **एकूण :** | **१,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ७५,००० |
| पक्का माल | १,५०,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | **२,७५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ९,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,८०,००० |
| पाणी | २४,००० |
| **एकूण :** | **२,०४,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-७ | १८,९०,००० |
| अर्धकुशल-४ | ८,००,००० |
| अकुशल-३ | ४,५०,००० |
| **एकूण :** | **३१,८०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ५,००० |
| **एकूण :** | २०,००० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ३०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १०,००० |
| **एकूण :** | **४०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-१ | ३,००,००० |
| **एकूण :** | **३,००,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | २,२५,००० |
| प्रवास खर्च | ३६,००० |
| **एकूण :** | **२,६१,०००** |
| **एकूण :** | **५,६१,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ३,००,००० |
| इतर | २,३०,००० |
| **एकूण :** | **५,३०,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ३,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १५,००० |
| **एकूण :** | **४,१५,०००** |
| खेळते भांडवल | २,७५,००० |
| **एकूण :** | **६,९०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे १० टक्के | ६९,००० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | ६,२१,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ९,००,००० |
| उपयुक्तिके | २,०४,००० |
| वेतन व भत्ते | ३१,८०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | २०,००० |
| घसारा | ४०,००० |
| प्रशासकीय खर्च | ५,६१,००० |
| विक्री खर्च | ५,३०,००० |
| व्याज | ७४,२५० |
| **एकूण :** | **५५,०९,२५०** |
| **वार्षिक विक्री :** | **७१,६२,०२५** |
| **वार्षिक नफा :** | **१६,५२,७७५** |

# पर्यटन उद्योग

**ओळख :** सदरील प्रकल्प हा पर्यटन उद्योगाविषयीचा आहे. या उद्योगामध्ये लोकांमध्ये पर्यटनाबद्दल रुची निर्माण करणे व त्याविषयीचा अवेअरनेस तयार करणे व भारतातल्या ऑफबिट डेस्टिनेशनची माहिती देणे व वेगवेगळ्या पर्यटनाबद्दल लोकांशी संवाद साधून लोकांना जागृत करणे, त्यानंतर पर्यटनाला लागणाऱ्या सर्व सेवा पुरविणे, पर्यटन उद्योग हा एक खूप मोठा सेवा उद्योग आहे. त्याची व्याप्ती ही आयटी उद्योगापेक्षा खूप मोठी होऊ शकते व त्याची बाजारपेठ पण खूप मोठी आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात युवकांनी या संधीचा फायदा घेऊन युनिक टुरिझम बिझनेस मॉडेल तयार केले पाहिजे, त्यात प्रत्येकाला वाव व संधी आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा २,००० चौरस फूट
इमारत १,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** --

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-१, अर्धकुशल-१, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :** पी.सी., लॅपटॉप, प्रिंटर इत्यादी

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | २,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | १,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | -- |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **१,५०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | २०,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | -- |
| पक्का माल | -- |
| प्रत्यक्ष | १,२५,००० |
| **एकूण :** | **१,२५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | -- |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,८०,००० |
| पाणी | २४,००० |
| **एकूण :** | **२,०४,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-१ | २,७०,००० |
| अर्धकुशल-१ | २,१०,००० |
| अकुशल-१ | १,५०,००० |
| **एकूण :** | **६,३०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ५,००० |
| **एकूण :** | **१५,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | २०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १०,००० |
| **एकूण :** | **३०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक | ३,५०,००० |
| **एकूण :** | **३,५०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | -- |
| प्रवास खर्च | -- |
| **एकूण :** | -- |
| **एकूण :** | -- |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | २,५०,००० |
| इतर | ५,००,००० |
| **एकूण :** | **७,५०,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | २,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २०,००० |
| **एकूण :** | **३,७०,०००** |
| खेळते भांडवल | १,२५,००० |
| **एकूण :** | **४,९५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे १० टक्के | ४९,५०० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | ४,४५,५०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | -- |
| उपयुक्तिके | २,०४,००० |
| वेतन व भत्ते | ६,३०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १५,००० |
| घसारा | ३०,००० |
| प्रशासकीय खर्च | ३,५०,००० |
| विक्री खर्च | ७,५०,००० |
| व्याज | ५३,४६० |
| **एकूण :** | **२०,०२,४६०** |
| **वार्षिक विक्री :** | **२७,५६,०६८** |
| **वार्षिक नफा :** | **७,५३,६०८** |

# सौंदर्य प्रसाधने उद्योग

**ओळख :** सदरील प्रकल्प हा सौंदर्य प्रसाधने उत्पादन उत्पादीत करण्याचा आहे. अलीकडच्या एका वर्तमानपत्रात एक बातमी आली होती की, येणाऱ्या काळात भारतामध्ये २० लाख लग्न होणार असून त्यामध्ये एकूण ४.७८ लाख कोटी रुपये खर्च होणार आहे. या ४.७८ लाख कोटींपैकी २३ टक्के बाजारपेठ ही सौंदर्य प्रसाधने उत्पादनाची आहे. म्हणजे आपल्याला समजेल की ही बाजारपेठ इतकी प्रचंड आहे व आजकाल भारतीय सौंदर्य प्रसाधनांना भारतातूनच नाही तर जगभरातून याला मागणी आहे व ती वाढतच जाणार आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा १ एकर

इमारत १५,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** ॲरोमॅटिक फांटस पावडर व पल्प

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-५, अर्धकुशल-२, अकुशल-३

**लागणारी यंत्रसामग्री :** सेमी ऑटोमॅटिक कॉस्मेटिक उत्पादन मेकिंग प्लँट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | ५,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ७,००,००० |
| इतर | २,००,००० |
| **एकूण :** | **१४,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १,००,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १०,००,००० |
| पक्का माल | १५,००,००० |
| प्रत्यक्ष | २,००,००० |
| **एकूण :** | **२७,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,२०,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १२,००,००० |
| पाणी | ३,००,००० |
| **एकूण :** | **१५,००,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-५ | १३,५०,००० |
| अर्धकुशल-२ | ४,२०,००० |
| अकुशल-३ | ४,५०,००० |
| **एकूण :** | **२२,२०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,७५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ७०,००० |
| **एकूण :** | **१,४५,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ३,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १,४०,००० |
| **एकूण :** | **४,९०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-३ | ११,५०,००० |
| इतर-१ | ३,००,००० |
| **एकूण :** | **१४,५०,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ५,००,००० |
| प्रवास खर्च | २,००,००० |
| **एकूण :** | **७,००,०००** |
| **एकूण :** | **२१,५०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ५,००,००० |
| इतर | २,००,००० |
| **एकूण :** | **७,००,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १४,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १,००,००० |
| **एकूण :** | **५०,००,०००** |
| खेळते भांडवल | २७,००,००० |
| **एकूण :** | **७७,००,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | २३,१०,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ५३,९०,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,२०,००,००० |
| उपयुक्तिके | १५,००,००० |
| वेतन व भत्ते | २२,२०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | २,४५,००० |
| घसारा | ४,९०,००० |
| प्रशासकीय खर्च | ११,००,००० |
| विक्री खर्च | ७,००,००० |
| व्याज | ६,४६,८०० |
| **एकूण :** | **१,८९,०१,८००** |
| **वार्षिक विक्री :** | **२,८२,०३,६००** |
| **वार्षिक नफा :** | **९३,०१,८००** |



# प्रश्नपेटी

**प्रश्न : लिथियम आयर्न बॅटरी रिसायकलींग प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विश्वास नाडकर्णी, पुणे**

**उत्तर :** लिथियम आयर्न बॅटरी रिसायकलींग प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जागा १५,००० चौरस फूट

इमारत १०,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता :

वीज ४० अश्वशक्ती

पाणी १० के.एल.

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक लिथियम आयर्न बॅटरी रिसायकलींग मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे लिथियम आयर्न बॅटरी स्क्रॅप

या प्रकल्पासाठी एकूण भांडवल २०० ते ३०० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १०० ते १५० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५० ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १७ ते २२ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १३ ते १६ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : ग्राफीन बेस्ड हेल्मेटच्या प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**गौरव परदेशी, कोल्हापूर**

**उत्तर :** कार्बन फ्रीड स्टॉक प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

जागा १०,००० चौरस फूट

इमारत ५,००० चौरस फूट

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-५, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक कार्बन फ्रीड स्टॉक मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे व दर्जाचे कार्बन व केमिकल्स साहित्य

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २०० ते ४०० लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १५० ते ३०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ७० लाख ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २३ ते २५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १९ ते २२ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : बांबू सीएनजी प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विनय पाटील, नागपूर**

**उत्तर :** बांबू सीएनजी प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ३०,००० चौरस फूट

इमारत १५,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज ५० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-७, अर्धकुशल-३, अकुशल-३

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : बांबू सीएनजी मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे मिल्क

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ५०० ते ७०० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ३०० ते ५०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १५० ते १२० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १० ते १२ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा ७ ते ९ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : फ्रुट पल्प प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**अजय जाधव, नाशिक**

**उत्तर :** फ्रुट पल्प प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ५,००० चौरस फूट

इमारत २,५०० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज ३० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-३, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : रोझ ऑईल मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ

-चा गुणवत्तेचे फ्रुट पल्प, फ्रुट व फुड केमिकल्स इत्यादी.

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ७५ ते १०० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ५० ते ६० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १५ ते २५ लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २१ ते २३ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात यईल.)*

उद्योग,
व्यापार,
व्यवसायाद्वारा
स्वयंरोजगार
मिळविण्यासाठी
सर्व काही...

**प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.**

**उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र**

# उद्योजक

अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com
To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in

## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३१९६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ____________________
पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ____________________
____________________
पिन कोड ____________________
कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ____________________

| वर्गणीचे दर | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

| जाहिरातींचे दर | |
|---|---|
| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करून पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

**उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!**

**ऑफिसर कोड 46 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.**

**वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे**

**कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३१९६ वर कळवावा.**

उद्योजक

GÅeepekeâlee eJekeâeme ØeeMe#eCe keâeÙe>eâce, ‘GÅeepekeâ’ ceeemekeâ JeieCee/peeenjele

mehekeâeÛe helle

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी ‘उद्योजक’ मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातीविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले ‘उद्योजक’ कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

# cenejे° GÅeepekeâlee eJekeâeme keâõeÛe (ScemeeF[e) jepÙeeleeue keâeÛeeueÛeeÛe helle

ceyeF eJeYeeie : ßee.jepeMe keâeoUieeJekeâj, eJeYeeieeÙe DeeOekeâeje, keâekeâCe eJeYeeie, ßee.Deeveo eJeÅeeiej, Øekeâuhe DeeOekeâeje, ßee.øeoehe meeJele, keâ.Øe.De. (me.he.), ceyeF-Gheveiej (SceSceDeej) व मुख्य समन्वयक (सीएमईजीपी), कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ९४२३९३६००१, ७९७२८१५२२२, ९४०३६८३१८९. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, keâeUieJe, le.epe.heeuelej, ☎८६६९०५४०७८ श्री.प्रदीप सावंत, चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ☎७९७७२४२१६७, ८८५०२९२८४८. श्री.एस.के.बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी.एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मॉडेल वुलन मिलसमोर, मुलुंड चेक नाका, ठाणे-४०० ६०२.☎ २५८२५३४८, ७७७४०५३०१४. वर्षा मेश्राम, जिल्हा प्रकल्प समन्वयक (सेपू), पटेल मोटर्स, नगरपालिकेजवळ, शेतकरी भवनाजवळ, अलिबाग, जि.रायगड-४०२ २०१. ☎९८३४२२१९६०. heCe eJeYeeie : श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ 005. ☎ ९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.मिलिंद लोंढे, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎७३८७०२०२३५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. keâeunehej eJeYeeie : श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.प्रवीण कायंदे, क.प्र.अ. सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), दत्ताजी चेंबर्स, ३१५/ई, न्यू शाहूपुरी, मेरा हॉटेलसमोर, एस.टी.स्टँडजवळ, कोल्हापूर-४१६ ००२. ☎(०२३१) २६६६७४८, २६६२०७१,९४०३०७८७५३, ९४०३०७८७७४, ९४२२८१०८६३. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९, ७०५७९९४३०८. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०४९५०००४. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. veeeMekeâ eJeYeeie : ßee.Deeueekeâ eceßee, eJeYeeieeÙe DeeOekeâeje, ßee.Sme.S.Yeecej, Øekeâuhe DeeOekeâeje, ßee.ceieMe yevekeâj, epeune Øekeâuhe mecevJeÙekeâ (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा GÅeeie keâõ, mšMeve ceeie, Denceoveiej ceneeJeÅeeueÙeepeJeU, Denceoveiej. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.ढाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. veeiehej eJeYeeie : ßee.Øeoehe FieU, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री keâj keâeÙeeueÙeepeJeU, veeiehej. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६९ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री.पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टँडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर, ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ७६६६१३६३८९. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता ढोणे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४, ☎२५०२७४, ८७८८६४८९६५. ÚÚ$eheleer meYeepeeveiej eJeYeeie : श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७६६, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.खुशाल रोकडे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ७०५७९६८१३१. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. veeo[ eJeYeeie : ßee.ekeâMeej DeYeej, eJeYeeieeÙe DeeOekeâeje, ßee.Mekeâj heJeej, keâ.Øe.De. (me.he.), GÅeeie YeJeve, leU cepeuee, eMeJeepeveiej, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, चिद्रावार नगर, शासकीय कृषी कार्यालयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री. सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, ceÛeJelee ØeMeemekeâeÙe Fceejle, enieeuee. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. DecejeJelee eJeYeeie : ßee.hee.Jne.FieU, eJeYeeieeÙe DeeOekeâeje, ßee.hee.Jne.FieU, Øekeâuhe DeeOekeâeje, ßee. राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही.मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. ९४०३०७८७६९, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिरुलकर, क.प्रकल्प DeeOekeâeje (me.he.), GÅeeie YeJeve, DecejeJelee ceeie, ÙeJeleceeU. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९

■■

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak January 2024
Date of Publication : 25th December 2023

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024



# ceKÙece$ee jepeiee j eveecelee keâeÙe›eâce (CMEGP)

## ceKÙece$ee jepeiee j eveecelee keâeÙe›eâceeleve GÅeepekeâ yeveCÙeeÛee meOee

## Oee j Ce jepeiee j eveecelee eÛe, Geoo„ øeiele cene j e„ eÛe

* ‘‘veekeâ j e ceeieCeeNÙeehe#ee veekeâ j e oCee j Jne’’
* ceeieoçeve Je ieleJeCekeâemee''e heçeeÛee DeYeeJe Deen keâe?
* GÅeepekeâ neCÙeeÛe mJehve øelÙe#eele Gle j le veene keâe?
* lej GÅeepekeâ neCÙeeÛe mJehve melÙeele Gle j eJeCÙeemee''e ceKÙece$ee jepeiee j eveecelee keâeÙe›eâce cnCepeÛe meeSceFpeeheeÛee ueeYe IÙee.

* Ùee ÙeepeveDeleiele eveecelee Je Gleheove #e$eemee''e 50 ueeKe lej
* meJee Je keâe<e he j keâ øekeâuheemee''e 20 ueeKe ™heÙeeheÙeleÛe keâpe he j Je''e.
* cee''Ÿee øeceeCeele Deveoevene GheueyOe Deen.
* lej Jeeš keâçeeÛee yelelee... Deeheue mJehve meekeâe j CÙeemee''e, mJele:Ûee mJeÙe j epeiee j GYee j CÙeemee''e DeepeÛe meeSceFpeeheeÛee ueeYe IÙee.



: DeeOekeâ ceeenlee ke mehekeâemee''e :

jepÙemle j eÛe meeveÙe$eCe : ekekeâeme DeeÙeòeâ (GÅeie), GÅeie meÛee}vee}Ùe, veJeeve øeMeemekeâeÙe Fcee j le, 2 j e cepeuee, ce$eeueÙeemecee j, ceyeF - 400 032.
nuhe}eFve veye j : 22 2202 3912.
cenekÙekemLeehekeâ, epeune GÅeie keâõ (meyeeOele epeune) epeune Keeoe ke ieeceeÅeeie DeeOekeâe j e (meyeeOele epeune)
mekeâlemLeU : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in


If undelivered please return to

Chief Editor,
Udyojak Magazine,
उद्योजक

MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in

To,

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**